
# चवल्या



## बाळासाहेब शिंपी

# चवल्या

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# चवल्या

बाळासाहेब सुधाकर शिंपी, जळगांव.

ई साहित्य प्रतिष्ठान

चवल्या

लेखक
बाळासाहेब सुधाकर शिंपी, जळगांव.
ता.जि. जळगांव (महाराष्ट्र)
मो.नं 9921729475
Email Id: balasaheb.siddesh@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन : २५ मे २०१९



©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

!! श्री !!

# चवल्या

(लघुकादंबरी)

प्रत्येकवेळी मला साथ देणारे व

माझ्या सुख दुखाःत सदैव माझ्या सोबत असणाऱ्या

माझ्या आई वडीलांना माझं हे पहिलं पुस्तक समर्पित.

- बाळासाहेब सुधाकर शिंपी, जळगांव.

ता.जि. जळगांव (महाराष्ट्र)

मो.नं 9921729475

Email Id: balasaheb.siddesh@gmail.com

'चवल्या' या लघूकादंबरी रुपी पुस्तकातील सर्व घटना, प्रसंग, स्थळ व पात्र काल्पनिक असून याचा कुठल्याही जीवंत अथवा मृत व्यक्तीशी काही एक संबंध नाही. असे आढळल्यास तो केवळ योगायोग समजावा. या कादंबरीतील पात्रे व त्यांची नांवे ही केवळ मनोरंजनासाठी तयार तयार करण्यात आली आहे. कोणाच्या भावना दुखावणे हा या मागचा उद्देश मुळीच नाही.

**मनोगत**



नमस्कार मित्रहो, तशी मला लेखनाची आवड लहानपणापासूनच, कविता, लेख लिहीणे हा माझा आवडता छंद माझ्या काही कविता व लेख वृत्तपत्रातही छापून आलेत. लिखानासाठी व्यासपिठ मिळावं म्हणून मी सकाळ वृत्तपत्रासाठी रिपोर्टर म्हणून तर महाराष्ट्र टाईम या वृत्तपत्रामध्ये कॉलेज क्लब रिपोर्टर म्हणून कॉलेजला असतांना काम केलं. दोन वर्षापूर्वी मी माझं जेमतेम बी.ए पर्यंत शिक्षण पूर्ण केलं. परिस्थितीमुळे मला पुढे शिकता आलं नाही. काम करुन शिक्षण करणं हे मला परवडण्यासारखं नव्हतं. म्हणून मी पुढे शिकलो नाही. काही दिवस मी एका स्थानिक न्युज चैनलला उपसंपादक म्हणून काम केलं. स्वतःचं साप्ताहिक वृत्तपत्र सूरु केलं पण तेही बंद केलं. आपलंही एखादं पुस्तक प्रकाशित व्हावं व ते रसिक वाचकांपर्यंत पोहचावं अशी ईच्छा होती. पण पुस्तक प्रकाशित करण्यासाठी येणारा खर्च मला परवडण्या सारखा नव्हता. म्हणून बघितलेलं स्वप्न पुर्ण होईल की नाही? असा प्रश्न मनात होता. मग मी एक दिवस ई पुस्तक असं नेटवर सर्च केलं. तर मला “ई साहित्य प्रतिष्ठाण” विषयी माहिती मिळाली. मी ई प्रतिष्ठाणच्या ‘ई साहीत्य’ वेबसाईटवरुन बरीच पुस्तके डाऊनलोड करुन वाचली यांत मुख्यत्वे कादबऱ्या होत्या या ईप्रतिष्ठानच्या अनोख्या उपक्रमामुळे मला लिहिण्याची प्रेरणा मिळाली. व मी माझ्या मोबाईलमध्येच असलेल्या मायक्रोसॉप्ट वर्डचा उपयोग करुन माझी लघुकादंबरी चवल्या नऊ दिवसांत पुर्ण करु शकलो. गेल्या काही दिवसांपासून मी मेंदूच्या दुखापतीमुळे व रक्तदाबाच्या त्रासाने त्रस्त आहे. माझेवर उपचार सुरु आहेत. मात्र अशा स्थितीत मी परमेश्वरकृपेने माझं पहिलं लेखन पुर्ण करु शकलो. ई प्रतिष्ठानने ते प्रकाशित केलं त्या बद्दल ई साहित्य टिमचे मनापासून आभार! माझं हे लिखान तुम्हाला आवडेल की नाही माहीत नाही कारण मी काही लेखक नसून नवखा व्यक्ती आहे. आवडल्यास आपली प्रतिक्रिया नक्की कळवा.

आपला

बाळासाहेब सुधाकर शिंपी, जळगांव.

# चवल्या

पहाटेची वेळ होती. थंडीचा महिना असल्याने बाहेर बोचरी थंडी वाजत होती. त्यामुळे आंथरुनातून उठून पांघरुना बाहेर तोंड काढायची माझी ईच्छाचं होतं नव्हती. मी आमच्या घराच्या लांब लचक ओसरीवरं दोन झावरी ( गोधड्या ) पांघरुन पसरलो होतो.

दिवाळीच्या सुट्ट्या असल्याने शाळेचं टेंशन शुन्य होतं. जाग येऊनही मी मुद्दाम झोप लागायचा प्रयत्न करतं होतो.

आमचं गांव हे खेडं गांव असल्याने बायांना पहाटे लवकर ऊठून आंघोळ पांघोळ करुन अंगणात सडासारवणं करुन तयारं व्हावं लागतं असे. काही बाया दिसं उजाडताचं वावरात जायचं असल्याने भल्या पहाटेचं चुलीवर भाजी भाकरी करायला लागायच्या. माझी आई या सर्वांच्या आधीच म्हणजे पहाटे कोंबड्याने पहिली बांग दिली रे दिली.....तेंव्हाच झापडमध्ये ऊठून आंघोळ वैगेरे करुन आंगणात सडा सारवणं करुन सुरेख अशी रांगोळी काढून, देव पुजाकरुन देवाजवळ व तुळशी दिवा लावतं असे. तशा गल्लीतल्या बाया थोडं ऊजाडायला लागलं तेंव्हाचं ऊठायच्या. आमचं किराणा दुकान असल्याने आमच्या घरच्या सर्वांना सकाळी लवकर उठून तयार व्हावं लागायचं..... त्यात आम्ही भावंड शाळेत जाणारी असल्याने आम्हालाही चार वाजताचं उठावं लागतं असे.

मी मात्र मस्त आरामात सगळयांत शेवटी ६ वाजता उठायचा...... तेही मी लवकर उठन्यास कानाढाईच करतं असे. आई ओरडून ओरडून थकायची. बाळया उठं रे लवकर...... शाळेतं जायचं आहे ना तुला? तुझे दादा आलेतर देतीलं रपाटे उठं फटकशी......! मी तोंडावर झावरं ओढतं झावरीत तोंडं घुपसून दुमडून पडतं आईला म्हणायचो..... आई झोपू देना अजून वेळ आहे शाळेला...... तशी आई संतापायची बाळया अरे सात वाजायला आले. केंव्हा उठशील? तयारी केंव्हा करशील? आणि शाळेतं केंव्हा जाशील?

आम्ही वडीलांना दादा म्हणत असत. त्यांना तसं आम्ही सर्व भावंडचं नाही तर गल्लीतले पोरं पोरी, बायां माणसंच नव्हे नव्हे तर गावाच्या सरपंच, पोलिस पाटलांपासून तर

अख्ख गांवच घाबरायचा....... कारण वडीलांचा स्वभाव कडकं असल्याने त्यांच्या समोर बोलायची कोणाचीचं हिंमत होतं नसे. माझी आई देखिल वडीलांना खुप घाबरतं असे. थोडं काही झालं आणि आई बोलायला लागली की ते जोरात खेकवायचे ! गप्प बसं तुला कायं समजतं. हा त्यांचा पेटन शब्द........ डोक्याच्यावर गेलं की मगं शिव्यांचा भडीमार सुरु व्हायचा. त्यामुळे सारेचं दचकायचे. तसं त्यांचं बोलणं वागणं सत्य आणि परखडं होतं. खोटं बोलणं त्यांना मुळीचं सहन होतं नसे. मगं त्यांच्या समोर कोणी रुस्तम जरी आला तरी ते त्याला सुनवून टाकायचे. त्यामुळे अख्ख गावं एकीकडे आणि ते एकटे एकीकडे होते.

एकीकडे होते म्हणजे गावाने त्यांना वाळीत टाकलं होतं; असं मुळीचं नव्हे. तर स्वभावाच्या बाबतीत गावांत त्यांच्या तुलनेत एकही जण नव्हतं...... त्यांच्या शब्दाला गांवभर मान होता. सर्वचजण त्यांचा आदर करायचे. अख्खा गांव त्यांना घाबरायचा इतका त्यांचा दरारा होता. वय ५० वर्षे, सफेद पायजमा शर्ट हा असा त्यांचा पेहरावं, त्यांची उंची साधारण साडेपाच फुट, अंगयष्टी बारिक, करारी आवाजं आणि चालणं अगदी अगदी तरुणांना चालायच्या बाबतीतं मागे टाकतील इतकं ते रपरप चालायचे. ते गल्लीतून आले रे आले. गल्लीतल्या बायां दुरुनचं दादांना बघून डोक्यावर पदर घ्यायच्या. ‘लई कडक स्वभाव आहे माय तेचा’ तोंडावरचं फटकारतो. अशा गावांतीलं म्हाताऱ्या कोताऱ्या बाया कुजबुजायच्या एक टायमाले विस्तू हातात धरताईन......... पणं तेचा स्वभावं नाही. असं सर्व बाया आईला नेहमीचं बोलायच्या. ‘दादा’ दुकानांवर बसलेले असल्यावर गि-हाईक दुरुनंच पाहून माघारी फिरायचे. बारकी पोरं दुकानावर काही घ्यायला आले तर दादांना पाहिलं रे पाहिलं तर ते एकमेकांना आपापसांतचं बारिक आवाजात बोलायचे. तु जायं रे...... लगेचं दुसरा त्याला बोलायचा नहीं भो मी नहीं जातं! तुचं जायं....... असं म्हणतं. गावांतली माणसं जरी आली तरी,  त्यांच्या समोर यायची कोणाचीचं हिंमत होतं नसे. असा त्यांचा स्वभावं.....

म्हणून आई अम्हा भावंडांना त्यांचाचं धाक दाखवायची. उठं रे...... तुद्दा आले बरं..... त्यांच नावं काढलं की त्यांच्या धाकानं मी ताडकनं ऊठून बसायचो......!

त्यादिवशी वडीलं किराणा माल घेण्यासाठी तालुक्याच्या गांवी गेले होते. त्या दिवशी आई मला आरोळया मारुन थकली होती. बाळया ऊठ रे पोऱ्या १० वाजायला आलेत. असं मुद्दामहून खोटं खोटं सागत होती. सकाळचे ८ वाजले असतील????? तसं आमचं घरं पुर्व दिशेला तोंड करुन असल्याने, आता माझ्या तोंडावर कोवळी सुर्यकिरणे यांयला लागली. हवेत गारवां होता त्यामुळे ऊठायची इच्छा होतंच नव्हती. डोळयावर सुर्य किरणं आली तेंव्हा कुठे मला मस्त गार साखर झोपं लागली होती. सकाळच्या प्रहरी लागलेल्या साखर झोपेत मला स्वप्नांकीत दुनियेत रंगून जणू स्वर्गात असल्याचा भास होत होता.

तितक्यांत बाहेर कुठून तरी पोरांचा कल्लोळ ऐकू येऊ लागला...... तो आवाज आमच्या घराच्या दिशेनं पुढं पुढं सरकत होता. सकाळी सकाळी एखादं रायरंगाचं सोंग यावं किंवा कधीही न पाहीलेली गोष्ट पाहून एखादी नवलाईची गोष्ट झाल्या सारखं आनंदानं बोंबा माराव्यात. असा तो प्रकार होता. पोरांनी एकचं गलका करायला सुरुवात केली. हय....... यं......... यं........ यं...... यं....... अशा एका सुरात पोरं आरोळया मारतं होती. तर खडखड.... खडंखडं.......... खडखड, खडखड अशा कर्नकर्कश डोकं ऊठाया लागलं होतं.

या आवाजानं मला आता जाग आली. आणि मी आथरुनातून ऊठून सरळ बाहेर गल्लीतच आलो. मुलांचा आवाज व त्या खडखडखडखड........ खडखडखडखड....... अशा आवाजानं जो तो हातातले कामंधंदे सोडून गल्लीमध्ये धावं घेत होते. बाहेरं येऊन बघतो तर कायं????? गल्लीतनं दोनं गाढवं पुढे पळतं होती तर हुलचिकारी पोरं त्या गाढवांमागे हयं..... यं...... हयं...... यं......... अशा बोंबा मारतं होते. या चमत्कारी पोरांनी त्या दोंन्ही गाढवांच्या शेपट्या एकमेकांना बांधून त्या शेपट्यांना एक बंद झाकणाचा पतरी डबा बांधला होता. या डब्यामध्ये दगडी भरलेले होते. तो गाढवाच्या शेपटीला बांधलेला खडे भरलेला बंद झाकणाचा

डबा जसं  जसां जमिनीवर आदळायचा तसं तसां डब्याचा खडखडखडखड........ खडखडखडखड.......... असा जोरजोरांत आवाज होता. या आवाजांमुळं भेदरलेली ती दोन्ही गाढवं जीवाच्या आकांगतेने सैरावैरा पळतं सुटतं होते. या गाढवांमागे गावातली पोरं हैरे.......... है..... गधडं रे गधडं....... असं एका सुरातं म्हणतं बालपणी पुस्तकांत वाचलेल्या त्या गोष्टीतील पुंगीवाल्यामागे पळावं अगदी तशी पळतं सुटतं होती. हा सगळा प्रकार बघूनं बाया माणसांना हसू आवरलं जात नव्हतं. चांगली पन्नास ते शंभर उघडी, नागडी,  बारीक, सारिक तसेचं काही बारा पंधरां वर्षाची हुल्लड पोरं त्या गाढवांमागे कमरे वरुन निसटणारी चड्डी वरं करतं  तरं दुसऱ्या हाताने नाकाचा शेंबुड पुसतं धावत होती. ही गाढवांची वरात ज्याच्या घराजवळ यायची त्या घरांत कोणी पोरं असली तर ती पोरं देखिलं एखादा मोर्चा रस्त्याने जातं असला त्या मोर्चामध्ये जशी माणसे सामिल होतं जातात आगदी तसंच ही पोरं त्या गाढवांमागे धावणाऱ्या पोरांच्या लेंढारात घुसत होते. काही पोरांच्या आया, आज्या  या पोरांना आवाज देत. ओ पोऱ्या जाऊ नको रे...... तिकडे शिवराम बाबा आहे. असं म्हणून पोरांना शिवराम बाबाचा धाक दाखवतं पोऱ्याने या पोरांसोबत जाऊ नये म्हणून मज्जाव करतं होत्या. पोरं न जुमानता ठेपारांमध्ये सामिल होत होते. तर काही शिवराम बाबाच्या धाकानं माघारी फिरतं वट्यावरच्या वट्यावर ऊभे राहून तर काही अंगणातून या गाढवाच्या धिंडीची गंमत पाहतं होते. तर यांपैकी अगदीच बारकी पोरं गाढवांना बघून तर काही शिवराम बाबाचं नुसतं नावंच काढताचं भेमकाऊन रडत, रडत घरात लपून बसतं होते.

शिवराम बाबा म्हणजे गावातील पोरांचा कर्दनकाळ होता. पायाच्या टाचेपासून साधारणतः  एक बिल्लास अंतरावर असलेली बांडी पॅन्ट, अंगात धाराधारांचा मळक्या रंगाचा शर्ट आणि त्या शर्टाच्या दोन्ही हातांच्या बाह्या दंडापर्यंत वाळलेल्या रंगाने काळा, भले मोठे डोळे, डोक्यावर कधीतरी तेल लावतं असल्यामुळे रुखटं पटकं झालेल्या पांढऱ्या झालेल्या कोंबड्याच्या तुऱ्याप्रमाणे उचकणारे केसं तर एका हातात पेटती बिडी ओढतं...... रस्त्याने चालत येतं असतांना एखादी लहान पोरगा किंवा रडतांना दिसली तर शिवराम बाबा जोरात ओरडायचा...... यु का

रे पोऱ्या..... आणि एखादा लहान पोरगा किंवा पोरगी दिसली की शिवराम बाबा त्यांच्यावर मोठं मोठे डोळे वटारायचा. एखादी चुकूनही शिवरामबाबाच्या तावडीत सापडला रे सापडला मग त्याची काही खैर नाही. "शोले" चित्रपटात लहान मुलगा झोपला नाही तरं त्याची आई म्हणायची बेटा सो जा वरना गब्बर आ जायेगा असं गब्बर सांगायचा..... त्याला लहान मुलं घाबरायची की नाही????? हे माहीत नाही! पण आमच्या गावच्या शिवरामबाबाला मात्र गावांतील सर्व लहान मुलं मुली घाबरतं असे. शिवराम बाबा या पोरांना पकडून त्यांचे हात पिळे, तर कधी त्यांचे कान पिळून लालबुंद करतं तर कधी कधी त्यांच्या गालाचा कडकाऊन चावा घेत असे. त्यामुळेच खरं गावातील सर्व पोरं शिवरामबाबाला घाबरत असतं. काहींना तर शिवरामबाबाला बघूनच चड्डीत हागमुत व्हायची.

मी ही शिवराम बाबाला आधी खुप घाबरायचो...... एकदा मी गल्लीतून जात असतांना शिवराम बाबाच्या हातात चूकून सापडलो होतो. त्यावेळी आई बाहेर उकीरड्यावर घरातील पुंजा (केर, कचरा ) फेकण्यासाठी गेली असता मी देखिल आईच्या मागे मागे चालत जात होतो. आई माझ्यापुढे काही अंतरावर चालत होती. मी आईच्या मागे चालत येतोय हे आईला ठाऊकच नव्हतं. त्यामुळेचं आई माझ्याकडे लक्ष नदेता  पुंजा फेकण्यासाठी उकीरड्याकडे चालत जातं होती. त्यातचं शिवराम बाबाने मला पकडलं आणि माझ्या गालाचा जोरात अगदी करकचून चावा घेतला. मी आकांकतेने रडायला लागलो. आईने माझ्या रडण्याचा आवाज ऐकला आणि आई तशीचं घाईघाईने उकिरड्यावर पुंजा फेकून तशीच माघारी फिरली. मला जवळ घेत माझे आश्रु पुसत बोलली. माझं रडणं मात्र थांबत नव्हतं. आईने जवळ घेऊन माझ्या गालाकडं तिच लक्ष गेलं. कोणी मारलं? कोणी मारलं तुला? विचारु लागली. मी त्यावेळी मी दोन अडीच वर्षाचा होतो. मला कोणी मारलं हे धड सांगताही येत नव्हतं म्हणून मी नुसतं बाबा , बाबा म्हणतं तिकडे बोट दाखवलं. तेच शिवरामबाबा त्यांच्या घराच्या ओट्यावर बसले होते. ही गोष्ट आईच्या लगेच लक्षात आली.

हो ना हो याचं चावं शिवराम बाबानेच घेतलं असावं? माझं रडणं काही थांबत नव्हतं मी आता चांगलोच खिजून पडलो होतो. आईने मला कडेवर उचलून घेतं माझी खुप समजूत काढली मला उगं करण्याचा प्रयत्नकेला. तरीही माझ रडणं काही थांबेना. आईला आता चैन पडत नव्हती. तिचा जीव खालीवर होतं होता. आई आता संतापली आणि शिवरामबाबाला बोलली. काका एवढ्या जोरात चावता का? पोऱ्याले.... तेचा गाल पहा बरं केवढा लाल झाला. सगळे दात उमटून गेले तेच्या गालावर..... अनं कानबी सूजून हिंगोळ सारखा लाल झाला. पोऱ्या जर भेमकावला, ताप काढला तर? काय भावशिर पडीन? तुले राग आला चालीन काका येच्यापुढे मह्या पोरानले घाबरव्याच नहीं तुम्ही. आई संतापात शिवराम बाबाला बोलली.

अम्हा भावंडांमध्ये मी सर्वात लहान असल्याने आईचा माझ्यात खुप जीव...... आईच बोलनं संपत नाही तोच शिवराम बाबा आईला बोलले. बस व पोरी इंदू नको बोलू एवढं..... नही घेणारं तुह्या पोरांच नावं येच्यापुढे ! बोलणं झाल्यावर आई मला घेऊन घराकडे आली. त्या दिवसांपासनं शिवराम बाबाच मला घाबरावनं बंद झालं होतं; व माझंही शिवराम बाबाला घाबरणं खऱ्या अर्थाने पुर्णपणे बंद झालं होतं. मग मला कोणीही शिवरामबाबाचं नांव घेऊन घाबरवण्याचा प्रयत्न केला तरी आई मला धीर देत असे. नाही रे काही नाही करत तो बाबा..... मला आतून भिती तर वाटायची पण आई खरच सांगतेय म्हणून जरा धीर पण यायचा...... हे आता नित्याचच झालं असल्याने माझ्यामनातं शिवराम बाबा विषयी असलेली भिती तेंव्हापासून नाहीशी झाल्याचे आई सांगे. म्हणून माझा शिवराम बाबाला घाबरायचा प्रश्नच येत नव्हता.

तसं तर शिवराम बाबाला दहा ते पंधरा वर्षाची मुलही तेवढीच घाबरत असत. आता त्या गाढवांची वरात आमच्या घरापर्यंत पोचली. मी देखिल इतर पोरां सारखं झोपेतून ऊठल्या ऊठल्या त्या पोरांच्या गर्दीत जावून सामिल झालो. आई मला आवाज देतंच राहीले. ओ बाळया अरे थांबरे..... कुठे चालला त्या पोरांमध्ये आधी दात घासं , तोंड धू आंघोळ कर मग जा तुला जायच तिथं...... मी आईचं काही न ऐकताच आनंदाच्या ओघात मुलांबरोबर पळत सुटलो. अम्हा सर्व मुलांना या गोष्टीची मज्जाच वाटत होती. कारण याआधी आम्ही गाढवं पाहिली होती खरी

पण असला त्यांच्या शेपटीला  शेपटी बांधून व त्याला खडखडखडखड...... खडखडखडखड....... असा आवाज करणारा डबा बांधलेला व त्या डब्याच्या आवाजासरसे भेदरलेल्या स्थितीत पळत सुटणारी गाढवं हा प्रकार आमच्यासाठी नवखा होता. त्याचं आम्हाला जास्त नवल वाटतं होतं. ते दृष्य पाहून आ मज्जा येत होती.

त्यावेळी मी इयत्ता तिसरीच्या वर्गात शिकत होतो. तेंव्हा मी नऊ वर्षाचा असेल? आता ही धिंड गल्ली बोळातनं पुढं, पुढं चालली होती. पुढे गाढवं अनं मागे पोरांच लेंडार आसं काहीसं हे दृश्य होतं. पोरं ओरडायची...... पोरांचा आवाज ऐकुन गाढवंही ह्याहू..... ह्या हू..... असं ओरडतं एखाद्या शर्यतीत पळावं अशी जीव तोडून पळत होती. आता ही गाढवाची वरात आमच्या घराकडून उत्तर दिशेकडे गल्लीतून पुढे चालली होती. काही बाया माणसे या पोरांना हटकत होते. तर काही शिव्याही देत होते. पण आम्हा पोरांचं त्यांच्या बोलण्याकडे लक्षच नव्हतं.

आम्ही आमच्या तंत्रीतच गाढवांमागे पयत होतो. रस्त्याने कोणी ओळखीचं दिसलं तर एकमेकांआडे तोंड लपून गुपचूप चालत होतो. या गाढवांच्या वरातीत आमच्या बाहेर पुऱ्यातील पोरांच लेंडारच जास्त होतं. आम्ही ज्या भागात राहत होतो त्या भागाचं नांव होतं. “बाहेरपुरा बाहेर पुऱ्यातली सर्वी पोरं लई आपित्तर”..... अख्या गांवची पोरं एकीकडे तर पुऱ्यातली पोरं एकीकडे, असा त्यांचा दरारा होता.

पुऱ्यात राहणारी मोजकीच पोर यांच्यापासून अलिप्त जी यांच्या भानगडीत कधी पडत नसत. त्यांच्या घरचेच या मुलांना त्या आपित्तर पोरांमध्ये जाऊ देत नसत. जाऊ देत नसत म्हणण्यापेक्षा त्यांच्या सावलीत सुध्दा ऊभं राहू देत नसत. इतके ते विचित्र होते. या टुक्कार पोरांपासून दूर रहायचं....! असं आमच्या घरचे आम्हाला बजवायचे. या विचित्र पोरांपासून अलिप्त राहणाऱ्या मुलांपैकी मी एक होतो. पण काय करणार????? या मुलांमध्ये खेळायला जाण्याशिवायही आम्हाला गत्या नव्हती. कारण गल्लीत यांच्याशिवायही खेळायला कोणी नसायचं....... दिवसभर ऊन्हात फिरणे, गोट्या भोवरे खेळणे, नदीमध्ये क्रिकेट खेळणे, विट्टीदांडू,

घोडीघोडी कितनेकी, सूरपारंब्या, दिवसभर चिंचा, बोरं, आंब्याच्या कैऱ्या, कवठं, जांभूळ तोडायला जाणं, रानंवनं पायाखाली तुडवणं, झाडंवडं चढणं, मधाचं पोळं हुलवणं, कधी मध तर कधी चिंचा, बोरं, आवळे, कवठं, जांभूळ, आंबे शेतातून आणून ते गावांतीलच एखाद्या दूकानदाराला विकत देणं किंवा त्या मोबदल्यात कधी पैसे किंवा त्यांना लागणारी वस्तू ते घेत असतं..... जास्तकरुन ते पैशेच घ्यायचे मग त्यांना मिळालेल्या पैशातून ते कधी जुगार खेळायचे तर कधी जमिनीवर असा छोटा खड्डा पाडून दुरुन असे चिल्लर पैसे फेकायचे व त्याला छोट्या गोलाकार दगडाने किंवा मोठ्या लोखंडी वायसरने नेम धरुन मारायचे आणि जो बरोबर नेम धरुन सांगितलेल्या पैशाला मारायचा तो जिंकला असा तो खेळ होता. यातून ते कधी जिंकायचे तर कधी हारायचे सुध्दा. मगं जिकलेल्या पैशातून हे गोळया, बिस्किटं, पोंगे, शेव चिवडा, कधी हाँटेलवरुन भत्ता (शेवमुरमुऱ्याची कोरडी भेळ) आणून सर्व मिळून खातं बसायचे तर कधी चोरुन लपून बिड्या, सिगारेट आणून नदीमध्ये जाऊन कधी शेतात जाऊन ओढतं बसतं.

कधी कधी तर हद्दचं व्हायची ही पोरं मिळालेल्या पैशातून दारु आणून गुपचूप पित बसत. आणि आपापसांत भांडणं करुन एकमेकांच्या छातडावरही बसायचे. यांची भांडणं सुरु असतांना यांना कुणी आवरलं तर ठीक नाहीतर हे एखाद्याचं डोसकच फोडून रक्तभंबाळ करायचे इतके ते जबर होते. म्हणूनचं या पोरांना अख्ख्या गावची पोरं घाबरायची. यांचे आई वडीलं शेतात मोलमजूरी करत असतं. ते सकाळी शेतात कामासाठी निघून गेले तर मगं यांच्याकडे ध्यान ठेवणार कोणी नसायचं म्हणून हे शाळेत न जाता, हा असले उद्योग करत बसायचे.

कधी कधी ते आमच्या दुकानांवरही चिंचा, बोरं, आंब्याच्या कच्च्या कैऱ्या आणून विकतं द्यायचे. तर कधी आम्ही तालुक्याच्या गावांवर गेलो की बाजारातून विकत घेऊनं यायचो. म्हणून खरंतर आम्हाला इतरांसारखं जावं लागत नसे. या मुलांमध्ये दहा वर्षापासून ते चांगली शहाणी टक्करबंद अठरा ते वीस वर्षा पर्यंतची सारी पोरं होती. यांच्या गृप मध्ये असलेल्या प्रत्येक मुलाचं नांवही तितकचं युनिक होतं. ज्यांमध्ये ढेम्या, दगड्या, पदांबड्या, सत्या, पिस्तोल्या, हेवड्या नब्या, तीस नंबर, भुरा डूक्कर, सोन्या डेडोर, मंचली, कोयला, झ्यांग्या, हेल्याचं मुंडक, काया

बंड्या, पिवळा पिंट्या, धाकल्या, फेंगड्या, जाडशेप्या अशी निरनिराळी नांवे होती. यांत काही मुस्लीम समाजाचीही पोर होती. यांचा गृप म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचं जिवंत उदाहरण होतं;

आणि या सर्वांचा बाँस जो या गाढवांच्या वरातीत गाढवांच्या मागे, शरीराने जाडंसर, उंचपुरा, अंगात हापबाहीचं लाल रंगाचा मनिला घातलेला, हाप पँन्डला मागे दोन ठिगळं, मोंठ्ठ डोकं...... डोक्यावर बारीक केसं तेल न लावल्याने भुरकट दिसणारे..... भरदार शरीरयष्टी अनं रफ आवाज असलेला एका हातात. संडासला जायचा पतरी डबा तर दुसऱ्या हातात लांबलचक झाऊची वल्ली फोकी (छडी) घेऊन या पोरांच्या लेंढाराचं प्रतिनिधीत्व करतं. गाढवं पळलं तर ठिक, नाही तर त्याला हातात असलेल्या झाऊच्या वल्या फोकीचा रपाटा देतं. है...... गधडं है....... असं म्हणतं पळवतं सोडणारा व सर्वांच्या पुढे स्वतः पळणारा बाहेर पुऱ्यातील पोरांची आण, बाण , शान असलेला...... गांवकऱ्याकडून आपल्या उपद्रवीपणाचा कळस गाठून किताब मिळवणारा....... " चवल्या" सर्वांत पुढे पळतं होता.

तसं त्याचं त्याच्या बारशाच्यावेळी त्याच्या घरच्यांनी ठेवलेलं नांव दुसरं म्हणजेच 'राहूल' होतं. पण त्याला त्याच्या असल्या हरकतींमुळे गांवातील बाया व माणसांनी त्याला "चवल्या" ही पदवी बहाल करुन त्याचं नांव चवल्या ठेवलं होतं.आणि विशेषः म्हणजे गांवभर तो त्याच नावाने ओळखला जाई. त्याच खरं नांव फार कमी लोकांना माहीत होतं. म्हणून त्याला सारे चवल्या म्हणूनचं हाक मारत असतं. बाहेरच्या पोरांच तर सोडा पण त्याच्या गृपमधील जरी कोणी मुलगा चवल्या बोलला रे बोललां तर तो त्याला असा पिटायचा की पुन्हा त्याला तोंडावर चवल्या बोलायची कुणाची हिंमत होतं नसे. इतका तो जबर होता. गांवात काहीही घडलं तर सर्वात आधी हे काम चवल्याचच असणार?? म्हणून त्याचच नांव घेतलं जायच...... प्रत्येक ठिकाणी तो हजरच असायचा.

इकडे आता ही गाढवांची वरात चांगलीच पुढे सरकली होती. मी देखिल या पोरांसोबत पळत होतो. चवल्याच्या गृपमध्ये सदैव सक्रीय असलेला चवल्याचा जीवलग मित्र जरासा म्हणण्यांपेक्षा चांगलाच तोतरा बोलणारा "ज्यांग्या". तसं ज्यांग्याच दुसरं नांव ग्यानबा

होतं. आता तो कुठूनतरी एक प्लास्टीकच्या फुलांचा बैलांच्या गळयात घातला जाणारा हार घेऊन आला. आणि त्याने तो हार या गाढवांच्या गळयांत टाकून उड्या मारतं पळत सुटला..... आता या वरातीला अधिकच रंग चढत होता आणि गाढवांमागे पळणाऱ्या पोरांवरही आनंदाचं वातावरण दिसू लागत होतं. त्यांचा आनंद अधिकच व्दिगुणीत झाला होता.

गाढवांची वरात काहीसी पुढे गेली. त्या गल्लीच्या कोपऱ्यालाच एक खऊट म्हातारीचं घर होतं. ती स्वभावाने खाष्ट होती. गाढवांमागे पळणाऱ्या पोरांचा कल्लोळ तिच्या कानी गेला. तसं तिला डोळयाने वयोमानाने कमीच दिसायचं....तिने आपल्या नातवाला विचारलं जारे क्या आया बाहरं इतना शोर कायको है? देख तो जरा.....! तिचा नातू आजीने सांगितल्या प्रमाणे बाहेर काय चाललंय? हे पाहण्यासाठी ओट्यावर आला. बाहेर सूरु असलेलं हे दृश्य बघून आजीला सांगायला आत गेला.

ती म्हातारी बाहेर आली. कोण शेतसं ह्या गदाअंडा? काय बोमा मारीरायनांत कवयसनां...... गल्लीमा नुसता वत आणतसं असं अहिराणी भाषेत बोलून शिव्या घालू लागली. हे युवराजचच गंध आंड आशिन तेच्या शिवाय नही कोणी! चवल्या कथाना....... असं म्हणू लागली. म्हणजे म्हातारीने अगदी बरोबर ओळखलं होतं. की हे काम चवल्याचच आहे असं. पोरं या म्हातारीच्या घराजवळ आल्यावर आता मुद्दाम जरा जास्तच बोंबा मारत होते. इकडे पोरांच्या आवाजानं म्हातारीचं डोकं अधिकच चढत होतं. व डोक्याचा पाराही......... म्हातारीने शिव्यांची पाखड घालायला सुरुवात केली. म्हातारीकडे लक्ष न देता पोरं जोरांत बोंबा मारत पुढे पळत सुटले.

या म्हातारीचा आणि या गल्लीतील पोरांचा पहिल्यापासूनच छत्तीसचा आकडा होता. विशेष करुन चवल्याचा.......कारण ही म्हातारी जशी तिच्याच बापाची गल्ली आहे अस समजत आम्हा पोरांना गल्लीत खेळूच द्यायची नाही. ती सतत शिव्या द्यायची. आम्ही गल्लीत खेळत असतांना आमच्या अंगावर पाणी फेकायची. सगळे तिला घाबरत. फक्त एकमेव चवल्याच

असा होता की, तो तिला न जुमानता मुद्दामहून जास्त करतं. तिथच खेळायचा. वेळ पडली तर शिव्याही द्यायचा. म्हणूनच ही म्हातारी चवल्याचा काट करायची. म्हातारीचं अनं चवल्याचं मुळीच जमत नसे.

आता गाढवांची वरात जराशी पुढे सरकली. एक म्हातारा सकाळच्या कोवळया ऊन्हात खाट टाकून बसला होता. म्हाताऱ्याच्या अंगणात गाढवांची धिंड पोहचली म्हाताऱ्याला जरा कमी दिसायचं. पोर जरा चवली होती. बाबा ऊठं म्हैस आली म्हैस असं म्हणत म्हाताऱ्याला चिडवू लागली आणि जोरजोरांत आरोळया मारु लागलीत. म्हाताऱ्याला पोरांचं बोलणं खरं वाटलं. म्हातारा ताडकणं खाटेवरुन ऊठला. इकडे पळावं की तिकडं पळावं हे म्हाताऱ्याला समजेनास झालं. पोरांना मज्जा येत होती. म्हातारा बोलला...... काय वातं झाला या मेल्यांना? इथेचं लंबे होता ते........ म्हातारा नेहमी बायकी स्वरातच बोलायचा म्हणून म्हाताऱ्याची सगळेच टिंगल करायचे.

आता या म्हाताऱ्याला काही सूचेनास झालं. म्हैस जर आली रे आली तर आपलं काही खरं नाही. असं आता म्हाताऱ्याला वाटलं. पोरं आणखीनचं जोरात ओरडायला लागली..... कोणी म्हाताऱ्याची टोपी ओढू लागलं कोणी धोतर ओढू लागलं. म्हातारा चांगलाच भांबाळला, भांबाळलेल्या आवस्थेत पळत सुटला..... पळायच्या गडबडीत म्हाताऱ्याच धोतरं खाटच्या माच्यात अडकलं आणि म्हातारा खाली अनं खाट म्हाताऱ्याच्या अंगावर. म्हाताऱ्याची म्हातारी समोर येतं होती. म्हातारीनं हे दृश्य दुरुनच पाहीलं. म्हातारीनं हातात काडी घेतली आणि या पोरांमागे शिव्या देत पळत सुटली.

आता काहीसं हे दृश्य असं होतं. पुढे दोन गाढवं गाढवांच्या मागे पोरं पोरांच्या मागे काडी घेऊन मारायला पळत सुटणारी म्हातारी...... गल्ली गल्लीतनंही ही वरात चालली आसतांना नेमकं हा काय प्रकार चाललाय? हे पाहणाऱ्याच्या लक्षातच येत नव्हता. लोक पोट धरुन हसतं होते. शांताबाईने कधी गाढवं घेतली? असा प्रश्न लोकांना पडला. परंतु ज्यांना

माहितच नाही त्यांना असं वाटलं की हे गाढवं या म्हातारीचे असावेत? या पोरांनी या गाढवांच्या शेपटीला डबा बांधून त्यांची धिंड काढली असावी? असं वाटतं होतं. काही जणांनी शांताबाईला विचारलं सुध्दा, काय शांताबाई गाढवं तुमची आहे का? म्हातारीला अशा प्रश्नांचा संताप येत होता. कारण लोकांना घडलेला प्रकारचं ठाऊक नव्हता. त्यामुळे जवळपास पन्नाशेक लोकांनी शांताबाईला हाच प्रश्न विचारला होता. पोरांमागे पळून पळून म्हातारी दमली. शांताबाई नांव होतं म्हातारीच. त्यावेळी शांताबाई..... शांताबाई..... लटकमटकं लटकमटकं असलं काही गाणं नव्हतं. नाही तर ही पोरं गाणं म्हणतं म्हातारीपुढं नाचायलाही कचकली नसती. आता शांताबाई दमली आणि एक जागी बसून गेली. गाढवाची वरात आता दुसऱ्या गल्लीत वळली.

दोन्ही गाढवं आता खुप थकली होती. त्यांना धड चालताही येतं नव्हतं. पण काय करणार बिचारी त्यांना चालावं तर लागणारच होतं. नाही चाललं तर चवल्या त्यांना सपासप वल्ल्या छडीने पाठीवर मारत होता. आणि तो डब्याचा खडखडखडाखड....... या आवाजाच्या दहशतीनं ते चांगलेचं गांगरले होते. मग त्यांच्याकडे पळण्याशिवाय दुसरा कुठलाही पर्याय शिल्लक राहिला नव्हता. पळलं तर बरं नाहीतर मार पक्का हे आता सुत्र झालं होतं. मार वाचवायच्या धाकानं गाढवं जोरजोरात पळत होती. आणि त्या पाठोपाठ पोरही धापा टाकतं पडतं, झडतं पळत होती. काही पोरं आता घराकडे माघारी फिरु लागली होती. काही बारकी पोरं घराचा रस्ता चूकल्याने रडत रडत गल्लीनं पळतं होती. तर काही पोरांच्या आया आपापल्या मुलांना शोधत या पोरांना हाका मारत होत्या.

आता पुढच्या गल्लीच्या तोंड्यावर गांवच्या पोलिस पाटलाचं घर होतं. आणि बाजूनेच एक रस्ता गावाला वळसा घालतं गोपाळवाडी, नारायणपुरा मार्गे राजवाड्याकडून (हरिजनांची वस्ती) थेट गांवाच्या बाहेर निघतो. तर एक गावांत येतो. पोलिस पाटलाच्या धाकानं चवल्यानं आता हा मोर्चा पोलिस पाटलांच्या घराकडून न नेता दुसऱ्या रस्त्यानं वळवला..... गाढवांची वरात ज्याही गल्लीत जायची त्या गल्लीत तोचं जल्लोष बघायला मिळत होता आणि प्रत्येकाच्या

चेहऱ्यांवर हसू उमटतं व्हतं. वरात गोपाळवाडी, नारायणपुरा मार्गे राजवाड्याच्या पहिल्या गल्लीत पोहचली.

पोरांच्या गोंगाटानं जो तो घरांबाहेर येऊन पाहू लागली. पक्या आंगणात खेळत होता. गाढव वरातीत असलेल्या पोरांची कलकल त्याच्या कानी गेली. त्यानं वळून बघितलं बघतो तर, काय दोनं गाढवं पुढे अनं त्यांच्या मागे लेंढार हे चित्र त्याच्या दृष्टीस पडलं. लेंढारातल्या एका पोऱ्याला चवल्यानं हळूचं कानात सांगितलं. ओ सम्या एक काम करं पक्याले डफडं घेऊन बल्हावं लवकर.....! पक्या यांच्यांच गृपचा मेंबर होता. पक्या मातंग समाजाचा असल्याने त्याचा बाप डफडं वाज्याचं काम करे..... आज पक्याचा बाप वाज्याची शाई नसल्यानं घरीचं होता. सम्या पयत पयत पक्याच्या घरा पाशी आला. पक्यावं ओ पक्या आसा हळूचं कनं तेनं पक्याले आवाज देला. पक्या बाहेरच खेयत व्हता. पक्यानं सम्याले इचारलं..... काय रे सम्या काय म्हणतो? सम्यानं पक्याले डफड्याचा इशारा हातानं केला. पक्याचा बाप बाहेर पाचचा मग्गा मारुन बिडी पेत त्याच्या सोबत्यांसह बसला होता. पक्यानं सम्यानं डोळयांनं खुनावून तेचा बाप तिथे खाटीवर बसला असल्याचं सांगितलं.

सम्या हळूच पक्क्याकडे आला अरे चाल लवकर चवल्यानं तुले डफडं घेऊन वाज्याले बल्हावलं. पक्यानं इकडं तिकडं बघितलं अनं त्याच्या बापाची नजर चुकवत घरांच्या भिंतीवर खुंटीला टांगलेलं डफडं हळूचं काढतं. या लेंढाराच्या दिशेनं पळत सुटला..... पक्याले पाहून चवल्या बोलला.... कारे पक्या एवढा टाईम लावता का? याले. बरं जावदे तु पहिले वाजाडं...... हाप बाहीचं पांढरा मळकट त्याचे खालीवर बटनं लावलेला मनीला, हाप खाकी पँन्ट करधोड्यात अडकवलेली. काळामटक पक्या डफडं लपाडतं चवल्याले सांगत व्हता थांबणारे मह्यघर त जाऊदे पुढे वाजवतो ना! मह्या बाप बशेलहे इथे खाटीवरं तो यु नही देणार ना माले. चवल्या मात्र पक्याला डफडं वाजाडं असचं सांगत होता. पक्या वाजाड बरं नही तर पाय एकचं बुक्का घालीन तुले. चवल्या बोलला. पक्या मात्र त्याला त्याच घर ओलांडून पुढं वाजवतो असच सांगत होता.

आता ही वरात पक्याच्या घराच्या थोडी पुढे सरकली. तोचं पक्याले पोरं म्हणू लागली पक्या वाजव रे...... पक्यानं डफडं वाज्याले सुरुवात केली. पण पाहिजे तशी मजा येत नव्हती. या पोरांपैकी एक पोरगा बोलला. पक्या चांगली चाल लावं..... एक बोलला भवानी वाजाड भवानी..... पक्यानं भवानी वाजायाले सूरवात केली. ढढना.... ढढना.... ढढनाक....टांग टांग.......... ढढना.... ढढना.... ढढनाक....टांग टांग...... पोरं नाच्याले लागली. है य........ अशा बोंबा मारु लागली.

मध्येच चवल्यानं पक्याले डफडं वाजवायचं बंद करायला लावलं. पक्या आखाडा वाजवं आखाडा..... चवल्याचं ऐकून झ्यांग्या पुढे येतं पक्याले बोलला.... पत्या आथाडा वादाड आथाडा..... झ्यांग्याचं तोतरं बोलणं ऐकून पोरं पळता पळता हसू लागली. झ्यांग्यानं हसणाऱ्या पोरांनले गाया द्यायले सूरवात केली. ओ तुमच्या मायत्चे पुढे बोलीन.

तोचं पक्यानं डफड्यावरं जीभ बाहेर काढतं एक पाय जरा मागे वळवतं खाली वाकत थाप मारली. अनं आखाडा चालं वाज्याले सूरवात केली. ढांगा ढढांग ढांगा......टटांग....... ढांगा ढढांग ढांगा टटांग...... जशी प्रत्येक देशाचा राष्ट्रीय पक्षी, राष्ट्रीय किंवा प्रादेशिक पक्षी असतोना तशी ती आमच्या गांवची पेटंट राष्टीय आखाडा चाल होती. ती वाजली रे वाजली तर काठी टेकतं चालणाऱ्या म्हाताऱ्याच्या आंगात पहेलवान संचारुन तोही तरण्या पोरांसारखा ताठं नाचायला लागयचा. गांवातील लहांनां पासून मोठ्यांपर्यंत, तरुणां पासून म्हाताऱ्यांपर्यंत सर्वांची ती लोकप्रिय अशी आखाडा चालं होती. ही चाल बहूदा कुस्त्यांच्या दंगलीत जेंव्हा दोन पहिलवान कुस्ती खेळण्यासाठी आखाड्यात उतरतात तेंव्हा वाजली जाते. पण आमच्या गावांत ही चाल, कोणाच्या गणपतींमध्ये, नवरात्रात, जत्रेच्यावेळी, कुणाच्या जावळांत, साखरपुड्यात, लग्नात, नवसांत, मिरवणुकीत, मोर्च्यात एवढंच नव्हे तर तर कोणी वारलं तर त्याची शेवटची ईच्छा म्हणूनही आखाडा चाल वाजवली जायची........ एकदा तरं गावांतील एक म्हातारा वारला असतांना त्याच्या अंतयात्रेत एकदा आखाडा चालं वाजवावी अशी त्याची ईच्छा होती.

म्हाताऱ्याला गांवातून खांद्यावर घेऊन जातं असतांना एरव्ही नेहमी वाजवली जाणारी डफड्याची चाल वाजवली जातं होती. तोचं एक त्या म्हाताऱ्याचा कोणी नातेवाईक वाजवणाऱ्यांजवळ आला आणि हळूच वाजवणाऱ्यांच्या कानात कुजबुजत सांगू लागला..... आखाडा वाजवा आखाडा..... वाजणाऱ्यांना प्रश्न पडला इथं म्हातारा मेलाय अनं हा आखाडा चालं वाज्याचं म्हणतोय? काय करावं? जावूदे आपलं कायं जातं कोणी बोललं तर सांगू या माणसाचं नांव येनचं सांगलं वाज्याचं म्हणून डफडं वाजणाऱ्यानं आखाडा चाल वाज्याले नुसती सुरवातचं केली. काय विचारता गंमत ढांगा ढढांग ढांगा........ ढांगा ढढांगढांगा..... असं वाजताचं म्हातारा किरडीवर ऊठूनचं बसला ना........ म्हणजे आखाडा चालनं मरेल माणूसबी जीत्ता होतो. तर ती आमच्या गांवची किती फेव्हरेट चाल आशीन विचार करा. पण तो म्हातारा किरडीवर ऊठून बसल्या पासून मात्र लोकांन कोणाच्या अंतयात्रेत ही चालं वाजवणं बंद केली.

आता पक्या जोरजोरांत डफडं वाजवतं होता. पोरं नाचतं होती. गाढंव पळतं होती. इकडे गाढवांचा मालकं आपल्या गाढवांना गल्लोगल्ली ढूंडाळत पाहत फिरत होता. कुण्या एकानं गाढवांच्या मालकाला सांगितलं असावं????? की तुमच्या गाढवांची गांवातून वरात निघालीयं...... म्हणून गाढववाला गाढवांना शोधतं पंचायतच्या दिशेनं आला. वाजा वाजतं असल्याने पोरांना अधिकच मज्जा वाटत होती. गावांत कोणी मंत्री आले की काय म्हणून लोक भिरभिरं पाहत होती. पोरं आरोळया मारत जोरजोरांनं नाचत होती. आता ही वरात शेवटच्या गल्लीनं पंचायतच्या दिशेनं पुढे येत होती. जो तो नाचण्यातं गुंग होता. सगळे भान हरपून नाचत होते. पक्या आपल्या तंत्रीत डफडं (हलगी) वाजण्यात गूंग झाला होता.

समोरुन गाढववाला येत असल्याचं चवल्याच्या लक्षात आलं. चवल्यान हळूच झ्यांग्याच्या कानात गाढववाला येत असल्याचं सांगितलं. झ्यांग्यानं ढेम्याच्या कानांत, ढेम्यानं पदामड्याच्या कानांत, पदामड्यानं मंचली च्या कानांत, मंचलीनं पिस्तोल्याच्या कानांत असं प्रत्येकानं एकमेकाच्या कानांत सांगत गाढववाल्याला पाहून एक एक पसारं होतं गेले. वरात पंचायती जवळ पोहचल्यावर गाढववाला पुढ्यात ऊभा होता. गांढवं त्याच्या मालकाजवळ येऊन

थांबलेत आणि एकटा पक्याच डफडं वाजवत होता आणि काही उरलेली बारकी पोरं नाचत होती. वाजीव.... वाजीवं..... बारीक, बारीक अजून बारीक वाजवं.... असं गाढववाला पक्याला म्हणत होता. पक्या तव तवं जोरात वाजत होता. गाढवंवाला पक्याच्या वाजण्यानं लालबुंद होऊन पक्याकडे डोळेवटारुन पाहत होता. पक्याला मात्र तो आपल्याला जोरात वाजीव.... आणखी जोरात वाजवं..... बारिक, बारिक असं मुद्दामहून बोलतोय की काय? हे त्याला कळतचं नव्हतं.

पक्याला डफडं वाजवायची लई हाऊस पण त्याचा बाप त्याला कधी डफडं वाजवूच देत नसे. कायं बी ठेवलं नाहीरे या वाजण्यात! काही मजा नाही उरली. तू नगं पडूस ह्या फंद्यात शिक म्होठा हो..... साहेब बन अन नांव कमवून चांगले दिस आन..... 'तुझ्या राज्यात आम्हाला आनंदात तरी जगता यावं' ही आशा आहे. पूर्वी कोणत्याही कार्यात डफड्याला मान होता. कोणाचं लग्न असो, साखरपुडा, नवसं, जाऊळ, मिरवणूकां असो वा मरणं धरणं सगळया कार्यात वाज्याची शाई भेटायची. पण आता डि.जे, महागडे महागडे बँन्ड आले. मग आपल्यासारख्या डफडे वाल्यांना कोणं इचारतं? आता एखादी कार्यक्रमात मोठ्या मुश्कीलनं वाज्याची शाई भेटली तर नशिब नाही तर बसा हातात हात घेऊन! किंवा कोणी मेलमिलं तरचं बोलवत्यात. त्यासाठी बी लोकं बँन्डबाजा लाव्याले लागले. मह्या बापानं मले शिकू देलं असतं तव्हा तर ही येळ आली नसती मह्यावर आता. म्हणून तुले सांगतो लेका या वाज्याच्या भानगडीत पडू नको. तुले मी लई शिकाडीन तु कायजी करु नको. असच सारखं म्हणायचा. कारण आता या धंद्याला खरोखरं उतरती कळा लागण्याने अनेक कुटूंबियांना उपासमारीचा सामना करावा लागतोय. हे पक्याच्या बापाला ठाऊक होतं म्हणूनचं तो त्याला त्याने या डफडं वाजवायच्या धंद्यात पडू नये म्हणूनं नेहमी सांगायचा. म्हणूनच तो त्याच्या पक्याला डफड्याले कधी हात लावू देत नसे. पक्या तेच्या मायले सांगायचा माडे माले बापू का बरं डफड्याले हात नही लावू देतं????? माले बी वाजता येतं. नही रे तू लहान आहेस तूनं टाकलं फोडून तर डफडं?? काय भरोसा तुया? एकच रोजी रोटीचं साधनं आहे आपलं. तेबी गेलं तं मंग काय करशिल? बशिन तपिल्याले राख लावतं..... पहिलेचं खायाचे वांदे झालेत घरात आनं तुया बापू पिऊन पिऊन ढेरं झाला कायं कमावलं आयुष्यात तेनं? तू नगं बनू

तेच्या सारखा वाजणारा..... तू शिकून साहेब बन...... असं म्हणून समजावतं असे. पण पक्या हट्टी होता. तो एक पुठ्ठा घेऊन गल्लीतल्या पोरांबरोबर काड्या घेऊन वाजवतं बसायचा. शाळेत गेला तर गेला. नाही तर शाळेत दप्तर ठेऊन मधल्या सुट्टीत गुपचूप फरार होऊनं, घरच्यांना समजू नये. किंवा कोणाला सूगावा लागू नये....... हा शाळा सोडून बाहेर फिरतोय की काय? म्हणून तो आमच्या बाहेर पुऱ्यातील पोरांसोबत खेळत बसायचा. चवल्याच्या गृपमधील काही पोरं पक्याच्या वर्गात होती. त्यामुळे पक्या आणि ही पोरं संगनमताने प्लँन करुन शाळेतून पळून येत असतं. कधी कधी पक्या घरी कोणी नसल्याची संधी पाहून घरीच बसायचा...... आणि संधी मिळालीरे मिळाली तेंव्हा डफडं घेऊन वाजवतं बसायचा..... पक्या तेंव्हा सातवीच्या वर्गात होता. पक्या शाळेत ढ असेल पण डफडं वाजवायला पटाईत होता. पक्या जोरं जोरांत वाजतं होता. पोरं त्या डफड्याच्या तालावर ठेका धरत होते. पक्याला डफडं वाजवायची संधी मिळाली होती. म्हणून तो आनंदाने वाजवतं होता.

पोरं नाचायची हौस फेडत होते. गाढवं जीवाच्या आयकोळया करीत आवाज ऐकून चलबिचल होऊन त्यांच्या मालकाजवळ थांबली असतांना सुध्दा पळता येतं नव्हतं तरी आता भीतीनं पळू लागली होती. इकडे गाढवांच्या मालकाला संताप अनावर होत होता. पक्या जीभ बाहेर काढू, काढू वाजत होता. वाजणं रंगात आलं होतं. गाढवाच्या मालकाच्या हातात असलेल्या गाढवं वाळायच्या (हाकलायच्या) लांब सडक चाबूकन एक जोराचा फटका तेनं संतापाच्या भरात पक्याच्या उघड्या पायावर ओपला......... सप्प....... असा जोराचा आवाज झाला. चाबकाचा फटका बसताचं पक्या डफडं वाजवणं थांबवून खाली जमिनीवर बसला. चाबकाचा आवाज इतका प्रचंड होता की, आम्ही भेदरल्यागत इकडे तिकडे पहायला लागलो. हा माणूस आपल्यालाही मारेल या धाकानं आम्ही तेथून धूम ठोकत पळतं सुटलो..... बारकी पोरं रडत पळत सूटली.

एकटा पक्या आता उरला होता. गाढव वाल्याचं पक्याला चाबकाच्या फटक्यांनी मारणं सूरुचं होतः. पक्या इव्हळत होता. इम्ही दूर पळत जाऊन शाळेच्या भिंती आडून बघतं होतं. पक्या रडत रडत मारु नका म्हणून गाढववाल्याला विनवत होता. मात्र तो गाढववाला

ऐकतचं नव्हता तो एका मागे एक चाबकाचे फटके पक्याला मारतच होता. माझा काही दोष नाही. मीनं काहीच नही केलं. या चवल्यानंच माले वाज्याले सांगलं व्हतं. पक्या मागे असणाऱ्या पोरांकडे बोट दाखवतं म्हणाला.... पक्यानं मागे वळूनंपाहीलं तर तिथं एकही पोरगा नव्हता. गाढवंवाला बोलला येडा समजतो का रे...... इंथे तर चवल्याचा पत्ता नाही. आनं खोटं बोलून माले उल्लू बनवतोय का? असं म्हणतं गाढववाल्यानं पक्याचा जोरात कान पिळत तेच्या कानफट्यात मारली.

काही समजदार लोकांनी त्याला आवरलं तेंव्हा कूठे गांढववाल्यानं मारणं थांबवलं. इकडे चवल्या व त्याचे गृप मेंबर सर्व फिरुन मस्त समोरच्या गल्लीतनं येतं होते. जणू यांना इथं काय झालयं? हे माहितच नाही असं दाखवतं. आता गाढववाल्यानं पक्याला मारणं तर थांबवलं पणं तो तेवढ्यावरचं थांबला नाही. त्यान पक्याचा कान घट्ट पकडून एका हातात गाढवांची दोरी घेत गाढवांना व पक्याला घेऊन पोलिस पाटलाकडे तक्रार देण्यासाठी निघाला. पक्या गयावया करत होता. मात्र गाढववाला ऐकायलाच तयार नव्हता. पक्याला पोलिसपाटलाच्या घरांकडे नेताय हे पाहून चवल्या व त्याच्या गृपच्या पोरांनी पांगा पांग करुन आपापल्या घरचा रस्ता धरला. चवल्या गुपचूप घरी येऊन बसला. म्हणजे मी घरीचं होतो. असं शहाजूक सारखं दाखवत.

गाढववाला पक्याला घेऊन पोलिसपाटलाकडे घेऊन आला. पोलिस पाटलाची बायको ओट्यावरं भांडी घासत बसली होती. गाढववाला पोलिसपाटलाच्या घराजवळ पोहचला. पोलिस पाटलाच्या बायकोला विचारलं वहिनी ओ वहिनी पाटील आहे का घरी? पोलिसपाटलाच्या बायकोनं होकारार्थी मान हलवली. पोलिसपाटील घरीच आहे खात्री पटल्यावर गाढववाल्यानं पायरी चढायच्या आतच, पोलिस पाटलाला जोरात हाक मारली.

पाटील...... ओ पाटील.....आहे का घरी?

पाटील घरात बंगळीवर बसून हातात चहाचा प्याला घेऊन रेडीओवर गाणी ऐकत बसले होते. पाटलांन गाढववाल्याचा आवाज ऐकला. अनं पाटील चहाचा एक घोट ओढतं बंगळीवरुन ऊठून बाहेर आले. काय रे पंढऱ्या कायं काम काढलंस?

काहीनी मालक या पोरांनी माझ्या गधड्यांची पहा कशी आवस्था केली. त्यांच्या शेपटीला शेपटी बांधून शेपटीला हा डबा बांधला त्या डब्यात खडे भरले. गळयात माळा टाकून वाजत गाजत गांवभर धिंड काढली. या सख्याच्या पोराला आणलं धरुन डफडं वाजतं व्हता हा डफडं.....

पोलिस पाटलानं गाढववाल्या पंढऱ्याचं सारं ऐकून घेतलं. आणि पक्याला दट्टी भरत कारे कोणाचा तू????? कुठे राहतो? असं विचारलं.

पक्या रडतचं होता. त्याच्या पायावरं चाबकाचे वळ उमटलेले होते. पक्याला रडण्याचा हूंदका दाटत होता. त्यामुळे त्याला धड बोलताही येतं नव्हतं.

कारे आयकू नही येत का? मी काय इचारतोय ते..... कोणाचा आहे तू? कूठे राहतो? नांव काय तुह्य?

मह्य नांव पक्या! पक्या रडक्या स्वरात बोलला.... बापाचं नांव नाही का तुले? पुरं नाव सांग ! पाटलानं पुन्हा विचारलं.

प...क्या सखा..राम गायकवाड.

राहतो कुठे ते सांग.... पाटलानं विचारलं

पक्याचं रडणं थांबत नव्हतं. पक्यानं उत्तर दिलं. मातंगवाड्यात!

पाटील पक्याला एकामागून एक प्रश्न विचारतं प्रश्नांची सरबत्ती करत होते.

का केलं तू आसं?

गाढवांना का बांधलं?

त्यांची गावातून धिंड का काढली?

तू डफडं का वाजत होता?

तुया बरोबर कोणं कोण होतं?

पक्या एकएक प्रश्नांच उत्तर देत होता. पोलिस पाटील आता आपल्याला पोलिसांच्या हवाली करतात की काय? अशी भिती पक्याच्या मनाला वाटत होती. पोलिस पाटील पक्याला प्रश्न विचारत नाही तोवर पोलिस पाटलांच्या अंगणात बघणाऱ्यांची जत्रा जमली होती. आमच्या गावची ती रितच होती. कुठेही काही झालं रे झालं तर सरव्या गावांत वाऱ्यासारखी खबर पोहचायची आनं अख्खा गांव गमंत पाहण्यासाठी गोळा व्हायचा.

पोलिस पाटलांनी कोण्या एकाला पक्याच्या आई वडीलांना बोलवून आणण्यास पाठवलं. पाटलानं बोलवलं हा निरोप ऐकताच पक्याची आई व पक्याचा बाप धडपड करतं पाटलाच्या घराकडं यायला निघाले..... काय झालं आसेन? आसं काय कायं केलं पोरांनं म्हणून पाटलानं आपल्याला बल्हावलं? आसे एक ना आनेक प्रश्न पक्याच्या आईला व त्याच्या बापाला पडतं होते. छातीत धडकी भरली होती. कारण पोलिसपाटलानी बोलावल; असा निरोप कोणाला आला तर, त्यावेळी सर्वांनाच धडकी भरायची.

आता पक्याची आई व त्याचा बापू पोलिस पाटलाच्या घराजवळ पोहोचले. बाहेर खुप गर्दी जमली होती. नेमकं काय झालं असेल पोऱ्याला? असं त्यांना वाटतं होतं. गर्दीतून वाट काढतं पक्याची माय अनं पक्याचा बापू पुढे आला.

रामराम मालक..... काय झालं? तुम्ही निरोप धाडला व्हता. असं म्हणतं पक्याच्या बापूनं पाटलाला विचारलं.

सख्या समजाव तुह्या पोऱ्याले मह्या गधड्यांनले शेपटीले शेपूट बांधून त्या शेपूटले डबा बांधला डब्यात खडे काय भरले. अनं फिरवलं गांवभर येनं त्या गधड्यानले वाजतं गाजतं...... पंढऱ्यानं पक्याच्या बापाले सांगितलं.

भाऊ तो एकला नसीन पोरं बी आसतीनं ना तेच्या सोबत तो एकटा करणारचं नाही असं. माले खात्री आहे. पक्याचा बापू बोलला.

तितक्यात पोलिस पाटील खवळून बोलले सख्या बस कर तूया पोऱ्याच गुनगानं हा पंढऱ्या खोटं बोलीन का?

तसं नही मालक मह्या पोऱ्या असं करणारच नहीं. पक्याचीमाय रडत रडत पक्याला जवळ घेत बोलली.

बस्स कर पोरी बोलू नकोस! पाटील बोलले. हे पाय गधडे उभेच आहेत अजून तिथे...... कोण कोण होतं ते सांगायले लाव तेले नहीतर पोलिसांतच देतो. म्हणत पाटीलान आणखी दम भरला.....

पक्याच्या पायावर चाबकाचे वळ बघून व त्याचा चेहरा बघून पक्याच्या आईला रडू येत होतं. पक्याला आता पेच पडला होता. चवल्याचं व इतर पोरांच नांव सांगितलं तर हे पोरं आपल्याला मारतील नाही सांगितलं तर पोलास पाटील आपल्याला पंचायतमध्ये कोंडून ठेवेल किंवा पोलिसांच्या ताब्यात देईल. त्यावेळी गावातील कोणत्याही अल्पवयीन मुलांनी काही गुन्हा केला तर त्याला ग्राम पंचायतमध्ये एकदिवस कोंडून ठेवलं जायच...... त्यामुळे हे पक्याला माहित होत म्हणून तो घाबरत होता. आता काय करावं? हा प्रश्न त्याला पडला होता. इकडे आड, तिकडे विहीर होती.

तू जर खरं बोलला तर तुला आम्ही सोडून देऊ असं सांगत पाटलाने त्याला संधी दिली.

पक्या सांग खरं कोण कोण होतं तुझ्या बरोबर???? पक्याच्या आईनं विचारलं.....

माडे चवल्या होता मया सोबत, आनं आजून लई बोंगान व्हती.

चवल्या????? कोणं रं चवल्या? पक्याच्या आईनं विचारलं.

माडे तो नही का? रंग्या हाजामचा पोऱ्या......

पक्याच्या आईनं आता ओळखलं होतं. चवल्याच नाव घेताचं पक्याचा बाप बोलला कीती येळा सांगेल हे तुले त्या पोऱ्याच्या नांदी लागत जावू नको म्हणून तो पोऱ्या लयी आपित्तर

आहे. पण आयकत नहीं ना तु...... मी म्हणतचं होतो तू तेच्या नांदी लागून एकनाएक दिवस काहीतरी तोमत आणशिन अनं आणलीच ना....? पक्याचा बाप डोक्याला हात लावत खाली बसला. पक्या अरे तो रंग्या हाजमाचा पोऱ्या पहिलेचं टूक्कार आणि त्याच्या सोबत राहून तूबी तसा होत चाललाय का आता?

मालक लेकरा कडनं चूक झाली. माफ करा त्याला...... यापुढं नाय करणार तो आसं....!

पोरे तू नको तेची बाजू घेऊस पोलिस पाटील बोलले. पोरां खरं सांग कोणं होतं तुझ्या सोबत अजून?

मालक रंग्या हाजामाचा पोऱ्या ‘चवल्या’ व्हता म्हणतोय त्याच्या बरबरं.... मह्या ल्योक एकलाच नव्हता तर गावातली लई बोंगानं व्हती अजून..... पक्याच्या आईनं पाटलाला सांगितलं.

वाटलंच मला चहाचा एक घोट जोरात ओढत मान डोलवत पोलिस पाटील बोलला..... वाटलचं मला! या पोऱ्याशिवाय दूसरं कोणी नसणारं..... पेल्यातली चहा संपवून पाटलानं चहाचा पेला खाली ठेवला.

पण पाटील हा खोटं बोलतोयं हा एकटाच वाजवत व्हता अनं काही बारकी पोरं तेवढी नाचत होती.

पंढऱ्या बसं कर आता माझा ल्योक खोटं सांगतोयं का? हे वळ बघं त्याच्या पायावर कीती मारलयं तू त्याला आधीच आणि वरुन शहाजूक सारखा पाटलाकडे घेऊन आलास त्याला. आनं वरुन त्याला खोटं ठरवतोय..... पक्याचा बापू चढ्या आवाजात बोलला.

सख्या एवढं लागतं तर; तंगडीला बांधून ठेव्याच पोरांनले. मह्या गधड्यानले काही झालं आसतना मंग दाखवलं असता मी आजून इंगा. पंढऱ्या बोलला.

बस्स रे बंद करा आता पोलिसपाटलानं दोघांना शांत करतं एका जणाला चवल्याच्या घरी बोलवायला पाठवलं.

तसं चवल्याचं घर पाटलाच्या घरापासून हाकेच्या अंतरावर होतं. एकजण चटकन चवल्याच्या घरी बोलवायला गेला चवल्याची माय शेतात जायच्या तयारीत होती. तर त्याचा बाप हाजामाची पेटी घेऊन गावात जायच्या तयारीत..... चवल्या जेवतं बसला होता. काका तुले पाटलानं बलावलं. अर्जंट कामहे.... मध्यानं चवल्याच्या घरी निरोप दिला. चवल्याचा बाप बाहेर आला हातात घेतलेली पतरी मुडकी पेटी खाली ठेवतं. हातात असलेली बिडी विझवतं चवल्याच्या बापाच लक्ष पाटलाच्या घराकडे गेलं. पाटलाच्या घराजवळ गर्दी जमली होती. पायात वावणं घालत चवल्याचा बाप पोलिस पाटलाच्या घराकडे निघाला. त्याच्या पाठोपाठ चवल्याची आई बी निघाली.

राम राम पाटील काका काय म्हणताय? आरे रंग्या काय तुह्या पोऱ्याबी तेचा पराक्रम पाह्य. कुठेयं तुह्या पोऱ्या?? पोलिसपाटील हसत हसत बोलला.

काका तो घरी बसलायं....! चवल्याच्या बापानं सांगितलं.

रंग्या बोलावं बरं तेले ! पोलिस पाटील बोलला.

चवल्याचा बाप धावतचं चवल्याला घ्यायला गेला. चवल्या घरात जेवण करत होता. तेवढ्यात तेच्या बापानं त्याला हात पकडून आणला. कारे ओ चवल्या गधड्यांची वरात कोणं काढली होती सांग बरं? पाटलानं विचारलं.

कोणतं गधडं? चवल्या बोलला.  नही रे बाबा मी कशाले फिराऊ काहीबी  सांगता तुम्हीबी मीच दिसतो का तुम्हाले? कव्हाबी..... कोण सांगतं? हा पोऱ्या त सांगतोयं अनं लोकबी सांगताय गल्लीतले. पाटील बोलला.

चवल्या खजिल होऊन आता आपली चोरी सापडली अस समजताच त्यानं जोराची दुडकी धरत पळतं सुटला. अरे पकडा रे पकडारे तेले.....! असं म्हणतं पाटलाने काही तरुण पोरांना चवल्याला पकडून आणण्यास सांगितले. चवल्या त्यांना ही गल्ली ती गल्ली पळवत सोडतं इकडून तिकडे.... तिकडून इकडे..... असा पळवत होता. कधी कोणाच्या ओट्यावर चढायचा..... तर कधी धाबे धाबे पळवत थकत होता. त्याला पकडून आणायला पाठवलेली पोरंबी तगडी तुगडी होती. त्यांनी चवल्याला बरोबर हेरतं आखेर पकडला व पाटला समोर हजर केला.

रंग्या सांग तुह्या पोऱ्यानं या दोन्ही गाढवांनले शेपटीले शेपटी बांधून तेंच्या शेपटीला डबा बांधून डब्यात खडे टाकून वाजतः गाजतं गांवभर वरात काढली होती. आता सांग येले काय शिक्षा द्यायची? पोलिस पाटलांन विचारलं. याला बसवू का? या गाढवांवर काढू का याचीबी धिंड??????

मामाजी बसाडा त्याला अनं फिरवा खरचं गावभर त्याला चवल्याची आई हसत, हसत पोलिस पाटलाला बोलली. तेंव्हाच खोडं मुडीन तेची. हा तेच करा तेच करा..... म्हणतं लोक हसाया लागले.

पंढऱ्या बसवं याले गाढवावर अनं फिरवं वाजतं गाजत गांवभरं ! पाटील म्हणाले. चवल्या भामऱ्या भूतासारखां डोकं खाजवत लोकांकडे पाहू लागला. त्याला धरुन आणलेल्या तरुणांनी त्याचे खवाटे पक्के धरलेले होते. तो त्यांच्या हाताला झटके देवून पळण्याच्या मार्गावर होता. चवल्याचा बाप पुढे येतं तेनं सपकन त्याच्या कानाखाली वाजवली. आणि त्याचा खवाटा धरत पाटील काका बसवा येले गधड्यावर अस म्हणतं त्याला उचलला. तो तगंड्या झटकत होता. पळून जाण्यासाठी कायपत्या करत होता. पण त्या तरुणणांनी त्याला घट्ट पकडून धरला होता.

त्यामुळे त्याचा प्लॅन सक्सेस होत नव्हता.  पाटलांनी पंढऱ्याला चवल्याला गाढवावर बसवं सांगताचं. पंढऱ्यानं पोरांनी गाढवाच्या शेपला बांधलेला डबा व दोऱ्या सोडल्या तरुणांनी टांगाटोली करतं चवल्याला गाढवांवर बसवलं. सख्या वाजवं डफड जोरांत.... पाटलानी ऑर्डर देताच. सख्याने पक्याच्या हातातील डफडं घेतलं आनं वाजवायला सुरुवात केली. लोकांना हसू माहे ना.... पक्याही डोळे पुसत गालातल्या गालात हसू लागला. अनं पक्याची आई अनं पक्या घरांकडे निघाले. पक्याला हसू येत होतं. पक्या वळून वळून मागे बघतं होता. थांब तूले पाहीन नंतर.... असा इशारा चवल्या पक्याकडे पाहतं करत होता. चवल्या गाढवांवर पुढे वाजा मागे हूल्लड पोरांचा हय..... य...... आसा आवाज करतं. बारकी पोरं वाज्याच्या आवाजावर नाचाया लागली. चवल्याला अद्दल घडवण्यासाठी त्याला ही शिक्षा पाटलांनी दिली होती. दोनं तगड्या तरुनांनी चवल्याच्या दोन्ही दंडांना इकडून तिकडून घट्ट पकडून ठेवलं होतं. पक्याचा बाप रंग्या, गांवच्या पोलिस पाटील सह अख्खे गांवकरी या वरातीत सहभागी झाले होते. चवल्या खाली मान घालून गाढवांवर स्वार झाला होता. गल्लोगाल्ली चावल्याला गांवभर फिरवलं जातं होतं. याच्यापुढे करशिल का नही रे भो..... नही रे भो... असं म्हणतं पोरं जोरजोरात घोषणा देतं होते.

आता चवल्याची धिंड पुढच्या गल्लीत पोहचतात चौकात आल्यावर चवल्या गाढवांवर बसूनच जोरात ओरडला. ये बंद करा आता! सगळे आचर्य चकीत होऊन पाहू लागले. काय रे चवल्या काय झालं ओरड्याले तुले? पोलिस पाटलाने विचारलं. बाबा ओ पाटील बाबा मी एकट्यांनच काय घोडं मारलं? मी एकटा थोडीचं होता. यात अख्ख्या गांवाची हाडवाय होती. अनं तुम्ही मलाच दोषी ठरवतायं. मह्या सोबत जो बी होता तेले बी बसाडा गधड्यावरं. नाही बसाडलं तर मी उतरतो. अशी धमकी चवल्याने दिली. कारण चवल्याला सोबत कोणीतरी हवं होतं अजून????? त्याला ठाऊक होतं.

ज्या गल्लीत ही धिंड आली त्याच गल्लीत रव्याच म्हणजेच झ्यांग्याच घरं होतं. पाटलान विचारलं कोण होतं रे नांव सांग त्याचं!

बाबा ओ पाटील बाबा झ्यांग्या होता झ्यांग्या..... झ्यांग्या????? पाटील विचारात पडले. कोण झ्यांग्यारे????? बाबा तो नाही का काशिनाथ डूंगेचा

पोऱ्या इथचं राहतो. चवल्याने सांगितलं. आता पाटलाच्या लक्षात आलं. तो व्ह जो काश्या रे जो ऊखाजी बाबाकडे सालदारी करतो का?

हा बाबा तोचं तो बरबर वयखलं तूम्ही. हेच घर आहे त्याचं. चवल्यानं बोटानं झ्यांग्याच घर दाखवलं. पाटील झ्यांग्याच्या घराजवळ गेले. ये बाई इमल तूह्या लेक आहे का घरात? झ्यांग्याची माय चूलीवर भाकरीचं पिठं मळता, मळता पाटलाचा आवाज ऐकताच बाहेर आली. दोन्ही हाताला पीठ लागलं होतं. हात खरगटे झाले होते. तशाच खरगट्या हाताने तिने बाहेर पाटील आल्याच पाहून डोक्यावर पदर घेत विचारलं. काय म्हणता मामाजी? काय झालं? पोऱ्यानं काही उप्पट नक्कीच आणली आसणार..... हे तिला आधीच कळलं होतं. बाहेर डोकाऊन पाहीलं तर; एका गाढवावर चवल्या बसलेला होता. धिंड घराजवळ थांबलेली होती. वाजणारा सख्या व मोठा ताफा अंगणात उभा होता. मामाजी कोणत्या पोऱ्या? ओ बाई तुह्या पोऱ्याना. मामाजी कोणता मोठा मधला की धाकला? झ्यांग्याच्या आईनं विचारलं.

बाई तो मोठा पोऱ्या चांगलाय तुह्या तो नही पडतं कधी रिकाम्या भानगडीत कोणाच्या. तेच काम भलं अनं तो भला.... तो धिकटा की मधला नही का? तो लई आपित्तर आहे. तितक्या झ्यांग्या आंघोळ करुन मोरीच्या बाहेर आला. टाँवेलनं डोकं पुसतं असतांना आईशी कोण बोलतयं? हे पाहण्यासाठी तो कुडाच्या मोरीतून बाहेर निघाला. पाटलाला पाहताच त्याच धाबं दणानल. झ्यांग्याचा मोठा भाऊ रम्या व त्याचा बाप लोकाच्या शेतात कामाला गेलेला होता तर, लहान मंग्या पोरांमध्ये खेळायला. अनं घरी होता तो मधला रव्या (झ्यांग्या) मामाजी हा होता का? पोरे थांब विचारतो त्या पोऱ्याले. पाटलानं चवल्याले आवाज दिला.

ये चवल्या इकडे ये. म्हणताच चवल्या ताडकनं गाढवावरुन खाली उतरुन पाटलाजवळ आला. चवल्या हा होता कारे? बाबा हा हाच होता. आमच्या सोबत यानच सांगलं

होत असं कर म्हणून..... चवल्यानं थाप मारली होती. तसा तो या दोघांचा प्लँन होता. मामाजी काय केलं यानं? अगं पोरी हा लयी आपित्तर या दोघांन नाही का सकाळी गाढवांची वरात काढली गांवातून..... असं का? असं म्हणतं झ्यांग्याच्या आईला जरा हसूच आलं. मामाजी फिरावा याले गधड्यावर बसवून गांवभर.... पुन्हाइन करेत ना करेत ते असं. झ्यांग्याची आई बोलली. पाटलांन झ्यांग्याचा हात धरत त्याला गाढवांवर बसवलं.

झ्यांग्या तसाचं उघडा मनिला न घालता गळयात टॉवेल टाकून बसला होता. इकडे चवल्याही आता स्वतःहून बसला कारण आता त्याला जोडीदार जो मिळाला होता. झ्यांग्यानं चवल्याला हळूच आपल्या बोबड्या आवाजात इचारलं. चवल्या मद्या येतीळ कारे? चवल्यानं मान डोलवतं सांगितलं. लई मजा येतेयं.... जशी नवरदेवाला घोड्यावर बसतांना येत आशीन? बिल्कूल तशी..... मंग तं लयी भाडी! झ्यांग्या बोलला. पाटील बोलले सख्या वाजीव, वाजीव बारीक...... बारीक..... 'आखाडा वाजवं आखाडा'! असं म्हणताचं सख्यानं डफडं वाजवायले सुरुवात केली. अनं वरांत पुढे निघाली. डफड्याचा आवाज अनं आखाड्याची चाल आता गाढवांना आवडू लागली होती. त्यांनाही नाचावसं वाटत आसेल? म्हणून ते अंग हलवत होते. अनं मागे पाय झटकतं होते. त्यांच्या पाय झटकण्यामुळे चवल्याला व झ्यांग्याला आजू बाजूने धरुन चालणारे तरुणं घाबरुन मागे मागे सरकत होते. पण चवल्यां त्यांचे दंड मात्र ते सोडत नव्हते. पडण्याच्या भीतीने दोघांनी गाढवांच्या गळयात असलेल्या दोरीला घट्ट पकडून ते बसले होते. धिंड वाजत गाजत पुढे चालली होती. पोरं नाचत होती. आरोळ्या मारत होती. धिंड काहीशी पुढे सरकली. तोच समोरुन शैला चक्कीवरुन दळण दळून एका लोखंडी तगारीत पिठं घेऊन येतं होती. गल्ली आरुंद असल्याने ही धिंड तिच्या बाजून जाताच ती रस्त्याच्या कडेला बाजूला होऊन थांबली. हीच संधी मिळतांच चवल्याने दोन मुठ्ठा भरुन पिठं शैलाच्या तगारीतूनं घेतं एका हातातील पिठं झ्यांग्याला दिलं तर दुसऱ्या हातातील पिठं स्वतः जवळ ठेवलं. एक , दोनं, साडे माडे पवने तीन..... असं म्हणतं दोघांनी एकच विचार करुनं त्यांचे खवाटे धरुन चालणाऱ्या तरुणांच्या डोळयात आपल्या हातातील पिठं भिरकावलं. या तरुणांच्या डोळयात पिठं जाताच;

त्यांनी या दोघांचे धरलेले खवाटे (हात) सोडत आपापले डोळे चोळतच ते खाली बसले. ही संधी मिळताच त्या दोघांनी म्हणजेच चवल्या व झ्यांग्याने गाढवांच्या पाठीवर थाप मारतं, चलं रे गधड्या खबडक..... खबडक...... म्हणत एकच धूम ठोकली.

वाजा वाजतच होता आणि हे पुढे, पुढे जात होते. इकडे शैला गालातल्या गालात हसली. चवल्याची अनं शैलाची नजरा नजर होताच आणि त्यातच तिच स्मित हास्य बघून चवल्या बावरला. गाढवांवर बसल्या बसल्याच एखाद्या सिनेमाच्या नायकां प्रमाणे त्याने आपल्या डोक्याच्या केसांवरुन केसं सावरत हात फिरवला. “हसी तो फासी” हे चवल्यानं कधी तरी ऐकलेलं असावं? चवल्या शैलावर लई प्रेम करत असे. नाजूक देखणी शैला दिसायला खुप सूंदर होती. पण ती त्याला कधी भावं देत नव्हती. हे त्याला माहित असूनही तो तिच्यावर खुप प्रेम करायचा पण तेबी एकतर्फीच होतं. आज कधीनवतं ती हसली होती. यांमुळे चवल्याला शैलाच हास्य बघून आनंद झाला होता. तशी शैला चवल्याच्या वर्गातील सर्वात हूशार विद्यार्थीनी होती. तर चवल्या वर्गातील सर्वात मठ्ठ विद्यार्थी होता. चवल्याने नापास होण्याच्या बाबतीत वर्गातच नव्हे तर संपूर्ण शाळेत सर्वच रेकॉंर्ड मोडीत काढले होते. इयत्ता चौथीत या पठ्ठ्याने नव्हे, नव्हे तर; एक, दोन तीन नव्हे तर तब्बल पाच वर्षे मुक्काम ठोकला होता. त्यामुळे त्याला शाळेतील सर्व शिक्षक “ढ” म्हणून हाक मारायचे. विद्यार्थ्यांनी अभ्यास नाही केला तर गुरुजी मुलांना खुप बदडायचे. आणि विचारायचे आज अभ्यासं कोणी नाही केला? त्यांनी ऊभे रहा! ज्यांनी गृहपाठ गृहपाठ करुन आणलायं त्यांनी आपापल्या पाट्या वर ठेवा. गुरुजींची आज्ञा होताच ज्यांनी गृहपाठ केला नाही ते उभे रहायचे. तर ज्यांनी गृहपाठ केलेला असला ते खालीच बसून..... चवल्याला मात्र काही सोयीर सूतक नसायच त्यानं गृहपाठ पूर्ण केलेला नसला तरी तो खालीच बसलेला असायचा.... गोविंद गुरुजी त्यांचे वर्ग शिक्षक होते. गोविंद गुरुजींना तेवढा एकच वर्ग नाही तर संपुर्ण शाळेचे विद्यार्थी घाबरत असतं. गोविंद गुरुजी स्वभावाने खुप कडकं वर्गात एखादी मुलगा चूकला रे चुकला तर त्याचा कान पिळतं टेबलावर हात ठेवायला लावून छडीने सपासप हातावर मारायचे...... तर कधी टेबलावर ऊभं करुन कोंबडा बनवायचे. व पाठीवर खडू ठेवायचे पाठीवरुन

खडू पडला रे पडला की चांगलच बदडायचे. त्या धाकानच पोरं गृहपाठ पुर्ण करुन आणतं असतं. आता ऊभे असलेल्या मुलं व मुलींना गुरुजींनी हातावर छडीचा प्रसाद देत त्यांचे गालही रंगवले...... चवल्या मात्र खाली मान घालून मुलांना मार मिळाला म्हणून हसतं होता. गुरुजींच लक्ष चवल्याकडे गेलं. आज बहूतेक चवल्याने अभ्यास पूर्ण केला असावा? म्हणूनच तो खाली बसलेला आहे. या गोष्टीच गुरुजींना आश्चर्य वाटलं. कधी याची बोंब पडली नाही आज कसा याला देव पावला गृहपाठ पुर्ण करुन आणायला. म्हणून गुरुजी त्याचा गृहपाठ बघण्यासाठी त्याच्या जवळ आले. हा खाली मान घालून हसतच होता. चवल्याने पाटी समोरच ठेवलेली होती. त्या वर चवल्याने काही एक लिहीलेलं नव्हतं. गुरुजींनी हे पाहिलं पाटीतर कोरीच आहे मगं तरी हा खालीच बसून कसा? अनं वर हसतोयं. गुरुजी संतापले. त्यांनी चवल्याचे केस पकडतं त्याची मान खाली वाकवत खुंब्या, खुंब्याने पाठीवर मारले. आणि त्याचे डोक्याचे केस पकडत त्याला समोर उभे केले. या पुढे अमभ्यास कोण, कोण करणारं......? म्हणून गुरुजींनी विचारलं. वर्गातील सर्व विद्यार्थी एकाच आवाजात बोलले. गुरुजी आम्ही अभ्यास करणारं.....! बरं.... तुमच्या पैकी चवल्या सारखी पंढरीची वारी कोण करणारं.......? असा प्रश्न विचारताच मुले विचारात पडली. आता हा चवल्या कधी पासून पंढरीची वारी करायला लागला? अलागला? असा प्रश्न मुलांना पडला. ज्यांना कळलं ते हसतं होते. ज्यांना नाही कळलं त्यांनी गुरुजींना होकार देत, तसेच हात पुढे करतं.... गुरुजी आम्ही करु पंढरीची वारी! असं उत्तर दिलं. गुरुजी हसले. मुर्खांनो तो पाचवर्ष नापास होऊन याच वर्गात बसतोयं. तुम्हालाही त्याच्या सारखं व्हायचयं का? बसा खाली असं म्हणतं. गुरुजींनी त्या मुलांना खाली बसवलं. तेंव्हापासून मुलांना कळलं गुरुजी चवल्याच्या बाबतीत पंढरीची वारी नव्हे तर त्याच्या दरवर्षी नापास होतं त्याच वर्गात बसण्याच्या वर्गवारीला पंढरीची वारी असं बोलले. हे मुलांच्या नंतर लक्षात आले.

आता ते दोघं गांढवांवरुन बसून काही अंतरावर पोहोचले. गाढवावरुन खाली उतरुन त्यांनी गांढवांच्या गळयात असलेल्या दोरखंडाच्या सहाय्याने दोघं गाढवांना एका गोठ्याजवळ आणून गुरांसाठी आसलेल्या खुट्याला दोघांनी या गाढवांना बांधून दिले. पोलिस पाटील व धिंडी मागे धावणारे लोक यांना हाका मारत यांना पकडण्यासाठी त्याच्या मागे धावत होते तर हे दोघं

त्यांना वाकुल्या दाखवत पुढे भिन्नाट पळत होते. आता त्यांच्या मागे धावणारे पाटील, चवल्याचा बाप रंग्या, अनं इतर गांवकरी दमले आणि एकाच जागी थांबले. पंढऱ्याचा गाढवांमधी लई जीव तो आपल्या गाढवांजवळ आला त्यानं आपल्या माथ्यावरचा घाम गळयातील उपरण्यानं पुसतं खुट्याला बांधलेली गाढवं सोडली.

पाटील काका पोरं लई छाकटी आहेत ही....! एक दिवस मोठी उपाध करणार..... सर्व हसायला लागलीत. चला येतो मी अस म्हणतं पंढऱ्या आपल्या गाढवांना घेऊन त्याच्या घराकडे निघाला. आणि जोतो आपापल्या घराकडे..... दुपारचे आता बारा वाजले होते.

मीही या लोकांसारखं घराकडे वळलो. समोरुन माझे वडील येतं होते. तालुक्याच्या गांवावरुन किराणा दुकाणाचा माल घेऊन आल्यानंतर त्यांना मी घरी न दिसल्यानेच त्यांनी बाळया कुठं गेलायं अशी विचारणा आईला केली. आईनं सगळं खरं सांगून दिलं असावं? की तो सकाळी उठल्यापासून आंघोळ नकरता, तसाच गाढवांच्या धिंडीमागं पोरां सोबतं पळला आहे. त्यामुळेच की काय माझे वडील मला गावात शोधत होते. मी त्यांना बघून मारघायच्या धाकानं जरा जोरात दुडकी धरुन घरी पळायच्या तयारीत असतांना त्यांनी मला पकडलं अनं माझं गालफटं फोडलं. माझा हात घट्ट पकडून बुक्याबुक्याने घराकडे ओढतं आणलं. लोक गल्लीत गंमत बघत होते. मी मार खातच होतो. पण कोणी आवरायला पुढे येत नव्हतं. कारण माझ्या वडीलांपुढे बोलायची कुणाची हिंमतच होत नसे. त्यामुळेच काय की, मला मार खाण्यापासून रोखण्यासाठी कोणी पुढे धजावत नव्हतं.

एका घराच्या ओट्यावर एक म्हातारी बसली होती. ती मात्र तेवढी बोलली...... नको रे पोऱ्या एवढं मारु लेकराले.... ऊन्हाचा टाईम आहे.

कमी जास्त झालं तर?

कोणत्या गल्लीले जाईनं.

काय सांगू काकू हा लई बदमाश झालायं!

लई मातला तो आता या टूक्कार पोरांच्या नांदी लागून......

सकाळचा बिनाआंगतोंड धोयाचा फिरतोय तो इकडे, तिकडे..... वडील बोलले.

जाऊ दे बेटा नादान आहे तो तेले समज आल्यावर तो नही करणारं असं. तेंव्हा कुठे वडीलांनी त्या म्हाताऱ्या आजीच बोलणं ऐकून मला मारणं थांबवलां. पण माझा घट्ट खवाटा पकडून मला घरी आणलं. घरी आणल्यावरही मला बदडलं. आता माझी खोडच मुडली. येच्यापुढे गेला तर याद राख तुले सऱ्यालेच उलटा टांगतो...... असं म्हणतं दम भरला. मी रडतच होतो. आईने मला जवळ घेतलं माझे अश्रु पुसले. आता जावू नकोस येच्यापुढे त्या पोरांमधी अशी ताकीत दिली. माझा हूंदका दाटून येत होता. आईने माझे डोळे पुसतं मला शांत केलं. मी आंघोळ केली. चहा घेतला. आणि तयार झालो.

दोन दिवसाने दिवाळी असल्याने वडीलांनी आमच्यासाठी फटाके आणले होते. दिवाळीचा फराळ चिवडा, शेव, करंज्या, लाडू, शंकरपाळे, सांजऱ्या बनवण्यासाठी आईची लगबग सुरु होती. घरचचं किराणा दुकाण आसल्याने आम्हाला बाहेरुन वस्तू आणायचं खरंतर काहीच काम पडतं नव्हतं. आईने जवळपास सर्वच पदार्थ आईने तयार करुन घेतले होते. घरात दिवाळीमुळे चैतन्याच वातावरण होतं. फटाक्याची पिशवी पाहून कोणते फटाके वडीलांनी आमच्यासाठी आणलेत?????? हे बघण्याची उत्सूकता मला लागली होती. पण मला त्या फटाक्यांच्या पिशवीला आई मला हातच लावू देत नव्हती. कारण आईला ठाऊक होतं. हे फटाके काही याच्या एकट्यासाठी आणलेले नाहीत. याला दिसले तर हा सगळेच संपवेल. कारण ते फटाके माझ्या एकट्यासाठी नव्हे तरं; अम्हा तिघं भावःडांसाठी आणलेले होते. त्यामुळेच मला त्या

फटाक्यांना हात लावू दिला जात नव्हता. त्या आणलेल्या फटाक्यांचा आम्ही दोघं भाऊ व बहिण अम्हां तिघांमध्ये वाटले जाणार होते.

इकडे धिंड संपून जो तो ज्याच्या, त्याच्या घरांकडे गेला होता. मात्र चवल्या व झ्यांग्या मार खायच्या धाकाने दूर कुठेतरी शेताकडे पळून गेले होते. आता जरा आंधार पडायला आला होता. मात्र या दोघांचा घराकडे काही पत्ता नव्हता. चवल्याची आई चवल्याला व झ्यांग्याची आई झ्यांग्याला शोधत होती. रात्र झाली दोघांच्या घरचे त्यांचा शोध घेऊन थकले. आणि येतील आपेस असं म्हणतं जेवणं करुन झोपून गेले. त्यांना माहीत होती या दोघांची सवय ते कुठेही जाणार नाही हा त्यांना विश्वास होता. कारण या आधी बऱ्याचदा ते घरुन पळाले होते व पुन्हा घरी परत सुध्दा आले होते. त्यामुळे त्यांना त्यांची काहीच चिंता नव्हती. रात्रीचे आता ११ वाजले होते. संपूर्ण गांव झोपला होता. तसा आमचा गांव रात्री ९ वाजेशी सामसूम होत असे. आता गाव पुर्ण झोपलाय हे बघून दोघं गुपचूप गावात शिरले. घरात जावून जेवण करुन घेतलं. दोघांच्या घरचे ढाराढूर झोपलेले होते. मगं हे दोघं देखिल आपापल्या घरी जावून जेवण करुन ढाराढूर झोपून गेले. हे दोघं रात्री घरी केंव्हा परतले हे त्यांच्या घरच्यांना कळलं सुध्दा नाही.

दुसरा दिवस उजाडला..... चवल्याच्या व झ्यांग्याच्या घरच्यांनी यांना हे झोपलेले आहेत हे बघितलं पण हे रात्री घरी केंव्हा आले हा प्रश्न त्यांना पडला. चवल्याच्या बापानं म्हणजेच रंग्यान चवल्याच्या अंगावरची झावर (गोधडी) ओढतं जागे केलं. 'रावल्या' ये रावल्या उठं रे पोऱ्या लयी काम करुन थकला आश्शिनं तू ....... चांगलं नांव कमवलं तू काल गावांत गांवभर धिंड काढून ऊठं आता....! दिस ऊजाडला..... चवल्याचा बाप चवल्याला झोपेतून उठवतं होता. अनं चवल्या झोपेत मस्त स्वप्नांच्या दुनियेत स्वप्न बघतं रंगला होता. बापू झोपूदेनं जरा.... है है घोड्या चल पुढे.... शैले बघ म्या तुझ्यासाठी काय आणलयं ते....? मोगऱ्याची फुले तुला लई आवडताना म्हणून पारं दूरुन मळयातून आणली. बघं कीती सुंदर आहेत अगदी तुझ्या सारखीचं.... असं तो स्वतःशीच झोपेत बडबडत होता. कदाचित तो झोपेत शैलाचच स्वप्न बघतं असावा? चवल्याच्या बापानं मग्गा भरुन पाणी आणलं आनं खाटेवर झोपलेल्या चवल्याच्या अंगावर टाकलं अंगावर पाणी पडताचं चवल्या झोपेतून खडबडून जागे झाला. उठं रे करसदार कामधंदे पाह्य हेल्यासारखा काय पसरलायं.....

जाय रे भो.... झोपू दे जरावेळ

रावल्या रावल्या आरे आठ वाजायले आले. अनं तू म्हणतोयं झोपू दे.... आंग तोंड धोय अनं चाल मह्या संग गावात उद्या पासून दिवायी चालू होईन. दोन पैसे कमावले तर कामात यीन आपल्याले दिवाईले. तुह्या मायले या हस्यात मजूरीचे पैसे कमी भेटतीनं मग पैसे नसले तर दिवायी कशी साजरी करणार? चाल गड्या लवकर तयार हो.... मागची बाकी आणि गव्हाईच्या घरुन जरा वसूली करुन घेऊ आज.... कोणी एखादी गि-हाईक भेटलं की त्याचीबी दाढी, हजामत करता येईल. असं होयं बापू पण माले एक सांग माले काय भेटीन? म्हणजे तू  माले काय देशिल ते सांग पहिले. अरे तू पहिले चाल त खरं.... चवल्या बोलला.

पैसे आल्यावर बघू तुले काय पाहिजे ते घेजो.... चवल्याच्या बापानं चवल्याले सांगितलं.

नही भो पहिले माले सांगशिल तरच मी येईल. नाही तर मी नाही येत जाय तू..... चवल्या बोलला.

बेटा शहाणा आहे ना तू? मंग कशाले येडापणा करतो? तू म्हणशिन तर तुले नवा ड्रेस, फटाके आणिनं चिवडा, लाडू बनवू आपणं आ.... बसं मंगतर झालं?

चवल्याला त्याच्या बापूनं आश्वासन दिल्यावर कुठे तो आता त्याच्या बापू बरोबर जायला तयार झाला.

चवल्याला वाटलं आता नवे कपडे भेटणार या आशेनं त्याने पटापट आंघोळ केली. आणि चवल्या त्याच्या बापू संग जायला तयार झाला.

त्याच्या बापूनं गोधडींच्या घुडसली खाली ठेवलेली आपली हजामाची पेटी उचलली.... पेटी आता लई जूनी झाली होती. वरतून कलर नसल्याने गंज चढला होता. काही भाग गंज चढल्याने मुडदूस झाला होता.

चवल्याच्या बापूनं आपली पेटी उचलली तर कोणी गव्हाईक गव्हाई म्हणून धान्य देईल म्हणून  चवल्याच्या हातात रिकामी कलतानची (प्लास्टीकची) पिशवी दिली. आता दोघं बाप लेक निघाले. चवल्याचा बापू भेटेल त्याला इचारत होता. भाऊ दिवायी आली. दाढी हजामत करायची असेल तर करुन घ्या....! पण कोणी तयार होतं नव्हतं. चवल्या व त्याचा बाप दिवसभर अख्खगांव पायाखाली घातलं पण त्यांना एक गि-हाईकबी गावलं नव्हतं. आता दिवस सरायला थोडांच येळ बाकी होता. तेंव्हा कूठं एक गि-हाईक भेटलं. चवल्याला व त्याच्या बापूला आनंद झाला. चवल्याच्या बापूनं हातातली पेटी खाली टेकली. पेटी उघडली. खाली एक गोणटं आथरलं.... आणि त्या गि-हाईकाला त्याच्यावर बसवलं. पेटीतून साबणाचा तुकडा, वस्तारा काढला.... त्या माणसाच्या दाढीला साबण लावतं. चांगल घोटून ब्रश फिरवला अनं मग

वस्ताऱ्याच्या सहाय्याने दाढी केली. दाढी झाल्यावर त्याची हजामत पण केली. दाढी आणि हजामत झाल्यावर त्या माणसाने आपल्या बंडीच्या खिशातून एक रुपया काढतं चवल्याच्या बापूच्या हातात म्हणजे रंग्याच्या हातात टेकला.

काका एक रुपया....! एक रुपयाचा जमाना तर कधीच गेला.

मंग काय दहा रुपलये देऊ तुले.....?

दहा रुपयांत मी मस्त आन्याच्या टपरीत जाऊन खुर्चीवर बसून हजामत करीन. अनं तुले कसले द्यू रे एवढे पैसे....! हे बी पटीनं तर घे नाही तर आनं दे परत.... तो माणूस बोलला.

काका असं नका करु हो... दोनं दिवसांन दिवाई आहे. अनं आज काहीबी धंदा झाला नही. एक पहिली बहोनी झाली तेवढी तुमच्या हातानं....! गरिबाले नका मारु असं... रंग्या बोलला.

मंग मी काय करु? तुह्या धंदा झाला नाही तर.... तु बी त्या आन्या सारखी टपरी टाक अनं नविन नविन प्रकारच्या कटींग करत जा भारी दाढीचे टूब वापरत जायं. मंग दीन मी तुले लेका १० रुपये. तो नही तुया सारखा साबण वापरत टूब वापरतो तो टूब.... तोबी भारी कंपनीचा....

काका तो मोठा माणूस आहे आनं आपणं गरिब....! रंग्या बोलला... व एक रुपया खिशात टाकून आपलं पेटी आवरुन रस्त्याले लागला.

आता काहींकडे मागची बाकी व गव्हाई घेण्यासाठी गेला मात्र गव्हाईबी भेटली नाही अनं उधारीबी. जो, तो म्हणायचा दिवाई झाल्यावर येऊन घेऊन जा.... त्यामुळे त्याला कोणीबी गव्हाई व पैसे दिले नाही. आता अंधार पडत चालला होता. झापड पडली. रंग्या व चवल्या खाली हात घेऊन घराकडे निराश होऊन परतले. नवनविनं कटींगच्या फँशन, आलिशान दुकाने यांमुळे घरोघरी जावून हजामती करणाऱ्या हजामाची गरज उरली नव्हती. त्यामुळे रंग्याच्या धंद्याला

पूर्ती घरघर लागली होती. कधी काळी याचं घरोघरी जावून पैसे किंवा गव्हाईने लोक हजामत करायचे आता मात्र खुप बदल झाला होता. पाहिलं बेटा असा झाला आपला धंदाबी तूबी शिकून मोठा झाला किंवा आपली चांगली कारागिरी शिकला तर तुले बी मी सलूनची एक टपरी टाकून दीन.

पण बापू आता आपण काय करायचं? चवल्याने त्याच्या बापूला विचारलं.

मायले मजूरी भेटीन थोडीफार मंग पाहू तू कायजी करु नकोस. आसं म्हणत रंग्याने चवल्याची समजूत काढली. दिवसंभर फिरुनबी हाताले काम मात्र लागलं नव्हतं. आता आपल्याले नवे कपडे, फटाके भेटीनं की नाही? आसा प्रश्न चवल्याले पडला. चवल्या व त्याचा बापू दोघं घरी पोहचले.

रंग्याच्या बापानं हातातली पेटी खाली टेकली. आन वट्यावर असलेल्या खाटेवर तो टेकला. लक्ष्मे पाणी आणं प्यायले. असं म्हणतं शर्टाच्या खिशातून माचिस व बिडी बंडल काढून त्यातील एक बिडी तोंडात घेत पेटवली. चवल्यानं आपल्या हातातली रिकामी दुरुनच फेकत तोही ओट्याच्या कोपऱ्याशी नाराज होऊन बसला. चवल्याचा बापूही जरा उदासच दिसत होता. चवल्याच्या आईनं म्हणजेच लक्ष्मीबाईनं माठातून ग्लासभर पाणी आणलं. आनं चवल्याच्या बापूला देत म्हणाली. का हो कायं झालं?

तब्बेत त ठीक आहे ना तुमची?

मी बरा आहे! काय होईन माले? ग्लासातील पाणी संपवत रंग्या बोलला.

मंग असा चेहरा उतरवून बशाले काय झालं तुमाले? कोणं डोकं मिकं लावल की काय तुमच्याशी? की या रावल्यानं डोकं खाल्ल तुमचं? चवल्याच्या आईनं चवल्याच्या बापूले पुन्हा प्रश्न केले.

नही वं तसं काहीच नही. कोण डोकं लाईन मह्याशी? अनं पोरग्याबी नही तसा आज गुणानं वागला. चवल्याचा बापू चवल्याच्या आईला बोलला.

आता चवल्याच्या आईचं लक्ष चवल्यानं खाली फेकलेल्या रिकाम्या कलतानच्या थैलीकडे गेलं. खाली पडलेली रिकामी थैली उचलत तिनं विचारलं. कावं थैली बी रिकामीच दिसतेयं.....

गव्हाई बिव्हाई भेटली नाही का?

नहीं, नही दिली कोणं गव्हाई आज! चवल्याच्या बापूनं सांगितलं.

मंग कव्हा देणार आहेत ते? चवल्याच्या आईनं विचारलं.

दिवाई झाल्यावर भेटणार आहे. चवल्याचा बाप बोलला....

दिवाई झाल्यावर का तेंच्या डोमण्याला देतील ते.... अनं आजच द्याले कायं झालतं तेनले? चवल्याची आई बोलतं होती. चवल्या अनं त्याचा फक्त ऐकत बसला होता.

दिवाई सारखा सण घरात धान्याचा दाणा नाही. सकाईसच विमलबाई कडून शेरभर पिठं आणलं मी उसनं.... सांच्याला देते म्हणून असं सांगतं. आता तिला कायं सांगू?

दोनं दिवसांन देती असं सांगजो विमल वहीणीले. कोणी देलं नही देलं कोणावर का बयजबारी आहे का आपली? देतीन ते निस्ताईनं....

बरं गव्हाई गेली खड्ड्यात पणं बाकी बिकीं त भेटली आशिन काही रोकडा?

नही तीबी नही देली आज कोणं! आनं बहोणी झाली फक्त आज अनं तोही फक्त एक रुपयां.....!

फक्त एक रुपया? डोकसं बिकसं ठिकाणावर आहे तुमच? कोणं देला एक रुपया? चवल्याच्या आईनं विचारलं.

अगं बहोणी झाली फकस्त बहोणी.... चवल्याचा बापू बोलला.

अहो मंग मी तेच ते विचारतेय कव्हाची.... एक रुपया कशाचा भेटला ते? चवल्याच्या आईनं उलटं प्रश्न केला.

आवं एकानं दाढी आनं हजामत केली त्यानं देला एक रुपया.... चवल्याच्या बापूनं सांगितलं.

त्याच डोसकं बिसकं फिरलं होतं की काय? दाढी अनं हजामत करुन फक्त एक रुपया दिला तेनं त.... तेले म्हणवा नही का? ही काय भिकं देतोय का म्हणा माले.... दाढी अनं हजामतचे बाहेर वीस रुपये झाले असते तर तू नही काहींतर पंधरा रुपये तर दे म्हणावं....

आवं कोण देणार आपल्याले पंधरा रुपये?.....

टपरीवर देता लोक बरबरं.... पण आपल्याले कोणी देत नहि एवढे....

आपलं नशिबच मेलं फुटकं, काळानुसार तुम्हाले बदलता नही आलं.... मगं कायं आता हे असं जगावं लागतयं.... भिकाऱ्या सारखं. दुसरे काही कामधंदे पहा अनं सोडा तो धंद्याचा नांद.... चवल्याची आई चवल्याच्या बापूला संतापानं बोलली. आवं पण या हजामच्या धंद्यानच ते आपल्याला जगवलं.... आपल्याला दोनं टायमाची रोजी रोटीचा प्रश्न याच धंद्यानं सोडवला.... मगं मी कसा आता हा धंदा सोडू? चवल्याचा बाप बोलला....

नाही सोडता तर नका सोडू.... बसा मंग आयुष्यभर खस्ता खात.... इथंच

पोरग्याबी लई दिवे लावणार आपला. दिसताय त्याचे रंगबी आताच.... त्याच शायेतबी चित नही; अनं नही कामात चित, तेले फिऱ्याले पाहिजे फक्त फिऱ्याले..... चवल्याच्या आईचा संताप होत होता. अवं लक्ष्मे जाऊदे जेंवा त्याच्यावर जबाबदारी पडीनंना तेंव्हा होईन तोबी शहाणा.... चवल्याचा बाप चवल्याच्या आईची समज काढतं बोलला. दिवाई झाली की मीबी पाहतो काही काम भेटलं तर..... पण जाउदे तुले मजूरी भेटली का आज या हस्याची? चवल्याच्या बापूनं विचारलं.

मंग भेटलीना दोनशे रुपये.... तेच्यातबी शंभर रुपये उधारी देली दुकाणवाल्याची अनं पंचवीस रुपये दुधा वाल्याचे अन पंचवीस दळणावाल्याले देले. पन्नास रुपये उरले फक्त आता.... मह्याकडे चवल्याच्या आईनं सांगितलं.... बरं मी काय म्हणतो दिवाई सारखा सण घरात काही गोडधोडं नको कऱ्याले लेकरासाठी????

मंग काय इचार आहे तुमचा? लक्ष्मी बोलली.

अवं मी काय म्हणतोय जरा लाडू, चिवडा करु म्हणतं.... पोऱ्यापुरता तरी

अनं पैसे कुठेय आता? दुकानदाराले काय दात पाडून द्यायचे का? चवल्याची आई बोलली.

ऊधार घेऊन ये देवून टाकू आपण नंतर.... रंग्या बोलला.

कोणी ऊभं करणार नाही आपल्याले आता.... कोणी ऊभं करणारं नाही आपल्याले. त्या दुकाणवाल्याचे हजार रुपये बाकी आहे पहिले आज शंभर रुपये लावले अजून नऊशे रुपये द्याचे बाकी आहे तेचे.... अनं कोणत्या तोंडानं जाऊ तिथे? उधार घ्यायले. दुसऱ्या दुकानदारचे पंधराशे बाकी आहेत तो तर उभं बी करणार नाही आपल्याले आता. चवल्याच्या आईनं सांगितले.

अवं मंग त्या सुध्या भाऊकडे जायना देईन तो आपल्याले नही नी म्हणणार कधी..... पहिले नऊशे अनं हे जे होईल ते पैसे आल्यावर देऊन टाकू आपणं. चवल्याचा बाप बोलला.

मी नी जात व माय तो माणुस खतरनाक आहे. देलं नही देलं कुठे दात इचकत येऊ मी.... ती पोरं आसली तर ती देती बिचारी तिचा सभाव चांगला आहे. पण तो माणुस नही देणारं.... एक काम करा तुम्हीच जा तिथे..... लक्ष्मी बोलली.

एक काम कर रावल्या तिथे जायं त्या पाव्हण्याले मह्य नांव सांग अनं तुप, तेल साखर, रवा घेऊन ये दुकानावरुन.....

नहीं रे भो बापू मी नहीं जात भो त्या पाव्हण्याच्या दुकाणावर तो पाव्हणा खवयतो जोरातं. अस म्हणतं चवल्यानं दुकानावर जाण्यास नकार दिला.

आवं तो नही म्हणतोय तर तुम्हीच जावून या चालता, चालता.... चवल्याची आई त्याच्या बापाला बोलली. रावल्या पिशी घे अनं डबा घे तुपाले अन चाल मह्या सोबतं.... चवल्यानं जरमलचा कडी तुटलेला डबा व पिशवी घेतली अनं दुकानाकडे निघाले.....

आता रात्रीची वेळ होती. सर्व घरचे जेवणाला बसलो होतो. तितक्यांत बाहेर कोणी तरी जवाई ओ जवाई बुवा.... असा आवाज देत होतं. वडीलांचं जेवण तसं झालंच होतं. त्यांनी हात धुतला अनं कोण आवाज देतयं हे बघण्यासाठी ते बाहेर गेले. दिवाळीची साफसफाई तसेच घराला रंगरंगोटी करायची असल्याने त्या दिवशी आम्ही दुकान लवकर बंद केलं होतं. वडीलांनी बाहेर जाऊन पाहिलं तर चवल्या व त्याचा बापू बाहेर उभे होते. वडीलांनी चवल्याच्या बापूला विचारलं... काय मामा कायं म्हणता? जवाईबुवा एक काम होतं तुमच्याकडे करशानं का? रंग्या बोलला. चवल्याचा बापू व त्याची आई माझ्या वडीलांना जावयाचं तर माझ्या आईला मुलीच नातं लावत असे.

मामा सांगा तर खरं काय काम होतं ते? वडीलांनी विचारलं.....

दोन दिवसावर दिवाई आहे. घरात सणासाठी काही नाही. म्हटलं उधार साखर, तेल, तुप, रवा शेवच पाकीट दिलं तर बरं होईल. पैसे आले तर देऊन देईल म्हणतं.... तुमचे पहिलेबी पैसे बाकी आहेत ते आनं हे जे होतीलं. सगळे एकखट्टे द्यून टाकीन!

काय सांगू जवाई बुवा अहो सकायी गांवात पेटी घेऊन गेलो. पण धंदाच झाला नही. पहिले तरी धंदा होये चांगला.... पण गांवात सलूनचे आलिशान दुकानं पडल्या पासून आमच्या

सारख्या गरिब हजामाकडं कोणी ढूंकूनही बघतं नाही. आज दिवसभर फिरलो पण ना धंदा झाला, ना मागची बाकी मिळाली.... अनं ना कोणं गव्हाई दिली. एक बहोणी झाली बुवा फक्त त्या गि-हाईकानंबी दाढी आनं हजामत केली. अनं फक्त एक रुपया टेकला हातावर भिकाऱ्यासारखां.... मी म्हटलं काका एक रुपयाचा जमाना तर गेला कधीचा! तर म्हणतो कसा? मंग तुले का दहा रुपये देऊ....! तो अन्या चांगले टूब वापरतो. आरामात खुर्चीवर बसून दाढी अनं हजामत करतो तो दहा रुपये घेतो. तुबी टाक मंग तशी टपरी.... देतो तुले मी बी दहा रुपये. असं उत्तर देलं तेनं.... आता तुम्ही सांगा मही चांगली परिस्थिती आसती तर मी कशाले घरोघरी जावून लोकांची हजामत केली असती? बसला असता मी बी त्या आन्या सारखं दुकान लावून एका जागी.... आता म्हणलं दिवाईचा सण आला. आपलं समजलं पण सोन्यासारखं पोरं तसच राहिल चांगल नही वाटतं. म्हणून म्हणलं बनावून टाकू लाडू, चिवडा काही. म्हणून आलो तुमच्याकडे.....

मामा घेऊन जानं मंग तुम्हाले कोणं मना करतयं.... जे लागीन ते घेऊन जा..... पैशाची काळजी करु नका. वडीलांचा स्वभाव रोखठोकं होता पण कोणाला आडलंभिडल्यावर ते उदार मनानं मदत करायचे..... काय सांगू मामा सगळयाचं धंद्याच तसच झालय आता..... पुर्वी सारंख आता आमचच पहाना.... पहिले मीबी शिवणकाम करायचो.....! पण आता त्या शिवणकामच्या धंद्यातबी काही मजा राहिली नही. तालुक्याच्या गांवावर मोठंमोठे रेडीमेड कपड्यांचे मार्केट उघडले. मंग सगळे लोकं आयतेच कपडे घेऊ लागले. मंग कोणं शिवत आता कपडे त्यामुळेच आमच्या सारख्यांचे धंदे बुडले. मीबी तोच धंदा धरुनं धंदा धरुन बसलो आसतो तर आज आमच्यावरही उपासमारीची वेळ आली असती. वडील बोलले.

जवाई बुवा मंग ते वावर काबरं ईकलं बरं होतं ते आज कामातं आलं असतं चवल्याचा बापू म्हणाला....

जाऊ द्या मामा ते ईकलं तेंव्हा कुठे हे दुकानं टाकलं स्वतःच घर झालं. पोरींचे लग्न केले. अनं आसबी शेती करणार कोण होतं. मह्या एकट्यावर सगळं मंग कोण लक्ष देईल. १९९० मध्ये ते देऊन टाकलं पिंजाऱ्याच्या रफ्याले. तेनंबी एकखट्टे पैसे दिले नही. कवड्या कवड्या करुन

दिले. ऐशी हजार.... आता असतं तर लई किंमत भेटली असती. काळीची बागायत जमिन होती आपली. वडील बोलत होते. मध्येच वडीलांचा शब्द तोडत चवल्याचा बापू बोलला.... हावं खरंय तुमच!

बरं मामा घेऊन जा तुम्ही तूप, साखर अनं जे लागीन ते.... चवल्याचा बापू सांगत गेला तसं तशा वस्तू वडीलांनी मोजून दिल्या. किराणा सामान घेऊन चला येतो जवाई बुवा.... असं म्हणतं चवल्याचा बापू व चवल्या निघाला. तसा चवल्या माझ्या वडीलांना खुप घाबरत असे. त्यांच्या धाकानं तो कधी त्यांच्या समोर येत नसे. आज देखिल तो किराणा घ्यायला आल्यावर त्याच्या बापूच्याच मागे तोंड लपवतं आला अनं तोंड लपवतच निघाला. वडीलांनी मुद्दाम चवल्याला मागून आवाज दिला. थांबरे ऊभा रायं.... असं म्हणताच चवल्या एका हातात पिशवी व तुपाचा डबा घेत पळत सूटला....

चवल्याच्या बापू सारख्या अशा अनेक गरिब कुटूंबियांना पैसे असले नसले तरी आडून न पाहता उधार किराणा देऊन त्यांना मदत करतं असे. यांमुळे गांवात आमची भरपुर लोकांकडे ऊधारीचे पैसे अडकले होते. कोणाकडे लग्न आसो सणवार असो... वा काही कार्यक्रम असो लोक आमच्या कडून हक्काने किराणा घेऊन जात असे. आता चवल्या व त्याचा बापू घरी पोहचला. चवल्याच्या आईनं चवल्याच्या हातात किराण्याची भरलेली पिशवी बघताच तिला आनंद झाला. काहो देला का तेंनं उधार? चवल्याच्या आईनं विचारलं. मंग भेटलाना..... काबरं देणार नही ते? जवाईबुवा चांगले हे बिचारे आपल्या विषयी कधीच हे करणार नही ते..... पैसे आल्यावर फेडून टाकू तेंचे.....

मागच्या पैशाच काही बोलले होते का? चवल्याच्या आईनं विचारलं. नही, नही तेच काहीबी बोलले नही ते.... लगेच दिला तेंन्न किराणा. चवल्याच्या बापूनं सांगितलं. बर आता हातपाय धुवा मी तोवर जेव्याले वाढते. चवल्याची आई बोलली. उठ रे चवल्या हात धोय पहिले. मंग बस जेव्याले. चवल्यानं आज पहिल्यांदा हात धूवून जेवायला बसला. सर्वांनी जेवण केले.

जेवणं झाल्यावर भांडी धूऊन चवल्याच्या आईनं स्वच्छ करुन ठेवली. चवल्याचा बापू थकला होता. त्यान आपलं आंथरुन टाकल अन तो निजला. चवल्यालाही आता झोप येत होती. तोही आता झोपी गेला.... चवल्याच्या आईनं दुकानावरुन आणलेला किराणा पिशवीतून एका भांड्यात काढून, रवा मैदा चुलीवर कढई ठेऊन त्यात तुप टाकून खमंग भाजून घेत त्याचे लाडू बनवले. चिवडाही रात्रीच तयार करुन घेतला. सर्व आटोपल्यावर तीही झोपी गेली. रात्र उलटून आता सकाळ झाली. चवल्या उठं रे पोऱ्या आज दिवाई आहे. लवकर आंघोय करं..... असं म्हणतं चवल्याची आई सकाळी लवकर ऊठून घरातील सर्व कामे आटपून चवल्याला जागं करतं होती. चवल्याही आज कधी नव्हे तो आज दिवाळी असल्याने लवकर ऊठला. आंथरुनातून उठला की नाही उठाला तोच त्याच्या आईला बोलला. मायं लाडू केले कावं? चवल्याच्या या प्रश्नानं चवल्याची आई जरा गालात हसतं म्हणाली झोप गीप लागली होती का नही तुले रात्री का सपानं फिरत होतं झोप मधीबी लाडू आनं चिवड्याच? केलेय मी नं समद रात्रीच.... तू तोंड धोय अनं तयार होय पयले. माय दे नं मंग माले लाडू, चिवडा खायले! चवल्याला आईने बनवलेले लाडू चिवडा कधी खाऊ अनं कधी नहीं असं झालं होतं. अरे दलिंदर पयले तोंड धोय आंघोय कर मंग देते तुले ताटलीत.... चवल्याची आई बोलली. जास्त देजो बरं.... नहीतं देशिनं ईतूसं चवल्या बोलला. चवल्याच हे वाक्य ऐकून रंग्या व लक्ष्मी म्हणजेच चवल्याची आई वबापू हसले.

हावरट आहे मेला लई.... असं म्हणतं त्याची आई आपल्या कामात लागली. आता लाडू चिवडा भेटणारं या आशेनं चवल्यानं तोंड धूवून आंघोळ आटोपली व भांग वैगेरे पाडून तयार झाला. चवल्याच्या आईनं एका प्लेटमध्ये लाडू, चिवडा घेऊन देवाला नैवेद्य दिला. त्यानंतर चवल्या चवल्याचा बापू व त्याची माय तिघांच्या तीन प्लेटीत लाडू चिवडा घेऊन तिघं खायला बसले. चवल्याला खुप आनंद झाला. व आनंदाने तो लाडू, चिवडा खाऊ लागला. कारण लाडू चिवडा हे पदार्थ खेड्यांपाड्यात केवळ दिवाळीलाच बनवले जायचे. त्यामुळे लोकांना वर्षातून एकदाच मिळत असे. त्यामुळेच तेथील लोकांना हे पदार्थ घरी बनवल्यावर आनंद व्हायचा. आता दिवाळी सुरु झाली. गावांत सगळीकडे आनंदाच वातावरण.... आम्ही सकाळीसच सुगंधी उटणं

लावून अभ्यंग स्नाक करुन देवळात जाऊन देवाला नमस्कार करायचो. वडीलांनी आणलेल्या फटाक्याचे सारखै वाटे आम्ही भावंड मिळून पाडून घेत. म्हणजे कोणाला कमी नाही अनं कोणाला जास्त नाही. त्यामुळे वडील आम्हाला त्यांच्या हातानेच फटाक्यांचे वाटे पाडून देत. मी मात्र त्याला एवढे दिले मला कमीच देता असं म्हणतं रडायचो. मगं वडील माझ्या भाऊ व बहिणीच्या वाट्याला आलेल्या फटाक्यांच्या तुलनेत जरा जास्तक फटाके देऊन देत. गांवात किरकोळ फटाके विक्री एकाच मारवाड्याच्या दुकानावर व्हायची. त्यामुळे ते परवडत नसत. पण आम्हाला दरवर्षी जास्तच फटाके लागायचे त्यामुळे वडील आमच्यासाठी तालुक्याच्या गावहून फटाके घेऊन येत. गांवातील काही श्रीमंत लोकही आपल्या मुलांसाठी तालूक्याच्या गावहून किंवा जिल्ह्यावरुन फटाके आणत असतं. पण आमच्या गावांत शेत मजूरी करणारा शेतमजूर वर्गही जास्त असल्याने ते आपल्या मुलांसाठी दिवाळीला गांवातीलच मारवाड्याच्या दूकानातून दहा ते वीस तर कधी, कधी पन्नास रुपयाचे फटाके खरेदी करतं.

दिवाळी सुरु झाली की तो मारवाडी आपल्या दुकानाच्या बाहेरच एका खाटेवर फटाक्यांच दूकान लावायचा. त्यानं फटाक्याच दूकान लावल रे लावलं. तर आम्ही सर्व मुलं आधी दूरहून बघून घ्यायचे आता फटाक्याच दूकान चालू झालं हे दिसल्यावर आम्ही गांवभर फटाक्याच दूकान लागलं रे भो..... आसं म्हणतं गांवभर सांगतं फिरायचो. आम्हाला त्यावेळी खुप आनंद वाटायचा...... मग आम्ही फटाक्याच्या दूकानांवर नेमकी कोणते फटाके आलेयं हे बघण्याची आम्हाला उत्सूकता असायची म्हणून आम्ही त्या दूकानांवर फटाके बघण्यासाठी गर्दी करायचो.... तर तो दूकानदार मारवाडी आम्हाला जोरांत ओरडायचा.... कारे काय पाहीजे तुले? पैसे आणलेय का? असं विचारायचा..... कोणी एखादा मुलगा फटाके विकत घ्यायला लागला की त्याला आम्ही ओ हे घे लोंगी नको घ्यू....! गुलकाडी घे, नागगोळी घे.... सुसुंदरी घे..... सूतळी बाँम्ब घे असं सांगायचो.... आमच्या सर्वांमध्ये चवल्या मात्र सर्वात पुढे असायचा..... कधी कधी तर चवल्या फटाके घेतलेल्या पोरांना बोलायचा. दाखव रे कोणते फटाके घेतले आसं म्हणतं, त्या मुलाने फटाके दाखवले रे दाखवले तर हा त्यांच्या हातातून फटाके हिसकवतं पळून जायचा. ती मुलं मग तिथेच

रडत बसायचा. त्यामुळे तो दूकानदार तिथं एकाही मुलाला थांबू देत नसे. काय पाहीजे रे? घ्यायचय का तर पाह्य नही त पय इथूनं भडव्या असं म्हणतं हाकलून लावी. मग आम्ही त्या मारवाड्याच्या दूकानांकडे जाणाऱ्या पोरांना विचारायचो का रे फटाके घ्यायला चालला का? तो मुलगा हो म्हटला तर एक एक जण हळू हळू एकएक गि-हाईका सोबतं येत जमा व्हायचे. दुकानदारानं विचारलं का रे तुह्यं काय काम आहे? तुले घ्यायचे का? मगं आम्ही सांगायचो... हा मालेच घ्यायचे आहे फटाके, मीनं पैशे याच्याकडे दिले. तर तो ओळखून घ्यायचा हा खोटं बोलतोयं आसं. कधी कधी आम्ही सांगायचो याच्या सोबत आलोय. आम्ही मगं तो जास्तच भडकायचा व आमच्यामागे काठी घेऊन मारायला सूटायचा. तर कधी दूरुनच काठी हाणून फेकायचा... कधी कधी काठी आम्हाला लागायची. पण कधी कधी नेम हूकला तर चवल्या व झ्यांग्या हे दोघं गुपचूप ती काठी उचलून पळत सूटायचा..... मगं तो दूकानदार आमच्या मागे धावला की चवल्या त्याची काठी तिथंच ठेऊन पळत सूटायचा व त्याला चिडवायचा.... तो दूकानदार मारवाडी स्वभावाने खुप खडूस होता. कधी कधी तर मुलांना पकडून मारत पण असे.

संध्याकाळी घरोघरी सडा सारवणं करुन मोठमोठ्या सुरेख रांगोळयांनी आंगणे सजायची. वसू बारसच्या दिवशी आई गांय व गो-ह्याची पुजा करुन त्यांना गोडपोळीचा नैवेद्य खाऊ घालायची. दिवाबत्तीची वेळ झाल्यावर आई मला एक पणती मारोतीच्या मंदिरावर ठेऊन यायला सांगायची तर एक पणती उखिरड्यावर ठेवायला पाठवायची. आणि मगं घरा समोर पणत्यांची आरास सजवायची.... पणत्यांच्या लख्ख प्रकाशानं आमचं घर व आंगण उजळायच.... आता आम्ही भावडं थोडी रात्र झाली की फटाके फोडायचो. ओट्यावर लावलेल्या मातीच्या पेटत्या पणती समोर हातात फटाका घेत त्या दिव्याला लावून अंगणात फेकायचो. फटाक फुटला तर गल्लीतली काही पोरं ती न फुटलेली फटाके उचलण्यासाठी धडपडायचे. गांवात जिथंही कोणी फटाके फोडत असतील तिथं हे गर्दी करायचे. या सर्वांमध्ये चवल्या हा सर्वात पुढे राही. फटाके फोडणारा फटाका केंव्हा फेकेल याची तो वाट बघायचा. फटाका फोडणाऱ्याने फटाका पेटवून फेकला रे फेकला तर चवल्या त्या फटाक्यावर पाय मारुन त्याला रगडून विझवून टाकायचा व

तो फटाका उचलून घिशात टाकायचा.... त्यामुळे त्याला कोणीही फटाके फोडत असतांना उभ करत नसे. त्याला व त्याच्या सारख्या बऱ्याच मुलांना हाकलून देत असतं. आम्ही फटाके फोडत असतांना वडील आमच्या सोबतच बसायचे.... मगं हे मुलं मध्येच फटाके उचलायला लागले की त्यांना जोरात खिजवायचे. आम्ही फटाके फोडत असतांना नकळत एखादी मुलगा मध्ये आला किंवा त्याला चटका लागला तर रिकामी उपाद नको. व त्या मुलांना चटका लागू नये याची काळजी घेत आम्हाला इकडे फेक रे इकडे.... जास्त लांब नको फेकू... त्या पोरांना चटका लागेल. असं वारंवार सांगायचे. आणि त्या पोरांना चटका लागू नये म्हणून त्यांना कारे पयतो का नही घरी.... येऊ कां मंग तिथे? असं म्हणतं पिटाळून लावतं..... पण ही मुल ऐकायचीच नाही ती फटाके उचलायसाठी गर्दीच करायचे. कधी कधी तर फटाके यांच्या पाया जवळही फुटायचे.... तरीही हे खाली पडलेले फटाके उचलायच्या नादात त्या फुटणाऱ्या फटाक्यांनाही भीत नसत. त्यांनी गर्दी करु नये म्हणून आमचे वडील आमच्या जवळचे फटाके घेऊन या मुलांना काही फटाके वाटून देतं. मग ही मुलं आनंदान घरी जातं.

कधी कधी तर मी काही फटाके या मुलांना मिळावे म्हणून मुद्दामहून दिव्याजवळ धरतं त्या फटाक्याची पेटली नाही पेटली तोवर फेकून द्यायचो. म्हणजे मगं तो फटाका न फुटल्याने त्या मुलांना मिळायचा. ते फटाके उचलाय वरुनही कधी कधी या मुलांमध्ये भांडणे होत असतं. मी जाणून, बुजून फटाका फुटायलाच नको व तो त्या मुलांना मिळावा या हेतूने फेकलेला फटाका एखादी मुलाला सापडला की त्याच्या चेहऱ्यांवर तो फटाका मिळाल्याचा आनंद काही औरच आसायचा.....! त्याच्या चेहऱ्यावर फुललेला आनंद बघून मग मलाही आनंद व्हायचा. पाडव्याच्या दिवशीही आई सकाळी लवकला उठवतं आम्हाला अभ्यंग स्नान घालायची.... मग आम्ही नवे कपडे घालून मित्रांना नवे कपडे दाखवतं गांवभर मिरायचे.... लक्ष्मी पुजनाच्या दिवशी आमच्या घरी मोठी पुजा असायची. दुकानासाठी आणलेली चोपडी (खातेवही), पेन, मातीची लक्ष्मीची मुर्ती, नवी झाडणी, काही पैसे ठेऊन, दारांवर झेंडूचे फुलांचे व आंब्याच्या पानांची तोरणे बांधून घर मस्तपैकी सजवून देवीला व देवांना लाह्या बत्ताशे तसेच लाडू, करंज्या, सांजऱ्या, शंकरपाळे,

चिवडा व इतर मिठाईचा नैवेद्य देऊन वाजत, गाजत पुजन केलं जाई व नंतर आम्ही खुप सारे फटाके फोडायचो खुप मज्जा येत असे.

भाऊबिजेच्या दिवशी आमच्या बहिणी आम्हाला ओवाळून औक्षण करायचे. तर दूसऱ्या दिवशी व्दारकाआजी व पार्वताआजी या दोघं ओवाळायला येई. धोबी आणी न्हावी यमाजाच्या या दोन्ही म्हाताऱ्या दिवाळीच्यावेळी दरवर्षी संपुर्ण गांवात व घरोघरी जाऊन ओवाळचे मगं यातून त्यांना कोणी पैसे देत कोणी, साडी चोळी आणि फराळाच द्यायचे. आम्ही देखिल या दोघांना दरवर्षी साडी चोळी तसेच पैसे व फराळाच देत असतं. त्या आमच्या चांगल्या ओळखीच्या होत्या कारण त्या आमच्या गल्लीतच रहायच्या. आईने त्यांना साडी चोळी पैसे व फराळाच दिलं तर त्या नेहमी म्हणायच्या इंदू एवढं कशाले देती व माय? राहू देना.....! मगं माझी आई त्यांना म्हणायची आत्या मंग काय झालं देलं तर? कारु नारुला दिलं तर काही कमी होतं नाही. तुमच्या आशिर्वादानं भेटतयं आम्हाले. हावं माय खरंय ते तुया लेकरांनले हायती राहो असा आशिर्वाद त्या दोघी द्यायच्या. मग आई गल्लीतल्या प्रत्येक घरोघरी आम्हाला ताटभरुन फराळाचे पदार्थ द्यायला पाठवायची. गल्लीतले देखिल काही बाया आमच्याकडे त्यांच्या घरच फराळाच ताट घेऊन येत असतं. आमच्या घराच्या आसपास काही मुस्लीम समाजाची घर होती. आई त्यांच्या घरी देखिल आम्हाला फराळाच द्यायला पाठवायची. ते देखिल त्यांच्या ईदला आमच्या घरी चोंगे, रोठं, शिरखुर्मा पाठवतं. आमचे अनं त्यांचे खुप घरासारखेच संबंध होते. त्यांच्या घरीही खुप स्वच्छता असायची.

दिवाळीच्यावेळी रात्री जमवलेले फटाके किंवा दिवाईच्या दुसऱ्या दिवशी सकाळीसच चवल्या, झ्यांग्या, ढेम्या, नब्या, सल्या, पिस्तोल्या, पदामड्या, तीस नंबर, पिस्तोल्या, सम्या, लाल्या आणि गल्लीतली पोरं गल्लीनं फटाके झांबलत (शोधत) फिरायचे व मिळालेल्या बिन वातीच्या फटाक्यांची बारुद काढून कागदावर टाकून पेटवायचे. तर कधी नकळतच शेकोटी समोर कोणी अंग शेकत बसलेले आसताना त्या शेकोटीत गुपचूप टाकून दूर उभे राहून जातं. तो शेकोटीत टाकलेला फटाका अचानक फुटला रे फुटला तर तो शेकोटी समोर बसलेला मनुष्य जोरात

दचकायचा. व हे हसायचे.... मगं तो मनुष्य यांच्या मागे संतापून मारायला धावायचा. आणि मग हे पळत सुटायचे. कधी कधी हे मुलं एखादी कुत्र बसलेलं असलं तर त्याच्या शेपटीला दोरीच्या सहाय्याने फटाका बांधून पेटवायचे. तो फटाका फुटला की ते कुत्रं सैरावैरा भुंकत, भुंकत पळत सूटायच..... आणि यांना मज्जा वाटायची.

सूट्टी म्हटली म्हणजे धम्माल.... नदीच्या काठी असलेल्या गारा व कूठून कूठून जमा करुन किंवा नदी काठी असलेल्या विटभट्टीवरुन विटा आणून चवल्या सर्वांना कामाला लाऊन भरं उन्हात नदी थडीला एखाद्या झाडाखाली किल्ले बनवतं. यावेळी मी देखिल यांच्या सोबत वडीलांना न माहित गुपचूप या पोरांमध्ये जायचा. तशी मला या चवल्या व त्याचे गृपमित्र भांडणखोर पोरं यांच्यामध्ये खेळायला जायची मनाई असल्याने मी चोरुन लपून वडीलांना न माहित जायचो. आम्ही अशी बरीच मुलं होतो आम्हाला यांच्यामध्ये जायला मनाई होती. प्रत्येकाला बोलवायसाठी किंवा कुठेही खेळायला जायच असलं तर चवल्याला सोबत लागायची मग घरचे जाऊ देत नाही म्हणून घरी बाहेर जावून येतोय असं सांगत संडासचं डबं पाणी भरुन गल्लीनं निघायचा मगं त्या च बघून एकएक जण घरुन डबा (टमरेल) घेऊन एकापाठोपाठ निघायचे मग गल्लीत काय विचारता? संडासला जाणाऱ्या मुलांची जणू रांगच लागायची व सगळे लाईनीनं निघायचे. त्यावेळी गांवात कोणाकडेच शौचालय नव्हतं. असेल तेही फक्त श्रीमंताच्या घरीच. त्यामुळे गांवातील सर्व बाया माणसे उघड्यावरच शौचास जातं. कधी, कधी तर अम्हा पोरांचा संडासला जायच हा फक्त एक बहाणा असायचा. कारण त्या बहाण्या शिवाय आम्हाला बाहेर जाताच येत नसे.

इकडून तिकडून दगड, विटा माती आणि टमरेलच्या सहाय्याने नदीतून पाणी आणून आम्ही हाताने मातीत पाणी टाकून भिजवायचो व त्याचा गारा तयार करुन किल्ले, मंदिर व थडगेही बनवायचे. कारण आमच्या सोबत सल्या, सम्या, नब्या, गुल्या, लाल्या, फिऱ्या मंजूर ही मुस्लिम मुलही असायची त्यामुळे मंदिरा जवळच पिराचं स्थान व किल्ला आम्ही बनवायचे. मंदिरात एक दगड ठेऊन त्याला शेंदूर लावून त्याची पुजा करायचो तर पिरबाबाला हिरवा कपडा आणून त्या थडग्यावर आथरायचो. मग प्रत्येक मुलाकडून पैसे जमा करुन देवाला व पिरबाबाला

नारळ अगरबत्ती लावून आम्ही सर्वजण डोकं टेकवायचो. सर्वजण मग देवाला नमस्कार करुन आशिर्वाद घ्यायचो. तर पिर बाबाला नमस्कार करुन दुवा मांगायचो. मगं साखर व नारळाचा प्रसाद आम्ही आनंदानं खात असतं. मंदिर, किल्ला व पिराच स्थान बनवतांना आम्ही सर्वच्या सर्व गाऱ्याने माखायचो. त्यावेळी आमच्यात कुठंलाही भेदभाव नसे.

संडासच्या बहाण्याने घराबाहेर पडलेलो आम्ही मग आम्हाला ही कारागिरी करतं तर कधी उन्हातान्हात खेळत बसल्यामुळे घरी जायला उशीर झाला तर मग आमच्या घरचे आम्हाला नदीकडे बघायला येतं. आमचा असा चिखलाने माखलेला अवतार बघून मग आम्हाला खुप बदडायचे. आणि चवल्या, झ्यांग्या यांना खबरदार जर मह्या पोऱ्याले बल्हावलं तूनं अनं येच्यापुढे तेंच्यात दिसले तर याद राखा..... अशी ताकीत द्यायचे. तर चवल्या व झ्यांग्या दोघंही उलट उत्तर देतं. आम्ही सांगलं का मंग तेले....! आमच्या ये म्हणून तोच येतो. असं सांगायचे.

पण आम्ही तेवढ्या पुरता सहन करायचो पुन्हा जे करायच तेच करत असतं. कधी कधी माझ्याकडे पैसे असायचे तर मी क्रिकेटची पैशावर मँच लावायचो. कारण हे मला असं खेळूच देत नसत. म्हणून मला माझ्या पैशाने मँच लावून खेळावं लागी. पण पैसे माझे मँच मी लावायची अनं तरी देखिल मला शेवटीच उतरावं लागत असे. तर कधी, कधी मला बँटींगही मिळता नसे. मी ज्याच्याशी मँच लावली हे त्याच्याशीच आधी फिक्सिंग करुन घेत असतं. त्यामुळे मी एखादवेळा मोठ्या मुश्कीलने क्रिकेटची मँच जिंकायचो. पण मँच जिंकल्यावरही मला यामुलांना मिळालेल्या पैशातून खाण्यासाठी भत्ता (मुरमुऱ्याची सूकी भेळ) मागवावी लागायची तर कधी चवल्याच माझ्याकडून अर्धे पैसे घेऊन घेई. म्हणजे माझा मँच लावूनही काही फायदा नसे.

चवल्यां यांच्या बरोबर खेळायच म्हणजे खुप डेअरिंग लागत असे. त्यांच्या गृपमधील मुलांच्या व्यतिरिक्त दुसरा कोणताही नविन मुलगा त्यांच्यात विटी दांडू, गोट्या गोट्या, सुर पारंबी किंवा लपंडाव खेळायला आला तर हे सारे एकी करुन त्या बिचाऱ्याला रडकूंडी येई पर्यंत राज्य पदवायचे. त्यामुळे कोणताही मुलगा त्यांच्यात खेळायला घाबरत असे.

नदी किनारी मुस्लीमवस्ती होती. या वस्तीत काही बांगडीवाल्यांची घरं होती. या बांगडी वाल्यांनी बदकं, कोंबड्या व बकऱ्या (शेळया) पाळलेल्या असायच्या. पण काय करणार चवल्या, झ्यांग्या व गृपमधील सर्व मुलांच या बांगाडीवाल्या समुदायाशी कधी बनतच नसे. त्यांचा अनं यांचा आधी पासून छत्तीसचा आकडा असे. त्यामुळे ते त्यांच्या मुलांना यांच्यामध्ये कधी जाऊ देत नसत. तर हे जेंव्हाही दिसले तर ते यांना शिव्या देत असतं. त्यामुळेच चवल्यांयांच व त्या लोकांच कधी बनतच नसे. मग चवल्यानहे त्यांच्या अंगणात खुटीला बांधलेल्या बकऱ्या तर कधी डालक्याखाली झाकलेल्या कोंबड्या व बदकं गुपचूप नदिकडे सोडून देत असत तर कधी या बकरींच दूध काढून घेऊन जात तर कधी कोंबडीची व बदकांची अंडी चोरुन आणतं. यांच्या अशा वागण्यानं यांच्यात नेहमीच भांडणं होतं असतं. आणि हा सर्व प्लँन असायचा तो चवल्याचा. कधी कोणाच्या वस्तू चोरुन आणायच तर कधी लोकांच्या घराच्या रात्रीच्यावेळी बाहेरुन कड्या लावायच्या हा त्यांचा नित्यनेम होता. आता दिवाळी सरुन चवल्याचा बापूनं त्यांचा हजामाचा धंदा सोडून, ते आता नविन काम शोधत होते. गांवातीलच काही माणसे विहीर खोदण्याच्या कामाला जात आसंत त्यामुळे चवल्याच्या बापूने कामा संदर्भात त्यांच्या घराजवळच असलेल्या रामभाऊला विचारलं. राम भाऊ अरे रामभाऊ तुमच्या ठेक्यात काही काम आशिनं त सांगशिल माले. मी बी येईन तुमच्या सोबात कामाले.

रामभाऊ म्हणजे विहीर खोदणाऱ्यांचा मुकडदम होता. कोणाला त्यांच्यामेळमध्ये घेणंनं घेणं त्याच्याच हातात होतं. रग्या काम भेटीन पण तुया कडून हूईनं का? रामाभाऊ बोलला.... मगं रे रामभाऊ काबर नही होणार? तु सांगशिल ते करीनं.... रंग्या म्हणाला. बरं तर मगं ये उद्यापासून मी सांगतो ठेकेदारले. सकाळी डबा घेऊन उद्या पासून. बरं बरं लई उपकार होतील रामभाऊ तुह्ये मह्यावर रंग्या बोलला. आरे यृच्यात कुठे आले उपकार एखाद्याले काम मिळालं तर ते त्याच्या नशिबानं आपण कोणं आलो काम देणारे.....? ये तू उद्यापासून.... काम मिळाल्यामुळे चवल्याचा बापू आता खूप आनंदी होता. लक्ष्मी सकाळी लवकर डबा करजो ! काम भेटलं माले आता नविन.... आज पासून हजामचा धंदा बंद ! अहोपण कोणतं काम करणार आहे

मंग तीम्ही आसं? ते तर सांगा? आव म्या उद्यापासून रामभाऊअनं त्यांच्या सोबत विहीरीच्या कामाला जाणार आहे म्हणतो. अहो आरशात तोंड पाहिलं का कधी? तुमच्याकडून साधा दगड उचलला जाणार नही अनं चालले ते विहीर खोदायले..... चवल्याची आई चवल्याच्या बापूले बोलली. ते मी पाहीनं मह्य तू फक्त रोज डबा करायचा. चवल्याचा बापू बोलला.

दुसरा दिवसं उजाडला. चवल्याच्या आईनं सकाळी लवकर ऊठून भाकरी बनवून चवल्याच्या बापाचा डबा बांधला. चवल्याचा बापू आता रामभाऊ अनं गांवातल्याच काही विहीरकाम करणाऱ्या मजुरांसोबत कामाला निघाला. कामाच्या ठिकाणी पोहचल्यावर रामभाऊने रंग्याची ओळख ठेकेदाराशी करुन दिली. पगार ठरला अनं रंग्याचा बापू विहीर खोदायच्या कामाला लागला. खुप मेहनत करु लागला. हजामतीच्या कामापेक्षा या कामात मेहनतं जास्त होती. पण रोजही चांगला मिळत होता. त्यामुळे रंग्या विहीर खोदायच काम मनलावून करु लागला..... लक्ष्मीला वाटायच रंग्या कडून विहीर खोदायच काम होतं की, नाही? पण ते काम रंग्यानं करुन दाखवलं होतं. पैसे मिळत गेल्यावर तो एकेकाची उधारी प्रामाणिकपणे देऊ लागला. आमची देखिल किराणा दुकानाची उधारी तो जसजसे पैसे येत होते तसतसे तो फेडतं होता. आमच्याही दिवाळीच्या सुट्या सरुन आता सोमवार पासून शाळा सुरु होणार होती. त्यामुळे आता सूट्ट्या संपल्यावर शाळेत जावं लागणार आसल्यानं आम्हाला आता शाळेची चिंता वाटू लागली होती.

शाळेचा पहिला दिवसं सोमवार उगवला. शाळा सकाळी दहा वाजता भरत आसल्याने मी सूट्टीच्या सवयीमुळे सकाळी जरा उशीराच उठलो. आंघोळ वैगेरे आटोपून माझं दप्तर घेऊन शाळेत निघालो. शाळेची पहिली घंटा मी बरोबर गेट जवळं असतांना झाली. गुरुजींचा मारं चूकवायच्या धाकांन आम्ही घंटा वाजताच दप्तर घेऊन वर्गाकडे पळालो..... तब्बल एक महिना सूट्टी असल्याने वर्गात जळमट आली होती. खबुतरांनी तर सर्वच वर्गांमध्ये विष्ठेनं घाण करुन ठेवली होती. वर्ग उघडताच अगदी कोंदटवास यायला लागला होता. तशी आमच्या शाळेच्या खोल्या पक्क्या भिंती व वर पत्राचे कौलारुंप्रमाणे उतरते छतं असलेल्या होत्या. त्यावेळी आमच्या

शाळेला खाली फर्शा लावलेल्या नव्हत्या. त्यामुळे वर्गातील जमिन खळखळीत झाली होती. शेणा मातीनं केलेली सारवण उखरुण सर्व जागा पोकळ झाली होती. मी वर्ग मॉनिटर असल्याने दोनं मुलं व दोनं मुल्लींना झाडणी घेऊन वर्ग झाडण्यास सांगितला तसेच मी स्वतः देखिल हातात झाडणी घेऊन आम्ही संपूर्ण वर्ग खोली झाडून साफ केली. आमच्या घरांत उंच मुलगा कोणी नसल्याने आम्हाला वर छताला लटकलेली जळमट काढण्यासाठी हात पुरत नसे. म्हणून गुरुजींकडे जाऊन सांगितलं मगं गुरुजींनी चौथीतल्या उंच मुलाला आमच्या वर्गात पाठवून त्यामुलाने टेबलावर उभं राहून लांबं काठीच्या झाडूने छताला लटकलेले सर्व जळमट झाडूच्या सहाय्याने काढून छत आतून साफ केले. ते साफ करत असतांना पुर्ण वर्गांत घाण पडल्यामुळे पुन्हा घाण झाला होता. म्हणून आम्हाला तो वर्ग पुन्हा झाडूने झाडून स्वच्छ करावा लागला होता. संपुर्ण वर्ग झाडून झ्याल्यावर आम्ही बसण्यासाठी लांब पट्ट्या झटकून आंथरल्या..... त्यावेळी आमच्या शाळेत बसायला बँचच नव्हते त्यामुळे आम्हाला नंबर प्रमाणे ओळीने मुंलांची लाईन वेगळी व मुलींची लाईन वेगळी असं बसावं लागत असे. म्हणून आम्ही आमच्या नेहमीच्या जागेवर नंबर प्रमाणे आपापली दप्तर ठेऊन दरवाजा बंद करुन बाहेर शाळेच्या प्रांगणात कचरा वेचण्यासाठी बाहेर पळालो.

वर्गात कोणी नसल्याची संधी साधत आमच्या वर्गातील काही चोरटी मुलं व इतर वर्गातली मुलं वर्गात विद्यार्थ्यांनी ठेवलेल्या दप्तरांमधून, पुस्तकं, कंपासपेटी, किंवा एखाद्याच्या कंपासित असलेले पैसे चोरुन घेत असतं त्यामुळे आम्ही शाळेच्या प्रांगणात प्राथनेसाठी किंवा काही कार्यक्रमासाठी गेलो की वर्गाचा दरवाजाची कडी बाहेरुन लावून बंद करुन घेत असतं. वर्ग साफ करुन झाल्यावर गोविंद गुरुजी शिट्टी वाजवत सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या पटांगणात जमा व्हावं लागतं असे. शिट्टी वाजली रे वाजली तर सर्व मुले व मुली प्रांगणाकडे धावं घेत असतं. प्रांगणात आल्यावर आम्हां सर्व विद्यार्थ्यांना गुरुजी शाळेच्या आवारात पडलेला कचरा, पालापाचोळा, कागदाचे तुकडे, काटे, काचा उचलायला लावत असे मगं आम्ही शाळेतील सर्व मुलं व मुली दररोज मेंढरांसारखं खाली वाकत शाळेच्या आवारात पडलेला कचरा उचलून साफ सफाई करीत असतं. तर काही मुलं हातात लोखंडी आगदी जूनाट झालेल्या बादल्या घेऊन तो गोळा केलेला कचरा त्यात टाकायला लावायचे.

तसं आमच्या शाळेला आजूबाजूने ताराचे कंपाऊंड होते. एका बाजूने खाली नदी असल्याने त्याबाजूने उंच असा दगडी भिंत होता त्याला आम्ही हुद्दा म्हणतं. समोरुन भलेमोठे लोखंडी गेट वमागील बासूस बारिक बोळ (गल्ली) होती. ती बोळ नेहमीच काट्याच्या वडांगणे बंद केलेली असायची. कारण सूट्टीच्या दिवशी गांवातली मुलं त्या बोळमधून घुसून शाळेच्या प्रांगणात क्रिकेट खेळत तर गांवातील काही मुले दिवसभर पत्ते (जुगार) खेळत असतं. त्यामुळे या मुलांना या शाळेत घुसता येऊ नये म्हणून ती बोळ काट्याच्या वडांगिने बंद केलेली असायची. तसा तो ही गल्ली ते ती गल्ली असा दोनं गल्लींना जोडणारा दुवा असलेला रस्ता होता. बऱ्याच वेळा ही वडांग लोक काढून फेकत पण पुन्हा त्याजागी नविन दाट काट्यांची वडांग (कुंपण) लावली जायची. तसा तो आमच्या गल्लीतून शाळेत यायचा शॉर्टकट रस्ता होता. कारण आमच्या मराठी शाळेच्या मागच्या बाजूला आमचं घर असलेली आमची गल्ली होती. त्यामुळे आम्ही शाळेत जाण्यासाठी त्याच बोळीचा वापर करतं. ती जर बंद असली तर आम्हाला फेऱ्याने फिरुन शाळेत जावं लागत असे. शाळेच्या आवारात भली मोठी अशी निंबाची, निलगिरी, गुलमोहोर, सूईबाभूळ, व पिंपळाची जूनी झाडे होती. त्यामुळे या झाडांचा पाला पाचोळा खाली पडत असे. या झाडांची पिवळी सुकलेली तर काही हिरवी पाने , मुरदाड झालेल्या व हवेमुळे खाली पडलेल्या फांद्या. यांमुळे शाळेच्या आवारात सर्वत्र कचराच कचरा नजरेस पडत असे. म्हणून गुरुजी तो कचरा आम्हाला उचलायला सांगून शाळेचा परिसर दररोज प्रार्थने आधी स्वच्छ करायला लावत असे. काही मुलं कचरा वेचण्याच्या धाकानं वर्गातच लपून बसतं मग गुरुजी सर्व मुले आले की नाही? हे बघतं हातात छडी घेऊन प्रत्येक वर्गात ढूंकून बघतं. कचरा वेचण्याच्या धाकाने एखादा मुलगा किंवा लपून बसलेली दिसलेरे दिसले. तर गुरुजी त्यांना छडीने चांगलेच बदडत असतं. त्यामुळे सर्वजण कचरा वेचण्यासाठी हजर राहतं. मेःढी सारखं खाली वाकून, वाकून कचरा उचलावा लागायचा. थोडंही ऊठून ऊभं झालं तर गुरुजी सपकन मागून काडी ओपायचे. त्यामुळे कितीही कंबर दूखलं तरी आम्हाला, जो पर्यंत पूर्ण परिसर कचरा वेचून साफ होत नाही तोपर्यंत खाली वाकूनच चालावं लागत असे. मग सारा कचरा गोळा झाल्यवर तो बादलीत भरुन दूर

उकीरड्यावर टाकायला जावं लागायच. कचरा वेचून झाल्यावर प्राथनेची वेळ व्हायची मगं सर्व विद्यार्थी कचरा वेचून खराब झालेले हात पाण्याच्या टाकीजवळ जाऊन धूवायचे.... प्राथनेची बेल झाल्यावर सर्वच विद्यार्थी आपापल्या वर्गाप्रमाणे वेगवेगळी लाईन करुन रांगेत उंचीनुसार उभे रहायचे. प्राथनेच्या वेळीही मागे ऊभे असलेले काही आगाऊ मुलं पुढे ऊभे असलेल्या मुलांना डोक्यावर मारतं असतं. कधी त्याचे केस ओढत असत तर कधी त्याच शर्ट किंवा पँड ओढत असतं. त्यामुळे तो मुलगा जोरात ओरडायचा.....

गुरुजी पहा हा मह्य नांव घेतोयं..... केसं तानतोयं....!

असं म्हणताच गुरुजी काहीएक नविचारता दोघांना बदडायचे.

प्रार्थना, पसायदान व राष्ट्रगीत झाल्यावर परिपाठ घेतला जाई.....

परिपाठाच्यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याला उभं करुन त्याच्या कडून दहा प्रश्नांची उत्तरं व त्याला जे काही येतं ते म्हणवून दाखवायला लावतं. मग कोणी कविता म्हणून दाखवायचे, कोणी गाणी म्हणून दाखवायचे तर कोणी गोष्टी सांगत असतं.

अनं ज्याने काहीच म्हटलं नाही त्याला समोर कान धरुन ऊभे करुन छडीचा प्रसाद गुरुजी त्यांना देत असतं. यावेळी सर्व वर्ग शिक्षक तसेच मुख्याध्यापकपण असायचे.

प्रार्थना झाल्यावर सर्व मुलं वमुली आपापल्या वर्गांत रांगेने जाऊन बसतं. वर्गात गुरुजींना यायला उशीर झाला तर मुलं आरडा ओरड करुन गोंधळ घालत असे. मगं म्हणूनच

वर्गात जो पर्यंत गुरुजी येत नाही तो पर्यंत मॉंनिटर ऊभा राहून या विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवत असे. पण हे विद्यार्थी मॉंनिटरचही न ऐकता नुसताच गोंगाट करत असतं. मगं मॉंनिटर वैतागून ऑफिसात बसलेल्या गुरुजींना बोलवायला जायचा. मग गुरुजी कधी हातात छडी घेऊन वर्गात यायचे तर कधी मॉंनिटरला सांगून वर्गात गोंधळ घालणाऱ्या विद्यार्थ्यांचे नांवे टिपायला सांगत असे. मुले शांत बसावी यांसाठी गुरुजी मॉंनिटरला सांगून मुलांकडून कधी पाढे म्हणून

घ्यायला सांगायचे. मग माँनिटर वर्गात आल्यावर सर्वांकडून एका स्वरात पाढे म्हणवून घ्यायचा.... मग पाढे म्हणायला सुरुवात व्हायची.

बे एक बेये....

बे दूने चार....

बे त्रीक सहा....

बे चोक आठ....

बे पंचे दहा....

असं एका आवाजात मुलं दोना पासून शंभर पर्यंतचे पाढे जोरजोरात म्हणायला सूरुवात करायचे. यांतील सर्व विदूयार्थ्यांनाच पाढे तोंडीपाठ होते असं नाही. ज्यांना येत होते ते तोंडी म्हणायचे. ज्यांना पाठांतर नव्हते ते पुस्तकातून पाहून म्हणायचे. ज्यांच्याकडे पुस्तक नसत ते वर्गातील भिंतींवर वर रंगाने लिहिलेल्या फळयांवर बघून म्हणतं.... पण ज्यांना येतच नव्हतं ते फक्तच झिल ओढायचे......

मग वर्गात गुरुजी आले तर सर्व मुले जागेवरुन ऊठून ऊभे राहत; एकसाथ जय हिंद....! असं म्हणायचे. ही आमच्या शाळेची पध्दत होती, पध्दत म्हणण्यापेक्षा परंपरा होती असं म्हटलं तरी चालेल. वर्गात गुरुजी आले, कोणी पाहूणे आले किंवा साहेब आले तर; किंवा कोणाचे पालक जरी वर्गात आलेतना तरी सर्व विद्यार्थी एकसोबत जागेवरुन ऊठून ऊभं राहतं, एक साथ जयहिंद ! असं म्हणायचे.

गुरुजी वर्गात आल्यावर ज्याने कोणी आगाऊपणा केला त्याला ऊभं करुन तसेच माँनिटरने ज्या आगाऊपणा करणाऱ्या मुलांची नांवे लिहून ठेवलीय त्यांना छडीने बदडायचे.

मग लाकडी टेबलाच्या कप्प्यात ठेवलेले हजेरी पुस्तक काढतं विद्यार्थ्यांची हजेरी घेत.....

एक नंबर....

जय हिंद! सर....

दोन नंबर

प्रत्येक मुलगा आपला नंबर आल्यावर गुरुजींना जय हिंद सर असं म्हणायचा.... कोणी एखादा आलेला नसला तरी काही आगाऊ मुलं गुरुजींनी त्या मुलाचा नंबर पुकारताच जय हिंद सर म्हणायचे. गुरुजींच लक्ष नसलं तर त्यामुलाची त्या दिवसाची हजेरी भरली जायची. जर गुरुजींच लक्ष असलं तर त्या मुलाची हजेरी देणाऱ्या मुलाला चांगलच बदडायचे. वर्गात जो विद्यार्थी किंवा विद्यार्थीनी हजर नसेल त्या विद्यार्थ्यांना बोलवण्यासाठी काही विद्यार्थ्यांना पाठवतं असतं. हे मुलं बोलवायला गेल्यावरही तो आला तर ठीक नाही तर त्याला टांगाटोली करुन उचलून आणायला लावत असतं. मग हे गैरहजर असलेले मुलं घरी बोलवायला आलेल्या मुलांना आम्ही घरी आहेत अस गुरुजींना सांगू नका.... तो घरी नाही असं सांगा. मग मी तुम्हाला बोरं आणून देईल, चिंचा आणून देईल.... कैऱ्या आणून देईल किंवा पेन्सिला देईल असे आमिश द्यायचे. कधी कधी गुरुजी वर्गातील काही विद्यार्थ्यांना सोबत घेत गैर हजर विद्यार्थ्यांच्या घरी जावून त्यांना टांगाटोली करुन बळजबरी उचलून आणत असतं. मगं ही मुल गुरुजींच्या धाकानं घरात किंवा बाहेर कुठेतरी लपून बसतं.

आज दिवाळीच्या सूट्ट्या संपून शाळा सुरु झाली.... शाळेचा पहिला दिवस असल्याने बरेच विद्यार्थी गैर हजर होते. त्यामुळे विद्यार्थी संख्या फारच कमी होती. त्यामुळे कोणत्याच शिक्षकांनी मुलांना काहीच शिकवले नाही. शाळा नेहमीच्या वेळे पेक्षा अर्धातास लवकरच सोडून दिली होती. शाळेच्या दूसऱ्या दिवशी देखिल प्रत्येक वर्गातील बरेच विद्यार्थी गैरहजर होते. त्यामुळे त्यां त्या वर्गातील वर्ग शिक्षकांनी काही विद्यार्थ्यांना घरी जावून बोलवून घेण्यास

सांगितले. गुरुजींच्या आज्ञेप्रमाणे काही मुलं या गैरहजर विद्यार्थ्यांच्या घरी जावून त्यांना घेऊन आले. तर काही दिवाळी निमित्त बाहेरगांवी गेलेली होते ते मात्र घरी नसल्यामुळे ते त्या दिवशी हजर झालेच नाही. तसा आज चवल्याही शाळेला दांडीच मारणार होता मात्र त्याच्या वर्गातील काही मुलं त्याच्या व झ्यांग्याच्या घरी जावून या दोघांना घेऊन आले. बऱ्याच दिवसांपासून शाळेला दिवाळीच्या सूट्ट्या असल्याने सर्वच वर्ग खळखळीत झालेले होते. त्यामुळे सर्व वर्गांमध्ये सारवण करुन घ्यायची अस गुरुजींनी ठरवलं. तसं आमच्या शाळेतील सर्व वर्गांमध्ये दर दहा दिवसांनी शेणाने सारवलं जायच. आजही सर्व वर्ग सारवायचे असल्याने दुपारी चार वाजता तिसरी व चौथीच्या काही विद्यार्थ्यांना गुरुजी गुरांच शेण तसेच बादली बादलीने पाणी आणायला पाठवतं. यासाठी ठराविकच मुलांची ड्युटी असायची. आणि बाकी अभ्यासू मुलांना शाळेच्या आवारात झाडाच्या शितल छायेत बसवून शिकवलं जाई.... आज नेहमी प्रमाणे सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे वर्ग सारवायचे असल्याने त्यांना झाडाखाली वर्गाप्रमाणे रांगेत बसवण्यात आले. गुरुजींनी दणगट विद्यार्थ्यांना ऊभ केल बादल्या घेऊनजा व शेण आणि पाणी घेऊन या..... असं सांगितलं त्यात चौथीच्या वर्गातील चवल्या, झ्यांग्या, ढेम्या, पदामड्या, सम्या आणि राक्याला उभं केलं तर आमच्या इयत्ता तिसरीच्या वर्गातील नंद्या, चंद्र्या, नब्या, अनं दिप्याला उभं केलं. शेण व पाणी घ्यायला जाण्याच्या निमित्ताने अभ्यासातून सूटका होऊन बाहेर फिरायला मिळत असल्याने जो तो विद्यार्थी पाणी व शेण घ्यायला जाण्यासाठी जागेवर बसून हात उंचावत बोट वर करतं..... गुरुजी मी, गुरुजी मी जातो अस सांगायचे. पण गुरुजी सर्वांना कधीच पाठवत नसत. त्यामुळे मोठ्या मुश्कीलने या विद्यार्थ्यांना संधी मिळायची. आम्हालाही या मुलांसारख शेण पाणी घ्यायला जायला मिळावं म्हणून मुलं कायपात्या करतं गुरुजींना सांगत असतं. दोनं दोन जणांच्या जोड्या बनवून यांना लोखडी बादल्या दिल्या जातं. अर्ध्या मुलांना शेण आणायला सांगत तर अर्ध्या मुलांना पाणी घ्यायला.  मग हे दोनं दोनं मुलं बादलीच्या कडीमध्ये लांब जाड काठी आडकवत एक या बाजूने व दूसरा त्याबाजूने असं धरत कोणी शेण व कोणी पाणी घ्यायला जात असतं. त्या बादलीच्या कडीमध्ये अडकवलेली ती लांब काठीला घुंगरु आसतं. म्हणजे त्या काठ्या अशा शेण पाणी आणण्यासाठी नव्हत्या तर त्या कुठल्या मैदानी खेळासाठी शाळेने बनवलेल्या

असायच्या मात्र आमच्या शाळेत या जाड रंगेबी रंगी दिसायला आकर्षक व दोन्ही बाजूने बारिक छानपैकी घुंगरु लावलेल्या काठ्यांचा वापर खेळसाठी नव्हे तर बहूदा याच कामासाठी केला जात असे. मग ही मुलं बादलीत ही काठी आडकवली की, एकाने इकडून तर दुसऱ्याने तिकडून ती काठी पकडली की शेण व पाणी घेण्यासाठी पळत सूटतं. त्यामुळे या काठींना असलेले घुंगरं छान पैकी बैलांच्या घुंगरांसारखे छून छून... छून छून..... असा आवाज करायचे. मुलांना याची मजा वाटायची म्हणून ते आणखिनच जोरात पळत सूटतं.....

तेंव्हा शाळा सारवायला शेण आणनं म्हणजे कोणाच्या शेतात किंवा गोठ्यात गेलं अनं गुरांच शेण उचलून आणनं असं इतकं सोपं नव्हतं. कारण कोणताही व्यक्ती आपल्या गोठ्यात किंवा शेतात असलेल्या गुरांच शेण घेऊच देत नसत. म्हणून शेण आणायला गेल्यावर नदीथडी किंवा शेत रस्त्यांवर दूर दूर पर्यंत भर ऊन्हात काट्या पेट्यातून वाट काढतं शेणं शोधत व गोळा करत, फिरावं लागत असे. शेण घ्यायला जाणाऱ्या या मुलांच्या पायात तर कधी चपला नसल्याने यांना तसच जावं लागायच. कधीतर यांच्या पायात शेण घ्यायला गेले तर पायात काटे किंवा काचा घुसल्यास पायातून रक्त येतं पाय रक्तभंबाळ होत असतं. त्यांना मात्र त्याची सवयच होती. त्यामुळे त्याना काहीच वाटत नसे. यांमुलां पैकी कोणाच्या पायात चप्पल नसेल तर गुरुजी या मुलांना कोणाची तरी चप्पल घेऊन जा रे..... तसं बिना चपलेच जाऊ नका काटे मोडतीन पायात.  असं नेहमी सांगत असतं कधी, कधी तर गुरुजी त्यांच्या स्वतःच्या चपलाही या मुलांना देत या मुलांना पाठवतं असतं.

पाण्यासाठी तशी आमच्या शाळे समोर हापसणी होतीच परंतू ती देखिल मुलांच्या खोडसाळ पणामुळे किंवा काही धूणं धूवायला येत असलेल्या बाया किंवा पाणी भरण्यासाठी येत असलेल्या माणसांच्या आडमुठ्ठे पणामुळे जोरजोरात, खटम.... खटम..... खटमं..... खटमं.... हापसण्यांमुळे तुटून पडल्याने बंदच असायची. त्यामुळे सरवण्यासाठु लागणारे पाणी घ्यायला मारोती मंदिरां जवळील ग्रामपंचायतच्या नळावर किंवा गांवा बाहेर दूर शेतशिवाराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील शिव जवळील गुरांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी बनविण्यात आलेल्या हाय वरुन पाणी आणावं लागत असे. इतक्या लांबून पाणी आणतं , आणतं मुल दमफुस व्हायचे.....

मग बादलीच्या सहाय्याने पाणी आणून ही मुलं शाळेत ठेवलेल्या पाण्याच्या टाकीत पाणी ओतून त्या टाक्या भरत असतं. कारण शेणाने सर्व शाळा सारवायची म्हटल्यावर खुप सारं शेणं व पाणी लागत असे. त्यामुळे इकडे काही मुलींना सांगून वर्ग सारवून घेत असतं तर या मुलांना मात्र पूर्ण शाळा सारवून पुर्ण होत नाही तोपर्यंत शेण व पाणी कमी पडू नये याची काळजी घेत सर्व वर्गखोल्या सारवून होतील इतकं मुबलक प्रमाणात शेण व पाणी आणून ठेवावं लागत असे. मग ही मुलं शेण आणून त्याचा एका ठिकाणी बादलीतून ओतून ढीग लावतं तर पाणी आणणारी मुलं टाक्या भरुन ठेवतं असतं. आता ही सर्व मुले कोणी शेण घ्यायला तर कोणी पाणी भरायला बादल्या घेऊन निघाले..... रस्त्यावर मिळेलं तेथूनं गुरांच शेण भरुनं ते बादलीत भरुन हे शाळेत आणू लागले..... आता झ्यांग्या अनं चवल्याला बाहेर फिरायचा मोका मिळाला रे मिळाला मग घ्या समजून हे एक दोन बादल्या शेण आणून बाहेर जाऊन तंबाखू तसेच गुटखा खाऊन झाल्यावरच यायचे.... आता हे शेण गोळा करता करता या चवल्याने व झ्यांग्याने गाय, म्हैस, बैल या व्यतिरिक्त नको नको त्या प्राण्यांच शेण म्हणजेच दोन पायाच्याही प्राण्याच सुध्दा आपल्या बादलीत भरुन ते घेऊन आले व शाळेत आणून त्या शेणाच्या ढिगावर त्या बादल्या ओतून दिल्या.

आता मुली इकडे हाताने वर्ग खोल्या सारवत होत्या काही मुली व मुलं त्यांना ढिगाऱ्यातून शेण व पाण्याच्या टाकीतून पाणी आणून पुरवत होते. आता सारवता सारवता या मुलींना दुर्गंधी यायला लागली. या मुली ह्या श्शी....... अस म्हणतं नाकाला हात लावतं उठल्या व वर्गातून उठून बाहेर पळतं आल्या.

गुरुजींना सांगत बोलल्या ;

गुरुजी, गुरुजी आम्ही नाही सारत जा!

कसलातरी नुसता घाणं वास येतोय इथं...... गुरुजी मुलींना म्हटले अगं मुलींना शेणं ना ते मगं वास तर येणारच त्याचा त्यातून थोडी अत्तराचा सुगंध येणार.....! असं म्हणतं गुरुजी हसले. मुलेही हसायला लागली.

पण गुरुजी हा वास शेणा व्यतिरिक्त दूसऱ्याच कोणत्यातरी शेणाचा आहे. मुली बोलल्या.

आता गुरुजींना शंका आली या मुर्खांनी गाय, म्हैस, बैल व्यतिरिक्त दूसरच कोणतं शेणं आणलं असावं? गुरुजींनी वर्गात जाऊन बघितलं तर खरोखर अतिशय खराब वास येत होता. गुरुजी नाकाला रुमाल लावत वर्गाच्या बाहेर आले. हे शेण घ्यायला गेलेली मुलं हायवर हातपाय धुवायला गेलेले होते. ते तेथून परतताच गुरुजींनी त्या सर्वांना उभं केलं. शेणं घ्यायला कोण, कोण गेलं होतं रे....? या मुलांनी पटकन सांगितलं गुरुजी आम्ही....!

गुरुजींनी उभं केलं म्हटल्यावर चवल्याच्या मनात शंका आली.....

" होना हो काही तरी लोचा झालाच आहे?" म्हणून त्याने हळूच झ्यांग्याच्या कानात सांगितले बेटा आता काही खरं नाही.... आपण आणलेल्या शेणाचाच काहीतरी गफला आहे वाटतं?

गुरुजी या मुलांना घेऊन वर्गात गेले. आणि विचारलं तुम्हाला इथं काही वास येतोय का? कोणी बोलायच्या आतच चवल्या गुरुजींना बोलला.... 'गुरुजी शेणाचा वास येतोय लई'!

मुर्खा शेणा व्यतिरिक्त दुसरा.... एक मुलगा हूशार होता त्याने नाकाला हात लावतं सांगितलं गुरुजी हा दूसऱ्याच कुठल्या शेणाचा वास आहे. असं म्हणत तो बाहेर आला व त्या पाठोपाठ सर्व मुले बाहेर आले.

गुरुजी संतापले..... मुर्खांनो शेण घ्यायला तर तुम्हीच गेले होते ना? मगं.....

कसलं कसलं शेण उचलून आणलं तुम्ही?

गुरुजी आम्ही तर बरोबर शेण आणलं..... त्यांच्या पैकी एक राक्या बोलला.

मग हे दूसरं शेणं आलं कूठूनं? असा प्रश्न विचारतं गुरुजींनी या सर्वांना छडीने सपासप बदडले. जो पर्यंत खरं सांगत नाही तोपर्यंत मारेल. खरं सांगा कोणी आगाऊ पणा केला हा?????

तसं ही सर्व मुलं खरच सांगत होती यात दोष यांचा नव्हताच, तरी देखिल यांना मार खावा लागत होता. खरा दोष होता तो चवल्या व झ्यांग्याचा.... मात्र ते त्यांची चूक कबुल करायलाच तयार नव्हते.

एक मुलगी पळत आली.... ती इतर मुलींपेक्षा जरा आगाऊच होती. आम्ही सर्वजण तिला “दगडी” म्हणायचो. ती स्वभावाने रागिट आणि फटकळ होती. कोणी तिच नाव घेतलं रे घेतलं तर ती दगड घेऊन तिच नांव घेणाऱ्यांच्या मागे मारायला धावत असे.... म्हणून तिला सर्वजण “दगडी” म्हणून चिडवायचे. तसं हजेरी पुस्तकावर तिच नांव अर्चना होतं. पण तिला अर्चना कोणी म्हणत नसे. ती चौथीच्या वर्गात होती. गुरुजीं, गुरुजी ह्याच बादलीचा गंधा वास येतोयं....

ते म्हणतातना चोर कितीही हूशार आसला तरी काहीना काही पुरावा नक्कीच मागे ठेवत असतो. अगदी तसच या चोराने देखिल पुरावा मागे सोडला होता. तर दगडीनं एखाद्या जासूसा प्रमाणे ओळखून दुर्गंधी याच बादलीतून येतेयं हे तिला कळलं. आणि तिने गुरुजींना सांगितलं. तू गेली होती का? त्या बादलीचा वास घ्यायले.... गुरुजी हसतं, हसतं दगडीला बोलले....

गुरुजी दगडीला बोलताच सर्व विद्यार्थी हसायला लागले. ती रागाने बघायला लागली. अनं तनक्यानं खाली बसली.

आता गुरुजींनी विचारलं....

ही बादली कोणाची रे? कोण घेऊन गेलं होतं रे ही बादली?

गुरुजीं ही बादली आमची नाही, आमची नाही..... आम्ही नव्हतो घेऊन गेलो. आसच प्रत्येक जण सांगत होते. आता गुरुजी बोलले खरं सांगा....! कोणाचीय ही बादली? नाहीतर एकेकाला काडी, काडीने बदडेल.... असा काठीचा धाक दाखवताच मुलं घाबरली. एक मुलगा

म्हणजे नंद्या बोलला गुरुजी ही बादली का राहूलची आणि ग्यानबाची आहे. राहूल म्हणजे चवल्या तर ग्यानबा म्हणजेच झ्यांग्या या दोघिंची ही बादली होती. गुरुजींनी दोघांना विचारलं कारा ही बादली तुमची आहे का? यावर यांनी नकार घंटा हलवली.... नही गुरजी ही बाल्टी आमची नही. गुरुजींनी यांच्या दोघांच्या उघड्यां पायावर सपासप काठी ओपली. व माय मं व माडे.... म्हणतं पाय चोळत खाली बसले.... हाप पँट असल्याने दोघांच्या पायावर छडी जोरात बसताच दोघांच्या पायावर वळ उमटले. दोघांच्या डोळयात पाणी तरारलं.... करशान याच्या पुढे असं? आ.... करशानं आसं? गुरुजी असं बोलत होते व त्या दोघांच्या पायावर सपासप छड्या मारत होते. कधी हाताने त्यांच्या गालफट्यांत देत होते. हे दोघं सर मारु नका ना... आता नही करणार आम्ही..... येच्यापुढे असं अस म्हणून गयावया करत होते. इतक्यात शाळा सूटण्याची घंटा वाजली . तेंव्हा कुठे चवल्या व झ्यांग्या यांची सूटका झाली. मुलं आपापली दप्तरे घेऊन घराकडे पळतं सूटली.... यांनीही आपले डोळे पुसतं दप्तर घेऊन घराकडे निघाले. गेट च्या बाहेर येताच चवल्या झ्यांग्याले बोलला..... ग्यानबा मजा आली ना???? आणि डोळे पुसत हसू लागला. जाऊ देरे भो तिकले तूया नांदी लागनं अनं धकमालनं हे.... झ्यांग्या म्हणाला. डोळे पुसतं पुसतं दोघ हसायला लागली व कमरेवरची पँन्ट करधोड्याने अटकवत दोघं घराकडे पळत सूटले.... झालेल्या प्रकाराचा कुठालाही पश्चाताप या दोघांच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता.

चवल्या घरी पोहचला.... त्याच्या आईचं लक्ष त्याच्याकडे गेलं. गुरुजींनी मारल्यामुळे त्याचा गाल अधिकच लाल होऊन चांगलाच सूजला होता. कायं रे रावल्या गाल कसा लाल झाला? अनं हे पायावर कशाचे वय उमटले रे....? त्याच्या आईनं विचारलं.

काहीनही व माय गुरुजींनी मारलं. चवल्यान सांगितलं.

चांगलं बदड्याले पाहिजे व्हत तुले अजून.... तेवा तुही खोडं मुडीन. तेच्याशिवाय नाही सूदरणार तू.....काहीतरी आगाऊपणा केला आशीनं तुनं शायेत म्हणून मारलं आशिन तुले. काय

केलतं तून? काहीनी व माय असं म्हणतं नेमकं काय घडलं? हे सांगायच चवल्यान टाळलं.... माय मले भुक लागलीयं जेव्याले दे मले. चवल्या बोलला.

अरे ते हात पाय त धोयं.... काय आवतार झाला भंगट सारखा.... असं म्हणत चवल्याची आईने त्याला हात पाय धूवायला लावले.

तोपर्यंत चवल्याच्या आईनं त्याला भाकर अनं तिखट थोडं तेलटाकून एका ताटलीत त्याला दिलं. हातपाय धूवून चवल्या जेवायला बसला. जेवण झाल्यावर हात धूऊन पाणी पिल्यावर जेवणाची ताटली तिथच जागेवर पडू देत बाहेर पोरांमध्ये खेळायला पळत सूटला. त्याची आई त्याला मागून हाका मारतं "चवल्या ओ चवल्या अरे ती ताटली त ठेव रे मधी"..... अस म्हणाली. पण चवल्या का ऐकणारं? त्याला केंव्हा एकदा बाहेर मुलांमधी खेळायला जावं असं झालं होतं. म्हणुनच तो माय तूच ठेवत बस ती ताटली असं म्हणत पळत सूटला.

संध्याकाळ झाली म्हणजे नदीत मुलांची जत्राच जमायची. अनं चवल्या आला म्हणजे घ्याच समजून मग नदीत विट्टी दांडू, गोट्या गोट्य, क्रिकेट कधी झाडांवर सूर पारंब्या, कधी कधी तर नदीच्या बारिक रेतीमध्ये कुस्त्याही खेळायचे. जरा अंधार झाला तर मगं छूून छूून डबडी बारा नगरी खांब कोणता.... हा खेळ खेळायचे.... हा खेळ जरा गमतीदार होता. यांमध्ये जूया मुलावर राज्य यायचा तो एकटा उभा असायचा..... आणि बाकी खेळणारी मुलांपैकी एकजण त्याच्या हातावर थाप मारत 'छूून छूून डबडी बारा नगरी खांब कोणता?' असं विचारायचा. मग तो मुलगा गावातील कुठलाही लाईटाचा खांब सांगायचा मग हे सर्व मुलं खाली बसतं, बसतं त्या खांबाला टिपण्यासाठी म्हणजे त्या खांबाला हात लावण्यासाठी जात असतं. ज्याने त्या खांबाला पोहचून हात हात लावला तो सूटला. पण जो कोणी उभा रहत पळाला आणि त्याला ज्याच्यावर राज्य आहे त्याने पकडलं तर त्या मुलावर राज्य यायचा असा तो खेळ होता. तो खेळ आमच्या गांवचा प्रसिध्द खेळ होता. मग या खेळात बोअर झाले तर लपंडाव खेळायचे त्या खेळाला आमच्याकडे "लपाछपी" असं म्हणतं. आता मुलं "छूून छूून डबडी" खेळत होते.

तितक्यात गावचा कोतवाल ज्याच्याकडं दवडी दवंडी द्यायचं काम होतं. मग दवंडी म्हणजे गावात कुठली शासकीय योजना असो..... कोणती खबर असो याची लोकांना माहिती व्हावी यासाठी कोतवाल गांवातील चौकाचौकात जाऊन दवंडी देत असे. आज नेहमी प्रमाणे दवंडी देणारा तुकाराम बुवा आमच्या गल्लीतील चौकात असलेल्या बत्तीच्या खंब्याजवळ येऊन त्यानं गळयात अटकवलेलं डफडं जोरात ढढांग.... ढढांग...... ढढांग.... असं वाजायला सूरवात करतं

ऐका हो ऐका..... तमाम लोकांना कळविण्यात येते की,

पुन्हा ढढांग.... ढढांग.... ढढांग..... असं डफडं वाजवतं..... डफाड्याचा आवाज ऐकून

त्याच्या आवती भोवती ती दवंडी ऐकण्यासाठी लोकांनी गर्दी केली. इकडे मुलही डफड्याचा आवाज ऐकताच आपलं खेळण बंद करुन दवंडी देणाऱ्याच्या आवती, भोवती गोळा झाली. दवंडी वाला दवंडी देतं होता. मध्ये मध्ये पाँस घेत डफडं वाजवत होता.

आपल्या गांवात

स्वच्छ गांव योजनेंतर्गत

शौचालय बांधण्यासाठी

सरकार कडून अनूदान मिळणार आहे.

तरी ज्या नागरिकाकडे स्वतःची जागा आहे.

अशा लाभार्थ्यांनी व ज्याला या योजनेचा फायदा घ्यायचा आहे. अशा नागरिकांनी आपले अर्ज भरुन..... या महिन्याच्या तीस तारखे पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात जमा करावे हो...... ढढांग.... ढढांग.... ढढांग..... (डफडं वाजवताच) मुलं एका आवाजात जोरात हो......

ओ...... असं ओरडायचे. दवंडी देणारा तुकारामबुवा संतापायचा तो आपला डोळयांवर असलेला मोठा जाड भिंगाचा चष्मा सावरतं, मुलांवर काठी ऊगारायचा. तो ज्या ज्या चौकात दवंडी द्यायचा आम्ही सर्व मुलं त्याच्यामागं मागं गांवभर हिंडायचो..... यातही चवल्या सर्वात पुढे असायचा. कोणा मुलाची त्या दवंडीवाल्या मागे जायची इच्छा जरी नसली तरी तो बळजबरी “जी येणार नहीं तो रे भो......” अशी शपथ घालायचा. त्यामुळे नाईलाजाने सर्व मुले जात असतं. मुलांनाही मज्जा यायची. मुलं जोरजोरात ओरडायची. तर गांवातील बाया माणसं ‘काय वात झाला येणले बोंबल्याले....?’ असं म्हणतं कारे पयता का नही रे घरी असं म्हणतं पळवून लावत असतं. पण मुलं यांच ऐकणार तर नवलच. हा आमचा नित्याचाच उद्योग असे.....

रात्रीचे जेवणं आटोपली की, मुलं पुन्हा जमा व्हायची. कोणी नसलं तर चवल्या कोणाला तरी पाठवून मुलांना बोलवून घ्यायचा. कधी कधी तो त्यामुलांच्या घरच्यांच्या धाकाने गुपचूप बोलवून आणायचा तर कधी, कधी गल्लीनं जोरांत तोंडाने शिट्टी वाजवत यायचा. मुलांना शिट्टीचा आवाज आलारे आला..... की, सर्व मुलं बशिरच्या दूकानाजवळ जमा व्हायची. बशिरच दुकान म्हणजे आमच्या गल्लीतील चौकातलं फेमस दूकान होतं. आणि दूकान ज्या चौकात होतं तो चौक आमच्या बाहेरपुरा भागातील सर्वात मोठा मोकळी जागा रुंद रस्ता असलेला चौक होता. त्यामुळे दिवसभर आम्ही त्याच चौकात असायचो. खेळण झालं की जो तो रात्री उशीराच घरी जायचा. त्यावेळी आमच्या गांवात बोटांवर मोजता येईल इतक्याच लोकांनकडे टि.व्ही होते. त्यातही ते ब्लँक अँण्ड व्हाईट असतं. त्या ब्लँक अँण्ड व्हाईट टि.व्हीला आम्ही साधी टि.व्ही म्हणत असतं. त्यावरही मुंग्या यायच्या मुंग्या यायच्या म्हणजे खरं खरं... खर.... खर...... खरखर.... असा आवाज करत चित्र गायब व्हायचं यालाच आम्ही टि.व्हीला मुंग्या येताय अस म्हणायचो. मग टि.व्हीला मुंग्या आल्यावर त्या टि.व्ही वाला घरचा मनुष्य धाब्यावर चढून धाब्यावर लांब उंच लोखंडी किंवा प्लास्टीकच्या पाईपाला लावलेला अँटीना फिरवायचा. मग चित्र व्यवस्थित झाल की, आलं आलं... चित्र बस बस असं आम्ही खालून ओरडायचे. पुन्हा चित्र दिसणं बंद झालं

की काका अजून थोडा फिरावा अँटींना असं कोणीतरी सांगायच. कारण आम्हाला त्या टि.व्हीवरही पिक्चर बघायची खुप उत्सूकता असायची. तशा गलीत चार पाच जणांकडे टि.व्ह्या होत्या. पण सगळेचजण या मुलांना टि.व्ही बघायला येऊ देत नसत. हे मुलं टि.व्ही बघत असतांना बडबड करतं, मारामाऱ्या करत म्हणून ते टि.व्ही वाले यांना हाकलून देत व दार लावून घेत असतं. मग हे जिथं जिथं टि.व्ही आहे तिथं जावून रावण्या करायचे

ओ काका येवू द्याना.... आता नाही करणार ना आम्ही मारामाऱ्या.... गुपचूप बासू आम्ही असं सांगत पण ते लोक दरवाजाच उघडत नसत. मगं हे निराश होऊन निघून जायचे तर कधी हे आपल्याला येऊ देत नही का? थांबा मंग असं म्हणतं त्यांच्या दरवाजाच्या कड्या वाजवून पळून जात व त्यांनाही टि.व्ही बघू देत नसत. गांवात त्यावेळी कलर टि.व्ही दोन तीन लोकांकडेच होते. त्या पैकीही एकाजणाकडे टि.व्ही बघण्यासाठी टि.व्हीवरील सिरियल, पिक्चर बघण्यासाठी बाया माणसांची गर्दी व्हायची ते मात्र कधी कोणाला हाकलत नसत. त्यांना माहित होतं यांच्याकडे टि.व्ही नाही म्हणून ते आपल्याकडे टि.व्ही बघण्यासाठी येतात.....मगं आमच्यागल्लीतले बरीच मुल तिथंच टि.व्ही बघायला जात असतं. ज्यांच्याकडे टि.व्ही होता तेही श्रीमंत मारवाडी होते. या मुलांसोबत कधी, कधी मी देखिल जायचो त्यावेळी आमच्याकडेही टि.व्ही नव्हता. गांवात कोणाला मुलगा झाला किंवा मुलगी झाली किंवा गणपतींच्या दिवसांत व्हिशार व कलर टि.व्ही भाड्याने आणून पिक्चर दाखवत असतं. ज्यादिवशी हा पिक्चर आसायचे त्या दिवशी गांवभर दवंडी दिली जायची मग लोक बरोबर रात्रीचे जवणं आटोपून खाली बसायला गोणटं घेऊन जात असतं. त्यावेळी माहेरची साडी, सूनलाडकी सासरची, हळद रुसली कुंकू हसला, हळदी कुंकू, हे मराठी चित्रपट तर हम आपके है कोण? फुल और काँटे, करण अर्जून, विरासत, क्रांती , क्रांतीवीर या चित्रपटांना खुप गर्दी व्हायची. हे पिक्चर बघतांना एखादा ईमोशनल सिन आला की सर्वांच्या डोळयात पाणी दाटायच.

त्यावेळी शुक्रवार व शनिवारी दुर्दर्शनवर रात्री साडे नऊ वाजता पिक्चर लागायचे. ते बघण्यासाठीही सारेच गर्दी करायचे. दर गुरुवारी एका चैनलवर रात्री दहा वाजता “आहट” हे

भुताच नाटक लागायच हे नाटक बघायला दर गुरुवारी चवल्या व गल्लीतले सर्व मुलं आवर्जून जात असतं. कधी कधी मीही जायचो त्यांच्या सोबत. ते नाटक रात्री बारा वाजता सूटायच त्यामुळे घरी यायला खुप उशीर व्हायचा. नाटक सूटल्यावर एकट्याने घरी यायच म्हटलं तर पंचायतच व्हायची. रात्रीचा गडद अंधार, सारा गांव झोपलेला. त्यातच कुत्र्यांच भुकत मागे लागणं हे सारं भितीवहच होतं. त्यामुळे कोणा एकट्याची रात्री एकटं घरी यायला हिंमतच होत नसे. त्यामुळे चवल्या व इतर जवळपास दहा बारा मुले सोबतच जायची व सोबतच यायची. यात प्रामुख्याने चवल्या, ढेम्या, झ्यांग्या, पिस्तोल्या, नब्या, पदामड्या, तीस नंबर, हे नेहमीच असायचे. नाटक सूटल्यावरही हे कधी मुकाट्यानं घरी येत नसत. कधी रस्त्याने आरोळया मारत तर कधी कोणाचे दरवाजे ठोकत तर कधी कोणाच्या कड्या लावतं. कधी कधी दरवाजांना दगडं मारतं. कधी कधी चित्र विचित्र आवाज काढत येत असतं. यांच्या अशा वागण्यामुळे सारेच तंग आले होते. कधी तर हे एखाद्याच्या घराची बेल वाजवत ऊठा पाहूणे आले.... चहा ठेवा चहा असं म्हणायचे. मग एखाद्यानं बघितल त्याला वाटलं खरोखर एवढ्या रात्री पाहूणे आले की काय? म्हणून ते दरवाजा उघडून बाहेर यायचे. मग मुलं त्या माणसाला पाहून पळत सूटायचे. या अशा चमत्कारी वागण्यामुळे चवल्याकडे घरी नेहमी भांडणे येत असतं. एकदातर यांनी गांवातील डॉक्टरकडे जाऊन त्यांचा दरवाजा ठोकला. डॉक्टरसाहेब, डॉक्टरसाहेब दरवाजा उघडा रोडावर अँक्सिडेंट झाला तुम्हा अर्जंट बलावलं अस सांगितले. डॉक्टरांना खरं वाटलं वैद्यकिय सेवेसाठी ते अगदी तत्पर होते. डॉक्टरांनी खरोखरं गाडी काढली व रोडाकडे निघाले. हे मुलं हसत, हसतं घराकडे पळाली. डॉक्टर मात्र तिथं जाऊन फजित झाले. कारण तिथं मुळात अँक्सिडंट झालेलाच नव्हता.....

असंच एकदा “आहट” नाटकं पाहून आल्यावर रात्रीच्यावेळी सारं गांव झोपलं होतं. तर एक म्हातारा अंगणात खाटेवर झोपलेला होता. त्या म्हाताऱ्याला सारे कुमकुम बाबा म्हणत

असतं. मग विचारता चवल्याच्या डोक्यात काय कल्पना सूचली. तर चवल्याने आपल्या चमत्कारी मित्रांच्या मदतीने त्या खाटेवर झोपलेल्या म्हाताऱ्याची खाटं हळूच कशी उचलत खुप लांब घेऊन जाऊन नदीमध्ये ठेऊन आले. म्हातारा गाढ झोपेत आसल्याने त्याला हे कळलच नाही. आणि हे सर्व घरी येऊन झोपून गेले. म्हातारा सकाळी ऊठून बघतो त काय? त्याला वाटलं आपण इथं कसं आलो? असा प्रश्न त्या म्हाताऱ्याला पडला. त्या म्हाताऱ्याचे घरचे म्हातारा तर इथंच झोपलेला होता गेला कुठे? म्हणून गांवभर शोधत फिरले.

ज्या दिवसांपासून चवल्याला शाळेत मार मिळाला त्या दिवसांपासून चवल्यानं शाळेत जाणच बंद केलं होतं. तो घरुन शाळेच नांव करुन निघायचा खरा पण मुळातं शाळेत पोह्चतच नसे. मुल घरी बोलवायला यायची पण तो घरीपण नसायचा. शेतात, जंगलात कुठे, कुठे तो फिरत बसायचा. त्याचा जीवलग मित्र ग्यानबा म्हणजेच ज्याला ज्याला झ्यांग्या म्हणत असा झ्यांग्यानेही आता शाळा सोडली होती. हे दोघं दिवसभर गांवात उचापत्याच करत फिरायचे. ज्यावेळी यांच्या घरच्यांना कळलं हे शाळेतच येत नाही त्यावेळी यांच्या घरच्यांनी यांना बऱ्याचदा शाळेत बळजबरी पाठवण्याचा प्रयत्न केला मात्र हे दोघं तेवढ्या पुरता शाळेत यायचे मात्र थोड्या वेळातचं खिडकीतून दप्तर शाळेच्या बाहेर फेकून लघवीच नांव करुन पळून जात असतं.

आता त्यांच शाळेत पहिल्या सारखं मन लागतच नसे म्हणून त्यांनी शाळेत जाणच कायमच बंद केलं. घरचेही आता सांगून थकले होते. त्यामुळेही त्यांनी यांना वारंवार सांगण बंद केलं. म्हणून ये आता मोक्कार सारखं गांवात फिरु लागले..... यांच पाहून त्यांचे इतर मित्रांनी ढेम्या, लाल्या, पदामड्या, नब्या, डोशा, सम्या, कोयला, गुल्या यांनी देखिल शाळेला दाडी मारायला सूरुवात केली. काहीदिवसांतच यांनीही पुर्णपणे शाळा सोडून दिली. मगं हे दिवसभर ऊन्हा तान्हात इकडे तिकडे भटकायचे व रोज घरी एकनाएक उपादी आणायचे हे यांच नित्याचच

झालं होतं. मग कधी हे कोणाच काम ऐकत काम केल्यावर मिळालेल्या पैशातून हे जूगार खेळायचे.... कारण यांना आता घरच्यांचाही धाक नव्हता. यांमुळे हे घरचे बोलले तर या कानांने ऐकायचे व दूसऱ्या कानाने सोडून द्यायचे.

हे शाळेत जात नाही कामं धंदे करत नाही नुसतेच मोकाटवाणी फिरतात म्हणून चवल्याच्या घरच्यांनी व यांच्या सोबत राहणाऱ्या इतर मुलांच्या घरच्यांनी यांना बकऱ्या (शेळया) घेऊन दिल्या. मग हे सर्व रोज बकऱ्या चारायला सोबत जंगलात जायला लागले. झाडावडांवर चढणे, नदीत पोहणे एखाद्याच्या शेतातून केळी, पपई, निंबू, आंबे, ऊस चोरुन आणने. हे यांच रोजच कामं. शेतावाल्यानं यांना पकडलं तर कधी, कधी मारपण खातं असतं. नाही सापडले तर यांची मजा व्हायची..... मग यांना कोणी काही कार्यक्रम असला तर जेवणासाठी हजारोच्या संख्येने केळीची पाने आणायला सांगायची त्या बदल्यात यांना लोक पैसेही देत मग हे कोणाच्याही शेतातून कधी विचारुन तर कधी नविचारताच केळीचे पाने कापून गठ्ठे बांधून घेऊन येत असतं. याची यांना सवयच झाली होती. एकाने यांना केळीचे पाने आणायला सांगितले. चवल्याने विचारलं किती पैसे देणार? तो मनुष्य बोलला हजार पानं आहेत. वीस रुपये. दिनं यांवर चवल्या त्या माणसाला बोलला तिथे का तुह्या बाप बशेल आहे का? यांवर तो मनुष्य भनकला अनं चवल्याच्या मागे मारायला पळतं सूटला. आता चवल्या वीस रुपयांत एवढे केळीचे पानं आणणार नाही हेत्यांना चवल्याच्या बोल्यावरुन कळलं होतं. म्हणून त्याने त्याचा नाद सोडून सम्याला बोलावलं. सम्या ये सम्या इकडेये.... आरे केळीचे पानं पाहिजे होते....!

काका किती? सम्यानं विचारलं.

हजारेक पाहिजे होते बाँ.... त्या माणसानं सांगितलं.

मंग भेट्टीनं ना.... कव्हा पाहिजेलं? सम्यानं विचारलं.....

उद्या दूपार पर्यंत..... किती पैसे होतीनं?

काका हजार पानं जास्त आहे. लई टाईम लागीन त्याले..... आडीश्शे रुपये होतीनं. सम्या बोलला.

नही रे काहीबी सांगतो का? तो मनुष्य म्हणाला. पंचवीस रुपये दिनं! अनं जेव्यालेबी येजो.  चालीन का?

नही रे काका काहीबी का.... एवढ्या कमीत नही होणारं!

तुले खरच पाहिजे आसतीनं तर दोनशे रुपये देजो. तेबी तुह्यासाठी फक्त....

झिकझिक करत यांच शंभर रुपयात ठरलं. सम्यानं बेणं म्हणून अकरा रुपये घेतले. कारण कुठल्याही शुभ कामासाठी कोणाकडून पैसे घेतले तर; त्यात वरदिला जाणारा एक रुपया जास्त महत्वाचा असे. म्हणून सम्यानं त्या माणसांकडून बेणं (अँडव्हांस) घेतल्यावर आकरा रुपये घेतले होते. सौदा पक्का झाला. सम्या चवल्याकडे आला. चवल्याला सम्यानं सांगितलं चवल्या शंभर रुपयांत ठरलं. उद्या दुपारपर्यंत हजार केळीची पानं पाहिजेत. त्यांनी त्यांच्या गृपमधील झ्यांग्या, गुल्या, नब्या, कोयला, पिस्तोल्या, पदामड्या, हेटक्या, अंधाकानून ला बोलवलं. सर्व मुलं गोळा झाली.

चवल्या काँलर टाईट करतं बोलला.... अरे ठेका भेटला, आपल्याले ठेका!

कशाचा ठेका भेटलारे तूले? पदामड्यानं विचारलं.

“आरे केळीचे पानं आण्याचे आहेत आपल्याले “

कोणाचे रे? कोयला बोलला.

रमेश काकानं सांगेल आहे रे लग्नयं ना त्यांच्याकडे म्हणून.... सम्या नं सांगितलं.

आसं का....! बरं

किती पैसे भेटणार हे? गुल्यानं इचारलं....

शंभर रुपये....

बापरे सगळ्यांले शंभर शंभर रुपे का? अंधाकानून बोलला....

हा तुह्या बापची ठेव आहे का? सगळयांले शंभर, शंभर रुपे दिन कोणी तर....! चवल्या दात काढतं बोलला.

आरे परतेकाले दहा दहा रुपये भेट्टीन आपल्याले. चवल्या म्हणाला....

नही रे भो तूम्ही जास्त पैसे घेतले आसतीनं तूमचा काही भरवसा नहीं. अनं आम्हाले दहा दहा रुपये देत आश्शानं. हेटक्या बोलला....

ओ हेटक्या पटलं तं ये तूबी; नही त फुटकंची गोयी खायं.... तूया वाटच पक्याले घ्यू आमू..... सम्या म्हणाला.

तूम्हाले पटतय कारे? चवल्यानं विचारलं.... सर्वांनी होकार दिला. मग एकटा हेटक्या काय करणार? म्हणून त्यानेही होकार दिला. सकाळी लवकर उठून केळीची पानं घ्यायला जायच ठरलं.

दिवस ऊजाडला...... सर्वजण ठल्याप्रमाणे जमा झाले. केळीचे पानं कापण्यासाठी कोणी विळा घेतला तर; कोणी न्हाव्याच्या टपरीजवळं पडलेली ब्लेडचे तुकडे घेऊन सर्वजण निघाले. अख्ख जंगल पायाशी घातलं पण कोणीही नवतीची केळी असल्याने, केळीचे पानं तोडूच देत नव्हते. केळीचे पानं घेण्यासाठी सकाळी सात वाजेपासून निघालेले हे सर्व दूपारचे बारा वाजायला आले तरी यांना पाने मिळतच नव्हती. पाने मिळत नाही म्हणून चवल्याच्या डोक्यात विचार आला.... कोणी विचारुन पाने घेऊ देत नाही म्हणून चोरुन पानं तोडायची असा सल्ला त्याने सर्वांना दिला. एका केळीच्या शेतात कोणी नसल्याच बघून हे सर्व त्या शेतात शिरले व फटाफट केळीचे पानं कापू लागले. ते केळीचे रोपे छोटे असल्याने चवल्याने काही झाडं मुळासकट

कापून फेकली. घाईगडबडीत पानांचे गठ्ठे बाःधले व यांनी तेथून पळ काढला. आता ते सर्व केळीचे पानं घेऊन आले. रमेश काकाच्या घरांकडे येत असतांना त्यांना राज्या भेटला..... राज्या म्हणजे गांवातला कळीचा नारद.... केंव्हा कोणाच भांडणं कुठे लावेल त्याचा नेम नव्हता. त्यांन यांना विचारलं???? काय रे चवल्या पानं कूठे भेटले एवढे? त्यावर चवल्या बोलला...... दुसऱ्या शिवारातून आणले. तो शेतीच्या बाबतीत लयी चौकस होता. त्यांन ते पानं पाहताच ओळखलं कारे नवतीच्या बागेतले तोडून आणले वाटत? राज्यान विचारलं.

नही रे भो काका नवतीच्या बागेतले कशाले. जून्याच केयीतून आणले ते..... पानं! सम्या बोलला.

बरं बरं.... असं म्हणतं राज्या निघून गेला. आता हे सर्व ज्या रमेश काकाने यांना पानं सांगितले होते त्याच्या घराच्या काहीशा अंतरावरच होते. तोवर चवल्या आपल्या खांद्यावर असलेला केळीच्या पानांचा गठ्ठा ठेवतं बोलला.... नब्या एक काम करं हा गठ्ठा तू घेऊन जायं मी थांबतो इथे.... नही रे भो मी का रिकामा आहे का? तूया गठ्ठा न्यूतं.....

चालणारे चवल्या आता थोडसं तर राहिलं घरं..... सम्या बोलला. आरे काय सांगू सम्या तुले काल तेच अनं मह्य भांडण झालय म्हणून..... चवल्यानं सांगितलं.

बरं बरं आनं इकडे मह्याकडे तो गठ्ठा मी घेऊन जातो. असं म्हणतं चवल्याचा गठ्ठा सम्यानं डोक्यावर घेत रमेश काकाच्या घरी पोहचले. सर्व पानं यांनी देऊन उरलेले नव्वद रुपये रमेश काकांनी यांना दिले. हे सर्व पैसे घेत पैशांची सारखी वाटणी करुन ते आपापल्या घराकडे घरांकडे निघाले.

दूपारचे आता चार वाजत होते. यांनी ज्यांच्या शेतातूनही केळीची पाने आणलेली होती तो शेतकरीही गावातच रहायचा. आता तो शेताकडे गेला आसता त्याने शेतात बघितलं तर शेतातील सर्व केळीची रोपे तूटून पडलेली होती. त्याला प्रश्न पडला शेतात जर गुरं घुसले असते

तर अशा पध्दतीने रोपे तूटून पडलेच नसते. ढोरांनी फक्त वरच्यावर पाने खाल्ली असती..... मग हा नेमका काय प्रकार आहे? याचा विचार तो करु लागला. चवल्या यांच्या उपद्रवी पणामुळे त्याच खुप नुकसान झालेलं होतं. त्याने जवळ जाऊन बघितल तर ते केळीचे झाडं कापून फेकलेले त्याला दिसले. आता त्याच्या लक्षात आलं हे कोणत्या ढोरांच नाही तर पोरांच काम आहे.... पण हे कृत्य कोणी केलं असेनं? हे त्याला उमगत नव्हतं. तो स्वतःच्या शेतात झालेलं केळीच नुकसान बघून आवाक होऊ डोक्याला हात लावत विचार करु लागला.

तितक्यात समोरुन राजा येत होता. राजानं हे शेतातील दृश्य बघितल व त्या शेतकऱ्याला विचारलं? काय शिवा भाऊ कायं झालं? अरे काय सांगू राजा....! कोणीतरी हे पायं सगळे केळीचे झाडं कापूनं फेकले.

राज्याच्या लक्षात आलं हे काम हो नाहो चवल्याच व पुऱ्यातल्या पोरांच आहे. त्यावर तो त्या शेतकऱ्याला म्हणाला.... हे पाह्य शिवाभू तो रंग्या हजामचा पोऱ्या, तो रफिकचा पोऱ्या अनं बाकीचे पुऱ्यातल्या पोरांन आणले भो पानं दूपारी दिसले ते गठ्ठे घ्यून येतांना गावात!

त्या रमेशच्या पोरचं लग्न आहे ना तेच्याघरी नेले तेंन्ह पानं..... तेनले इचारुन पाह्य कुठून आणले ते....

शिवाभू ते शेतात कापून फेकलेले काही केळीचे रोपे घेऊन तावातावानं या सगळया पोरांच्या घरी गेला. प्रत्येकाच्या घरी जाऊन विचारणा केली. मात्र हे रोप आम्ही तोडलीच नाही अस ते सांगत होते. शिवाभाऊ ने तुमची पोलीसात कम्प्लेट करीन असा दम भरताच हे पोरं बोलले. काका आम्हाले रमेश काकानंच सांगल व्हतं. तुमच्या वावरातून पानं आण्याचे..... इचारलं आहे तुम्हाले असं सांगत होते. म्हणून आम्ही तूमच्या वावरात आलतो. पानं घ्याले. आरे पण फक्त पानं घेतले असते तर चाललं असतं तुम्ही त झाडचं कापूनं फेकले. शिवाभाऊ बोलला....

काका खरं सांगू का तूले.... रमेश काकाच बोलला होता आम्हाले झाडबी तोडज्या म्हणून आम्ही झाडबी तोडले. चवल्याने त्या शेतकऱ्याला सांगितले. आता त्या शेतकऱ्याचा

अधिकच पारा चढला..... त्या रमेश काकाच अनं शिवाभाऊच म्हणजेच त्या शेतकऱ्यात जोरदार भांडणे झाली.

गोष्ट गांवच्या पोलिस पाटील व सरपंचापर्यंत पोहचली. आता मला नुकसान भरपाई हवीच यांवर तो शेतकरी आडून बसला. चवल्या व त्याच्या मित्रांच्या घरच्यांनी हात वर केले. आम्ही थोडी त्यांना सांगितलं होतं ज्यांनी सांगितलं त्यांच्याकडून मागा भरपाई..... आम्ही एक रुपयाही नुकसान भरपाई देणार नाही असे ते म्हणू लागले. सरपंच व पोलिस पाटलांनी मध्यस्थी करतं हे भांडण सोडवलं व रमेशने शिवाला अर्धी नुकसान भरपाई म्हणून दहा हजार रुपये द्यावेत असं सांगितलं. गावांतील पंचाच्या साक्षीनं रमेश काकाने त्या शेतकऱ्याला म्हणजे शिवा काकाला दहा हजार रुपये रोख मोजून दिले. सर्वजण आपापल्या घरी निघून गेले. चवल्याव त्याच्या उपद्रवी मित्रांमुळे एक केळीच पानं दहा रुपयाला पडल होतं. कुठून या पोरांना केळीचे पानं आणायला सांगितली याचा त्यांना पश्चाताप होत होता.

एकदा असच या पोरांनी गावातील एक खुप फटकाळ बाई “शिलाबाई” या बाईच शिव्यांच्या बाबतीत लई तोंड चालायच. अनं हिचा अंधश्रध्देवर लई विश्वास त्यामुळे हिच्या अंगणात साधा ‘निंबू’ जरी पडलेला असला; तर ही गल्लीतल्या बायांना अशा शिव्यां द्यायची. कधीकधी भांडणं होऊन एकमेकांच्या झितऱ्यापण ओढायला ही शिलाबाई कमी करत नसे. या मुळे तिच अनं शेजाऱ्यापाजाऱ्यांच मुळीच जमत नसे. त्यांच्यात रोज भांडणे व्हायची. हेच बघून चवल्याने आपल्या जोडीदारांना सोबत घेत रात्रीच्यावेळी आमवस्येच्या दिवशी या शिलाबाईच्या अंगणात एक अंड, लिंबू तसेच आमवस्येला काही लोक घराला बांधतात ते काळं बाहूलं. त्यावर हळदी कुंकू आणि गुलाल टाकून तिच्या दारी ठेऊन कोणाच्या नजरेस नपडता पळून गेले.... मग काय विचारता? हे सारं दृश्य बघून रामप्रहारात शिलाबाईच्या तोंडाला काम लागलं. कोणं पुजलं

आशिन माय मेल्यांन....? तेच कधी बर ना हो.... आज आमोस्या आहे. असं म्हणतं दिवसभर शिव्या देत राहिली. यांना मात्र इकड हसू यायचं. ही गोष्ट थेट सरपंच व पोलिसपाटलांच्या कानापर्यंत गेली. कारण ही बाई त्यांच्याकडे तक्रार करायला गेली होती. शेजारच्यांवर संशय घेतल्याने त्यांच्यात जोरदार हाणामारी झाली. आणि या गोष्टीला खर कारणीभूत कोण असेल तर तो होता चवल्या..... पणं कोणी केलं हे कोणाला कळलच नाही. कधी कधी चवल्यां अनं त्याचे मित्र याच शिलाबाईच्या दाराला रात्री दोरीने काचेच्या बांगड्या बांधून खळखळ खळखळ असं वाजवायचे. हिला वाटलं भुत आहे म्हणून गांवभर सांगत फिरायची. माय रात्री चुरेड आलती आमच्या घरापाशी असं म्हणायची. तिच्या सांगण्यावर विश्वास ठेऊन गल्लीतल्या बायाही रात्री घाबरायच्या.

कधी कधी तर चवल्या लोकांच्या गोठ्यात बांधलेल्या म्हशी सोडून द्यायचा.

तर कधी कोणी बाया शेजारी, शेजारी झोपलेल्या असल्या तर एकमेकांच्या वेण्या दोरीने घट्ट् बांधून द्यायचा. त्याच्या अशा उपद्रवी पणांमुळे अख्ख गांव हैराण झालं होतं. त्याच्या अशा वागण्यानं त्याचे आई वडीलही चांगलेच वैतागले होते. त्याला चांगल वळण लागावं. त्याने आगाऊपणा सोडून कामंधंदे करावे असं त्याच्या घरच्याना वाटतं होतं. पण काय करणार? त्याला जी सवय लागली होती ती मुडनं इतकी सोपी गोष्ट नव्हती. म्हणून अधून मधून त्याच्या कुरापत्या सूरुच राहतं. कधी चवल्या शेतात बकऱ्या (शेळया) चारायला जायचा; तर कधी त्याचा बापू त्याला विहीरीच्या कामावर मदत व्हावी, म्हणून घेऊन जायचा. पण घरी आल्यावर त्याचे उद्योग मात्र सूरुच असायचे.

गावांत बऱ्याच लोकांचे शौचालय बांधण्यासाठी अनुदान मंजूर झाले. काहींना तर पाच, पाच हजाराचे चेक मिळाले. मगं गांवात घरोघरी आता सूलभ शौचालयांचे कामं सूरु झालेत. चवल्याचा बापू व त्याच्या सोबत काम करणारे माणसं विहिरीच काम नसलं की शौचालय बांधण्यासाठी खड्डे खोदायच्या कामाला जाऊ लागले. दोन बाय दोन जागेत संडास बांधले गेले.

गांवच्या लोकांनी अनुदान मिळतय म्हणून घरोघरी सरकारच्या पैशावरच शौचालय बांधून घेतले. कोणी हे शौचालये घराजवळ तर कोणी पार शेताच्या बांधावर संडासं बांधली. शौचालये तर बांधली तर खरी, पण लोकांना बाहेर मोकळया हवेत शौचास जायची सवय..... मगं यांना या कोंदट बंद संडासात जायला अवघड वाटायच. म्हणूनच गांवातील सर्व बाया माणसे, लहान मोठे तसेच म्हातारे कोतारे सर्व आपल्या नेहमीच्या सवयी प्रमाणे बाहेरच जायचे. शेवटी काय करणार सवयच ना ती.... कोणी तर त्या शौचालयांचा वापर गुरांचा चारा ठेवण्यासाठी तर कोणी घरांतील वापरांत नसलेल्या अडगळीचा सामान ठेवण्यासाठी करु लागले. सरकारचे एवढे पैसे जाऊनही “हगणदारी मुक्त गांव “ या योजनेचा फज्जाच झाला होता.

गांवचे प्रत्येक रस्ते रंगलेले ते रंगलेलेच. शौचालयांच्या बांधकामासाठी खड्डे खोदणाऱ्या मजूरांना चागलं दोनं ते तीनं महिन्याच काम मिळालं होतं. चवल्याच्या बापूनं व त्याच्या सोबतच्या माणसांन चांगली कमाई केली होती. चवल्याही कधी तरी त्याच्या बापू सोबत जायचा शौचालयांसाठी खड्डे खोदायच्या कामाला.... त्याच्या बापू सोबत जाऊन, जाऊन.... विहीर कशी खोदतात? हे तो अगदी जवळून बघू लागला. मग एखादं दिवशी घरी असल्यावर तो त्याच्या मित्रांना सोबत घेत नदी मध्ये विहीर, विहिर खेळत असे. म्हणजेच काडीने किंवा लोखंडाच्या गजाने खोलं खड्डे खोदत असतं. त्यावेळी गावांतील लोक त्यांना ओरडतं. कारे समजत नहीं का तुमाले? रस्त्यात खड्डे करता भडवीचे..... असं नेहमी म्हणतं असतं. पूर्वी ते लहान खड्डे खोदायचे. परंतू आता चवल्याने त्याच्या बापू सोबत जाऊन मोठ्या विहिरींचे कामं अगदी जवळून पाहिले होते. तेंव्हा पासून त्याच्या डोक्यात आपणही एखादी मोठी विहीर खोदायची असा विचार त्याच्या मनांत सारखा घोळत होता. एकदिवस त्यानं झ्यांग्या, पदामड्या, सम्या, गुल्या, ढेम्या, शेवग्या, कोयला, पिस्तोल्या, फेंगड्या यांना विहीर खोदायची आहे असं सांगितलं. चवल्यानं सांगितल्या बरोबर वानरसेना तयार झाली. कोणी खुरपं आणलं, कोणी तगारी आणली, कोणी कुदळ आणली तर कोणी फावडा आणला. ढेम्या एक काम करं तू काही आणलं नही ना तू नारळ घेऊन ये.... पदामड्या तू गुलाल अनं अगरबत्ति आण. शेवग्या तू साखर घेऊन ये अनं. फेंगड्या तू

फक्त तांब्याभर चांगल पाणी घ्यून ये.... चवल्याने प्रत्येकाला काम वाटून दिलं. जो तो सांगितल्या प्रमाणे वस्तू घेऊन आला. सर्व जण नदीमध्ये जमा झाले. मग चवल्याने सर्वात आधी एक दगड घेतला त्याला पाण्याने धूवून स्वच्छ केला. त्याच्यावर गुलाल टाकून पूजा करुन नदीमध्ये ते जिथं विहीर खोदणार होते त्या जागेची पुजाकरुन अगरबत्ती लावली, नारळ फोडलं नारळ व साखरेचा प्रसाद देवाला ठेऊन सर्वांना प्रसाद वाटला...... आणि विधिवत त्यांनी विहिर खोदायला त्यांनी सूरुवात केली. लोक येता जाता त्यांना बोलत होते.

ह्या चवल्याले काही काम नहीं...... हा रिकाम्या पोरांनले गोया करतो; अनं असे रिकामे चांगल्या नदीत खड्डे खनत बसतो. म्हणून मोठेमोठे डोहो तयार होता पावसायात येंच्या पायरे नदीत. असं म्हणतं बऱ्याच लोकांनी त्यांना पिटाळून लावलं. मगं त्यांनी कोणाच्या नजरेस न पडता काम करायच म्हणजे आपल्याला कोणी बोलणार नाही असा विचार केला. म्हणून ते रोज थोडं, थोडं असं करत ते तो खड्डा खोदत राहिले...... नदी असल्याने नदीत वाळूचा थर खूप होता. वरची वाळू बाजूला करत करत त्यांना दोन दिवस लागले. तसं ते रोज एक तासच काम करायचे. अस करता, करता त्यांनी दहा ते पंधरा दिवसांत भला मोठा साधारण पाच ते सहा फुट व्यासाचा व साधारण दहा फुट खोलं असा झिरं खोदला. आता त्या झिऱ्याला "पाणी" लागलं..... या सर्वांना खूप आनंद झाला. यांनी पून्हा विहिरीला पाणी लागलं.... विहिरीला पाणी लागल असं म्हणत गुळ वाटला. नदी असल्यामुळे त्या झिऱ्याच पाणी रोज वाढतच जात होतं. ते नदीत खोदलेल्या झिऱ्याला विहीर म्हणतं. आता आपली विहीर कोणाला दिसू नये. म्हणून त्यांनी त्या झिऱ्यावर वरतून झाडांच्या फांद्या जाड पुठ्ठे टाकून व त्यावर माती टाकून व काटेरी झूडपं टाकून ते झाकूनं दिलं. ते रोज येऊन गुपचूप एका बाजूने उघडून पाणी वाढलं का नाही? हे बघत असतं. पुन्हा ते तसच झाकून तेथून निघून जातं. नंतर त्यांनी बरेच दिवस यांनी त्या झिऱ्याकडे ढुंकून सूध्दा पाहिलं नाही.

आता उन्हाळा सूरु झाला अंगाची लाही लाही करणारं कडक ऊन तापू लागलं. गांवातील नदी आटली, पाणवटे विहीरी आटल्या.... धरणे देखिल आटली. कधी नव्हे एवढ्या दुष्काळाच सावट गांवावर पहिल्यांदाच आलं होतं. माणसांच्या व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. लोक पाण्यासाठी वण वण भटकू लागले. पावसाळा सुरु व्हायला अजून एक ते दिड महिना बाकी होता. पाण्यामुळे लोक चिंतीत झाले. आता काय करावं? हा प्रश्न सर्वांना पडू लागला. लोक मैलो मैल पाण्यासाठी भटकंती करु लागले. पाण्यासाठी वणवण भटकू लागले. पण कुठे पाणीच मिळनां.... मिळालच तर तेही पुरपाठ नाही. अशी गत झाली होती. चवल्या व त्याच्या मित्रांनाही घरच्यांन सोबत पाण्यासाठी भटकंती करावी लागत होती. चवल्याच्या लक्षात आलं त्याला आता कुठे त्यांनी नदीमध्ये खोदलेला झिरं त्याला आठवला..... त्याने झ्यांग्याला सोबत घेत ते दोघं त्यांनी खोदलेल्या नदीमधील झिऱ्याजवळ ते आले. झिऱ्यावर टाकलेल्या फांद्या बाजूला करत तो आत डोकावला. बघतो तर काय? पुर्ण झिरा पाण्याने काठोकाठ भरलेला होता. त्याला आनंद झाला. त्याच्या पाठोपाठ झ्यांग्यानेही बघितल त्यालाही आनंद झाला. ओ विहीरीले पाणी आलं रे भो....... असं म्हणतं ते दोघं घराकडे गल्लीतून आरोळया मारत आले. चवल्याची आई गल्लीतील इतर बाईंसोबत कुठल्यातरी पार दूरच्या शिवारात हंडा कळशी घेऊन पाणी आणायला जात होती.

माय मायं थांब जरा.... चवल्या गल्लीतून धावतच, धापा टाकतं पळत येत त्याच्या आईला म्हणाला. काय झालं रे तूले बोंबल्याले? चवल्याच्या मायनं चवल्याले विचारलं.

माय कुठे जातेयं तू? थांब....

दिसतं नही कारे तुले..... पाणी घ्याले चाललीतं! चवल्याची माय संतापात बोलली....

आरे दिसतय माले तू पाणी घ्यायले चालली तं.... पणं कुठून आणतेय पाणी? चवल्यानं विचारलं. दूर च्या शिवारातून....! चवल्याची माय पुढे चालत बोलली.

माय थांब आता तुले पाणी घ्यायले एवढ्या दूर जायची काहीच गरज नहीं. चवल्या बोलला.

चवल्यानं त्याच्या आईच्या हातातला पतराचा हंडा घेतला.

"अनं चला सगळे मह्या मागे" असं म्हणतं माघारी फिरला. पण चवल्यावर मात्र कुणाचाच विश्वास नव्हता. त्यामुळे बाया पुढे निघून गेल्या. चवल्याची आई देखिल विचार करायला लागली. हा नेमका नेतोय कुठे? अन याला पाणी भेटलं तरी कुठे म्हणून विचार करु लागली. चवल्या हंडा घेत घरी आला त्याने घरुन एक प्लास्टीकचा डबा घेतला व आईला सोबत घेत नदीच्या दिशेनं आला. नदीत पोहचल्यांवर त्यांनी खोदलेला "झिर" त्याने त्याच्या आईला दाखवलं. माय पाह्य तुले खोटं वाटतयं ना मह्य? तर हे पाह्य पाणी.... चवल्याच्या आईनं तो झिरा पाहिला तर तो खरोखर पाण्याने काठोकाठं भरला होता. आश्चर्य चकीत होऊन पाहू लागली. चवल्यानं आपल्या हातातील प्लास्टीकच्या डब्यानं झिऱ्यातील गढूळ पाणी हळू हळू बाहेर फेकलं. आता संपुर्ण झिऱ्याच पाणी काचासारखं निथळ झालं..... चवल्यान डब्याच्या सहाय्याने त्याच्या आईला हंडा भरुन दिला. त्याची आई एक एक खेप हंडा भरुन घरी टाकून येत होती. तिकडे पार दुसऱ्या शिवारात गेलेल्या बाया पाणी न मिळाल्याने रिकाम्या हाती परतल्या होत्या. त्यांनी चवल्याच्या आईला बघताच त्यांना आश्चर्य वाटलं. एका बाईने चवल्याच्या आईला विचारलं. व लक्षमा ताई कुठून आणताय तुम्ही पाणी? तुम्हाले बरं भेटलं आम्ही एवढ्यादूर जाऊन काही फायदा झाला नहीं. रिकामेच आलो, पायपीट करत घरी....

चवल्याच घ्यून नही का माले तिथून आणलं पाणी! चवल्याच्या आईनं त्या बाईंना सांगितलं.

पण कुठून आणलं ते तर सांग? एका बाईनं विचारलं....

अवं ताई येनं नदीत भला मोठा झिरा खंदला तेच्यातून आणलं पाणी.....

काय सांगता? आम्ही बी येऊ का? ती बाई म्हणाली.

चला नं मंग एकएक खेप त भेटीनं प्या पुरता....

सर्वजण झिऱ्याकडे निघाले. त्यांनाही झिऱ्याच पाणी बघून आश्चर्य वाटलं.... त्यांनी सर्वांनी

झिऱ्यातून पाणी घेऊन जायला सूरवात केली. चवल्या, झांग्यां, नब्या, ढेम्या, पदामड्या, अंधाकानून, फेंगड्या, कोयला, पिस्तोल्या, शेवग्या, सम्या सर्वजण देखिल आपापल्या घरी पाणी घेऊन जाण्यासाठी भांडे घेऊन आले. बघता, बघता गांवातील सर्वांनीच या झिऱ्यातून पाणी घेऊन जाण्यासाठी गर्दी केली. झिऱ्यातील पाणी जितकं उपसलं जायच तितकच पाणी पुन्हा झिऱ्यात जमा होत होतं. पाण्यासाठी बरीचशी गर्दी झाल्याने चवल्याने आता सर्वांनी नंबरशिर भांडे लावा. सगळ्यानले पाणी भेटीन. असं सांगितलं, व नंबर प्रमाणे तो प्रतेकाला दोनं, दोन भांडे भरुन देऊ लागला. ज्यांनी चवल्याला हे झिरा खोदतांना विरोध केला होता ते देखिल आता पाणी घेण्यासाठी येत होते. अचानक पाण्याचा साठा कुठे तयार झाला? व गांवकऱ्यांना पाण्याची खाणं बीनं सापडली की काय? असा प्रश्न सरपंच व पोलिस पाटलांना पडला. कुणाच्या सांगण्यावरुन ते देखिल तो झिरा पाहण्यासाठी आले. त्यांनाही झिऱ्यातील पाणी बघून आश्चर्य वाटलं. कोणी खंदला हा झिरा? पाटलांनी इचारलं.

चवल्यानं अनं त्याच्या या मित्रांन एकानं सांगितलं. लय भारी कामगिरी केली पोरां.... लोक पाण्यासाठी भटकतं होते. पण पाणीच मिळेनास झालं होतं. पण खरच तूया या कामगिरीनं आज आख्ख गांव पाणी भयतयं बरं वाटलं.

पोलिस पाटील व सरपंचांनी चवल्याला पाठीवर थाप देत शाब्बासकी दिली. एकाच झिऱ्यावर गर्दी होऊ नये. म्हणून चवल्याची प्रेरणा घेत सरपंचांनी इतर माणसांनाही अजून पाच सहा झिरे खोदायला लावले. चवल्याचीही संकल्पना त्यांना पटली होती. म्हणून त्यांनी चवल्याव त्याच्या मित्रांना पाचशे रुपये बक्षिस दिले. चवल्याने व त्याच्या मित्रांनी खोदलेला झिरा भरं

ऊन्हाळयात संपुर्ण गावाची व पाळीव प्राण्यांची पिण्याची तहाण भागवत होता. म्हणूनच तो "झिरा" गांवकऱ्यांसाठी दुष्काळातही संजीवणी ठरला. आपल्या उपद्रवीपणामुळे गांवभर बदनाम झालेला चवल्याच आता गांवकऱ्यांच्या कामी आला होता. गांवकऱ्यांमार्फत त्याच्या या चांगल्या कामगिरीमुळे गांवभर कौतुक झालं आणि गांवकऱ्यांनी त्याचा वत्याच्या सोबत असलेल्या सर्व मुलांचा सत्कार केला. "चवल्या" आता गांवाचा हिरो झाला होता हिरो...... चवल्याच्या आईला व त्याच्या बापूलाही चवल्याच्या कामगिरीचा खुप आनंद झाला होता. माझा बिनकामाचा पोऱ्या आज गांवाच्या कामी आला..... असं चवल्याचा बापू गर्वाने सांगू लागला.

पण त्याचा उपद्रवी पणा कमी झाला असावा? असं तुम्हाला वाटतं असेल.... पण असं मुळीच नाही, पुढेही तो काहीना काही खोड्या करतच होता.

चवल्याचा चूलतभाऊ जो नाशिकहून कटींग, दाढीच काम शिकून आता गांवात आला होता, त्यानेही गांवात येऊन सलूनचं दूकान टाकलं. चवल्यानंबी तेच्या हाता खाली राहून हे काम शिकावं. अशी त्याच्या बापूची ईच्छा. म्हणून तेच्या बापूनं त्याच्या पुतण्याले सांगून या रावल्यालेबी तूह्या हाताखाली ठेवं अनं त्यालेबी आपली कारागिरी शिकवं असं सांगितलं. चवल्याचा चूलत भाऊ सोपानंबी जरा चवलाच होता. त्यानं त्याच्या काकाले सांगितलं.

काका पाठवत जाय ना मंग तेले.... आपलंच दूकान हे यांत इचाऱ्याच काय? तोबी शिकीन अनं मालेबी मदत होईल. अस तो सोपान चवल्याच्या बापूला म्हणाला. चवल्या आता शेळया चारुन आल्यावर त्याच्याकडे सलूनच काम शिकण्यासाठी जाऊ लागला. सोपानंकडे रविवार असल्याने खुप गर्दी होती. म्हणून तो चवल्याला एका खुर्चीवर फक्त दाढी करणाऱ्या ग्राहकांची दाढी करायला सांगायचा.

त्यातच एक गि-हाईक त्याच्याकडे आलं तो मुलगा खुप घाई करत होता.

तो दिसायला थोडा यडगळ होता. गांवातील सारी मुले त्या फावडामेल किंवा हेवड्या म्हणायचे तस त्याच नांव गफूर होतं. तो व त्याच संपुर्ण कुटूंब बांगडी विकायच काम करायचे. आता तो मुलगा घाई करतोय म्हणून चवल्याला सांगून त्याची कटींग करायच सोपानने चवल्याला सांगितलं. आयुष्यातलं पहिलं गि-हाईक असल्याने याआधी चवल्याने कधी कोणाची कटींगच केलेली नव्हती. हा मुलगा खुर्चीवर बसला काही मिनिटांत त्याने त्या २५, २६ वयोगटातील तरुणाची म्हणजेच गफुरची कटींग केली. तो मुलगा घरी गेला. त्याचा मोठा भाऊ शब्बीर त्याच्यावर ओरडला ज्या भोसरीके समज नही आता.... ऐसी कटींग करके आया. वापीस जा.... फिरसे अच्छी करके आ..... असं म्हणून त्याला पुन्हा सलूनच्या दुकानावर पाठवलं. पुन्हा चवल्याने त्याच्या डोक्यावरचे लहान मोठे बाल कापून व्यवस्थित केले. पुन्हा तो घरी गेला..... त्याच्या भावाने पुन्हा त्याला सोपानच्या दुकानावर व्यवस्थित कटींग करुन ये असं सांगत पुन्हा पाठवलं. असं दोनं तीनदा झालं ऐनं गि-हाईकांची गर्दी त्यात याची घाई बघून हा चारचारदा येतोय म्हणून सोप्यानं चवल्याला त्याची चाटीच करुन टाक असं सांगितलं. तो पुन्हा आला मग काय? सोपानं सांगितल्या प्रमाणे चवल्याने त्या सरळ चाटीच करुन टाकली. चवल्याला वस्तारा वापरायची सवय नसल्याने ठिकठिकाणी ब्लेड लागून गफूरच्या डोकूयातून रक्त येतं होतं. ते बंद व्हावं म्हणून सोपाननं कोणतरी लोशन त्याच्या डोक्यावर लावून त्यावर कॉँस्मेटीक क्रिम व तोंडायला लावायची पावडर संपूर्ण टकलीवर लावून दिले हे दृश्य बघून सर्वच लोक हसू लागले. तो पुन्हा घरी गेला. त्याचा हा अवतार बघून त्याचा मोठा भाऊ शब्बीर अधिकच भडकला. त्याने अजून त्याला मारले. किसके पास गया था तू? आ किसके यहा? असं विचारु लागला. त्या गफूरने सांगितलं सोपानकडे त्यावर त्याचा भाऊ बोलला ओ आगाऊ आंडे है तू क्यू गया वहा म्हणून अजून त्यालाच बदडला. आता गफुरची खोडच मुडली. एकदा हाच गफुर चवल्यां त्याच्या सोबत त्याच्या बकऱ्या घेऊन रानात गेला होता त्यावेळी देखिल चवल्या व त्याच्या आगाऊ मित्रांनी त्याच्या अंगाला काचकुयऱ्या लाऊन दिल्या होत्या. त्यामुळे कावराबावरा होऊन अंग खाजवत

होता व रडत होता. खाजमुळे तो बेजार झाला होता. (काचकुयऱ्या म्हणजे रानातील एक वनस्पती जीचा स्पर्श झाल्यावर अंगाला खाज येते व दाह होतो अशी वनस्पती.)

गफुर घरी आल्यावर त्याने चवल्याने व या पोरांनी अंगाला काचकुयऱ्या लावल्या असं सांगितल्याने त्यांच्यात खुप भांडणे झाली होती. अंगाची खाज बंद व्हावी यासाठी त्याला डॉक्टरांकडे घेऊन गेले, मात्र काही फरक पडत नव्हता. मगं एका वयस्कर म्हाताऱ्याने त्याच्या अंगाला गायीच शेण लावा तेंव्हा कुठे खाज बंद होऊन दाह कमी होईलं असं सांगितलं त्या म्हाताऱ्याच्या सांगण्यावरुन त्यांनी त्याच्या संपुर्ण अंगाला गायीच शेण लावलं तेंव्हा कुठे त्याला आराम पडला होता. काचकुयरी ही आशी वनस्पती आहे जी एक शेंग सारखी असते व तिच्यावर अगदी केसांसारखे वरुन मखामला सारखे सोनेरी रंगाचे बारीक काटे असतात. याला जराही स्पर्श केला तर अंगाला खाज येत असते. अशीही विषारी वनस्पती आहे.

काही दिवस उलटले..... शिलाबाईला तिच्या नवऱ्याने एक नविन लाल भडकं रंगाची साडी आणली होती. ही तिच शिलाबाई जिच्या अंगणात काही दिवसांपूर्वी चवल्या व त्याच्या मित्रांनी अंड, निंबू, बाहूलं ठेऊन पुजा केली होती. दोन दिवस सूट्टी घेऊन तिचा पती घरी आला होता. तसा तो जिल्ह्यावर होमगार्ड म्हणून नोकरी करायचा. पण इकडं शिलाबाई माझा नवरा फौजदार आहे फौजदार असं सर्वांना सांगत असे. सूट्टीवर आल्याने तिच्या नवऱ्याने तिच्यासाठी एक नवी लाल रंगाची साडी आणली होती. एकदा घडी मोडून शिलाबाईने ती साडी धूवून बाहेर दोरीवर वाळत टाकली होती. आता शिलाबाईने वाळत टाकलेली साडी कोणीतरी चोरुन नेली. शिलाबाई गांवभर ती साडी शोधू लागली. साडी दिसली का म्हणून याला त्याला विचारु लागली. चोरुन नेणाऱ्याला शिव्याशाप देऊ लागली पण काही फायदा झाला नाही. साडी कोण घेऊन गेल? हे मात्र समजलच नाही. म्हणून शिलाबाईने बरेच दिवस शिव्याशाप देत ती गप्प बसली.

एक दिवस मुलं नदीत खेळतं होती. खेळता खेळता या मुलांपैकी एकाला उकिरड्यावर एक छोटी काळया रंगाची वर चैन आसलेली बँग सापडली. तो मुलगा पळत आला मला बँग

सापडली, बॅंग सापडली असं म्हणू लागला चवल्याने हे पाहिलं त्याने त्या मुलाच्या हातातील बॅंग हिसकवली. मुलगा रडू लागला पण त्याने त्या मुलाला ती बॅंग दिलीच नाही. तसं त्या बॅंगमध्ये काहीही नवूहतं खालीच होती. पण मुलगा लहान असल्याने तो हट्ट करत होता. आता चवल्याने ही बॅंग घेतली तिला वरुन चांगली पाण्याने धूऊन स्वच्छ केली. व पिस्तोल्या, ढेम्या, पदामड्या, कोयला, सम्या, नब्या व इतर मित्रांना सोबत घेत ते नदीतील पुलाजवळ आले या बॅंगमध्ये कागदं वपालापाचोळा भरुन ती बॅंग रोडावर ठेऊन दुर ऊभं राहून बघू लागले. कोणतीही गाडी येऊन थांबायची त्यांना वाटतं कोणाची तरी बॅंग पडली बॅंग मध्ये पैसे असावेत? म्हणून ते उचलून त्या बॅंगची चैन उघडून बघायचे त्यात भरलेले कागद, झाडाचे पानं बघून पुन्हा फेकून द्याचे हे पुन्हा व्यवस्थित करुन रोडावर ठेऊन दूरुन गंमत बघायचे. उचलणारा फजित झाला की हे जोरात त्याला चिडवायचे व जोर, जोरात हसायचे. हा खेळ आता यांचा नित्याचाच झाला होता. एक दिवस रस्त्याने पोलिस गाडी येत होती. त्यांनाही रस्त्यावर बॅंग पडली असल्याच त्यांना दिसलं. ते बॅंग बघून त्यांनी आपली गाडी थांबवली व ती बॅंग त्यांनी उघडून बघितली. त्यात त्यांना कागदाचे तुकडे झाडांचा पालापाचोळा दिसला म्हणून त्यांनी ती बॅंग फेकून दिली. हे मुलं जोरात हसताच पोलिस त्यांच्या मागे लागले. दोन मुलांना त्यांनी पकडल..... यात कोयला अनं ढेम्या सापडला कारण ढेम्याची ढेरी इतकी मोठी होती की त्याला पळता सुध्दा येत नव्हतं. पोलिसांनी पोलिस पाटलांना बोलवून या दोघांना चांगलंच बदडलं. त्यांच्या घरच्यांना बोलवून समज देऊन ढेम्याला व कोयल्याला सोडून दिलं. तेंव्हा पासून यांच हे बॅंग ठेऊन लोकांना ठगवणं थांबलं.

"**चवल्याच्या** नांदी लागून अख्ख्या गांवची मुलं **'चवले'** (आगाऊ) झाले होते." ते देखिल चवल्या सारखा चवल्यापणा करु लागले.... गांवातील बाया माणसे यांना काय चवले पोरं आहेत हे असंच म्हणायचे.

गावांत कोणीतरी रात्रीच्यावेळी बाहेर शौचास गेले आसता त्याला आता भुत दिसलं..... गांवात सगळीकडे तिच चर्चा चालू होती. कधी बांधावर, कधी पांढरीत, मळीमध्ये तर कधी नदी तर कधी नाल्याच्या काठावरं शौचालयास जाणाऱ्या बाया माणसांना हे भुत आढळलं होतं. बऱ्याच जणांनी लाल साडी नेसलेल्या बाईच भूत दूरुन आपल्या डोळयांनी पाहिलं होतं. कोण्या एका बाईनं तर शिलाबाई तुझी साडी त्या भुतानच पळवली. म्या त्या भुतडीनच्या अंगावर तु सांगत होती. तशीच लाल साडी बघितली असं ती बाई शिला बाईला सांगत होती. बरं झालं तुही साडी ते भुतडीन घेऊन गेली तेंव्हा तू नव्हती. नही तर तुलेच झडपावलं (झपाटलं) असतं त्या भुतानं. असही ती बाई बोलू लागली. लोकांनी भुताच्या भितीमुळे कोणी एकटं दुखटं बाहेर पडत नव्हतं. गांवच्या लोकांनी बाहेर उघड्यांवर शौचालयास जाणं बंद केलं. सरकारी अनुदानातून बांधलेल्या संडांसांचा वापर लोक आता अडगळीचा सामान ठेवण्यासाठी किंवा गुरांचा चारा ठेवण्यासाठी नकरता, शौचालयाचा वापर शौचालयांसाठीच करु लागले. इतकी त्या भुताची गावात दहशत झाली होती. गांवचे रस्ते पुर्वी पेक्षा स्वच्छ दिसू लागले. गांवात सर्वत्र स्वच्छता नांदू लागली. स्वच्छ सर्वेक्षणातून गावाची निवड करण्यात आली. आमच्या गांवाचा आता स्वच्छ गांव म्हणून जिल्ह्यात पहिला नंबर आला. जिल्ह्यात पहिला नंबर आला म्हणून गावांत एका कार्यक्रमाच आयोजन करण्यात आलं. गांवभर तशी दवंडी फिरवण्यात आली. गावात या कार्यक्रमात गांवाला "स्वच्छ गांव" पुरस्कार मा. कलेक्टर साहेबांच्या हाताने दिला जाणार होता. कार्यक्रमाच नियोजन करण्यात आलं. प्रत्येकावर सरपंच व पोलिसपाटलांनी ग्रामपंचायतीच्या वतीने जबाबदारी सोपवली. कार्यक्रमाचा दिवस उजाडला. मंडप ऊभारण्यात आला प्रमुख पाहूण्यांसाठी फुलांचे हार आणि पुष्पगुच्छ आणण्यात आले. गावांत सर्वत्र रांगोळयांनी आंगणे सजली. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहूणे म्हणून कलेक्टर साहेब येताय म्हणून सर्व गांवकरी त्याच्या स्वागतासाठी सज्ज झाली. सगळेजण कलेक्टसाहेब येण्याची वाट बघू लागले. साहेबांची गाडी आली. सखाराम डफडं घेऊन तयारच होता. साहेब गाडीतून उतरताचं सरपंच व पोलिसपाटलांनी कलेक्टर साहेबांच तसेच त्यांच्या सोबत आलेल्या सहकार्यांच फुलहार व

पुष्पगुच्छ देऊन स्वागत केलं. सखाराम मोठ्या जोषात डफडं वाजवत होता. सरपंचाची छाती गावाला स्वच्छतेचा पुरस्कार भेटतोय म्हणून आनंदानं फुलत होती. गांवचे पाटील मिशिवर ताव देत होते. सर्व सोपस्कर आटपून आता कलेक्टर साहेबांच भाषण चालू झालं. सर्वजण कान देऊन शांत चित्ताने साहेबांच भाषण ऐकू लागले. आता लोकांना उत्सुकता होती ती पुरस्कार मिळायची. शिपायान प्रशस्तीपत्र व मोठ्ठी ढाल आणून टेबलावर ठेवली. कलेक्टरसाहेबांनी सपूर्ण गांवखऱ्याच कौतुक केलं उद्घोषणा झाली. कलेक्टर साहेब खूर्चीवरुन ऊठून जागेवर उभे राहिले. “स्वच्छगांव” असं प्रशस्तीपत्र व बक्षिसाची ढाल हातात घेऊन सरपंच व पोलिस पाटलांचा गांवकऱ्यांच्या वतीने गावचे प्रतिनिधी म्हणून त्यांचा गौरव करणार तितक्यात पाटील बोलले. साहेब हा मान आमचा नसून त्या भूताचा आहे त्या भूताचा आहे त्याला आधी बोलवतो. खरंतर त्याच्यामुळेच आमच गांव स्वच्छ झालं. त्याचे आभार मानायला की नको???? सरपंच बोलवा त्या भूताला. पाटील बोलले.....

सरपंचानी जोरात भूताला आवाज दिला.

आरे ये भूता जिथं कुठे आसशिनं ये इकडे.....

लोकं भेदल्यासारखं खरोखर भूत येतं की काय? म्हणून पाहू लागले. कलेक्टर साहेबांना वाटल हा काय प्रकार आहे? म्हणून त्यांनी पाटलांना विचारलं. पाटील कय हे?

पाटलांनी हातांनी इशारा करत थांबा साहेब कळेल तुम्हाला असं सांगितलं.

तितक्यात दुरुन लालसाडी वालं कोणीतरी येतांना दिसलं. लोक भूत आलं म्हणून पळायला लागलीतं. सरपंच बोलले अरे थांबा , थांबा भूत आपल्या ओळखीच आहे ते काही नाही करणारं..... तुम्ही पळलात तर ते तुम्हाला पकडेल. सरपंचानी असं सांगताच लोक जागेवरच थांबले. ते लाल साडी नेसून आलेलं भूत जवळ आलं. पाटील आणि सरपंचं बोलले साहेब हा पुरस्कार आमचा नाही. या भुताचा म्हणून तुम्ही याला पुरस्कार द्या. कलेक्टर साहेबांनी गांवाला

दिला जाणारा “स्वच्छ गांव” हा पुरस्कार त्या भुताला दिला. पुरस्कार मिळताच सखाराम जोरजोरात डफडं वाजू लागला. गावाला पुरस्कार मिळाला. त्या भूतानं आपल्या तोंडावर झाकलेला पदर बाजूला केला. त्याचा चेहरा बघून लोक आश्चर्य चकीत झाले. मुळात ते कुठलं भूत नव्हतं तर “चवल्या” होता.

कलेक्टरसाहेबांनी चवल्याच्या कामगिरीच कौतुक केलं. गांवच्या लोकांना व चवल्याच्या आई बापाला आनंद झाला. आज खऱ्या अर्थानं चवल्याच्या चवल्या पणामुळे गांव स्वच्छ झालं होतं व गावाला पुरस्कारही मिळाला होता. आता चवल्याचा पेपरात पुरस्कार स्विकारतांनाचा फोटो छापून आला. हे भूत कोणतं आहे पोलिस पाटील सरपंचांना ठाऊक होतं. त्यांनी मिळून हा प्लँन केला. शिलाबाईनं चवल्याला तिची साडी नेसलेली साडी बघून ती त्याच्या मागे धावतं सूटली. चवल्यानं शिलाबाईची साडी प्रामाणिकपणे परत केली. आणि चवल्या व त्याचे मित्र आखाडा वाजवं आखाडा असं डफड्या वाल्याला म्हणतं डफड्यावाल्या सख्यानं डफडं वाजवताच सर्वजण आनंदात नाचू लागली.

## (समाप्त)

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.